
# माणूस


शनिवार
२ सप्टेंबर १९७८


किंमत
दीड रुपया

कुटुंबनियोजन विशेषांक

मुलाखती :
शंकरराव चव्हाण
निहाल अहमद
विनायकराव पाटील
माधवराव आपटे
डॉ. बानू कोयाजी
आणि
विजय परुळकर







# साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे-अंक चौदावा
२ सप्टेंबर १९७८
मूल्य १·५० पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
□
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**
□
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
□
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
□
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
□
दूरध्वनी : ४४३४५९
□
[ मुखपृष्ठ : माधव फळणीकर
छायाचित्रे :
श्री. शंकरराव चव्हाण, श्री. निहाल अहमद श्री. विजय परूळकर, श्री. विनायकराव पाटील, श्री. शरद पवार. ]



## वरं जनहितं ध्येयम् । केवला न जनस्तुतिः ॥

पहिले महायुद्ध सुरू झाले आणि ब्रिटिश सरकारने भारतात लष्करभरतीचा कार्यक्रम हाती घेतला. टिळक नुकतेच मंडालेहून सुटून आले होते. त्यांनी या कार्यक्रमाला निव्वळ पाठिंबा दिला इतकेच नाही तर लष्करभरतीच्या चळवळीलाच एकदम हात घातला! त्यांच्या अनेक चहात्यांना, अनुयायांना परकीय सरकारशी असे सहकार्य करावे हे मंजूर नव्हते; पण यात राष्ट्राचे अंतिम कल्याणच आहे अशी टिळकांची भूमिका असल्याने त्यांनी अनुयायांच्या नाराजीची, विरोधकांच्या टीकेची पर्वा न करता व्याख्यानातून, 'केसरी'तून लष्करभरतीच्या चळवळीचा चांगलाच दणका उडवून दिला. दुसऱ्या महायुद्धात सावरकर–मानवेंद्रनाथ रॉय यांनी लोकमताच्या विरोधाची तमा न बाळगता लष्करभरतीचा हिरीरीने पुरस्कार केला. दोघांच्या भूमिकेत जमीन-अस्मानाचा फरक होता हे खरे; 'लष्करात शिरून बंदुका प्रथम हाती घ्या. बंदुकांच्या नळांची टोके कोणत्या दिशेने वळवायची हे नंतर ठरविता येईल,' ही सावरकरांची कट्टर राष्ट्रीय व त्यांच्या सशस्त्र क्रांतिमार्गाला पोषक ठरणारी व्यवहारवादी भूमिका होती, तर रॉय हे फॅसिझम विरोधासाठी ब्रिटिशांशी बिनशर्त सहकार्य केले पाहिजे, असा तात्त्विक आग्रह धरून होते. त्या वेळच्या लोकप्रिय काँग्रेस नेतृत्वाने या दोघांच्या भूमिकांचा विपर्यास केला व सावरकरांची तर 'रिक्रूटवीर' म्हणून यथेच्छ निंदा-नालस्तीही झाली; परंतु टिळकांनी पहिल्या महायुद्धात व सावरकर–रॉय यांनी दुसऱ्या महायुद्धकाळात 'वरं जनहितं ध्येयं, केवला न जनस्तुतिः' हे आपले ब्रीद सोडले नाही व अप्रिय पण पथ्यकर असेल त्याचाच पुरस्कार चालू ठेवला, त्यासाठी आपली लेखणी व वाणी परोपरीने झिजविली.

कुटुंब नियोजनाची बदनाम झालेली चळवळ अशाच नेटाने आता पुन्हा हाती घ्यायला हवी आहे. टिळकांना, सावरकर–रॉय यांना प्रतिकूल लोकमत हा एक मोठा अडथळा होता. आता हा धोकाही वाटतो तितका मोठा नाही. सर्वसामान्य माणसालाही या विषयाचे महत्त्व पटत चालले आहे, सक्ती न करताही तो अनुकूल होण्यासारखा आहे. मागील चुका टाळून ही चळवळ पुन्हा जोमाने सुरू झाली तर लोकांकडून चांगला प्रतिसाद लाभण्याची खूपच शक्यता आहे. तरीपण शासन व निरनिराळ्या क्षेत्रांतील मान्यवर–मातबर मंडळी या विषयी आपले मौन सोडायला अद्याप काही तयार नाहीत. हे मौन सुटण्यास थोडीफार मदत व्हावी यासाठी हा अंकप्रकाशनाचा खटाटोप केला आहे. राजकारणाच्या चालू गदारोळात या लहानशा खटाटोपाकडे किती जणांचे लक्ष जाईल हे सांगणे कठीण आहे; पण काही अपवादही असू शकतील. उदाहरणार्थ ना. शंकरराव चव्हाण. अग्रक्रमाने हा प्रश्न हाताळला पाहिजे, असे त्यांना तीव्रतेने वाटते आणि त्यासाठी पडेल ती किंमत मोजण्याची त्यांची अजूनही तयारी आहे. अशी आणखीही काही आशास्थाने नसतीलच असे नाही. अगदीच निराशाजनक परिस्थिती असती तर हा अंक तरी कसा निघू शकला असता?

अंकातील सिंहाचा वाटा अर्थात 'माणूस : एकलेखकी वर्षारंभ विशेषांका'चे लेखक विजय परूळकर यांच्याकडे जातो. कुटुंब नियोजन हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय. या क्षेत्रात आपल्या मायदेशात कार्य करायला मिळावे म्हणून त्यांनी आपली यू. नो.ची लठ्ठ पगाराची नोकरीही सोडण्याची तयारी दाखवली होती. सध्याही ते के. ई. एम्. हॉस्पिटलद्वारा चालू असलेल्या ग्रामीण आरोग्य योजनेत विनावेतन सहभागी झालेले आहेत व कुटुंब नियोजन-कल्याण कार्यक्रम व ही आरोग्य योजना यांचा मेळ घालण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. हा अंक म्हणजे या प्रयत्नांचा–धडपडीचाच एक भाग आहे. शंकरराव चव्हाण, डॉ. बानू कोयाजी, निहाल अहमद, माधवराव आपटे, विनायकराव पाटील या सर्व मुलाखती त्यांनीच घेतल्या. त्या वेगवेगळ्या प्रकारे लिहून काढल्या. लेखांची जमवाजमवही त्यांचीच. शिवाय स्वतःची कुटुंब नियोजन कथाही त्यांनी दिलखुलासपणे वाचकांना सादर केली आहे. छायाचित्रांची बाजू सौ. सरोजा परूळकर यांनी सांभाळल्यामुळे, थोडक्यात हा आणखी एक 'परूळकर अंक'च झालेला आहे. वर्षारंभीच्या मागील अंकाप्रमाणेच या अंकाचेही वाचकांकडून भरघोस स्वागत होईल अशी खात्री वाटते. अपेक्षा मात्र आहे स्वागतापलीकडे जाऊन प्रत्यक्ष काही कृती घडावी अशी. तनमनधनपूर्वक सर्वांनी यात लक्ष घातले तर हे रुतलेले चाक पुन्हा वर येणे मुळीच अवघड नाही. झाले ते होऊनी गेले। आता वर्तले पाहिजे जाणपणे ...

–संपादक





वाढत्या वयामध्ये वाढत्या जबाबदाऱ्या पार पाडायची तुमची कुवत खरोखरच कौतुकास्पद आहे. तुमची प्रत्येक कृति, 'यत्न तो देव जाणावा' या तुमच्या बाण्याला साजेशीच आहे. आमच्या सदाफुली आजीवन लाभ योजनेमध्ये याचे प्रतिबिंब आढळेल तुम्हाला.

सदाफुली...भविष्यकाळाचा वेध घेणारी सुंदर बचत योजना. दरमहा ठराविक रकमेची बचत करा...थोड्याच वर्षांसाठी... त्यानंतर आयुष्यभर दर महिन्याला चांगला लाभ मिळवा. मुदतीनंतर एक हाती रक्कम मिळण्याचीही सुविधा...प्रसंग विशेषी कर्जाची देखील सोय.

थोडक्यात, साऱ्या जीवनभर लाभ अन् आयुष्याच्या संध्यासमयी देखील समाधानाचे हास्य मिळवा...यासाठी हवे दारी लावायला सदाफुलीचे बीज.

अधिक माहितीसाठी आमच्या जवळच्या शाखेस भेट द्या.

**बँक ऑफ महाराष्ट्र**

(भारत सरकारचा उपक्रम)

मुख्य कार्यालय : पुणे

बँकिंग सेवा व्यक्तिगत जिव्हाळा

PRATIBHA 78-143



# आता तरी वर्तले पाहिजे जाणपणे....

विजय परूळकर

तीन-साडेतीन वर्षांपूर्वीचा एक प्रसंग. इराणमधील याझद ह्या प्रांतामधील एका दूरस्थ खेड्यामध्ये माझ्या एका फिल्मचं शूटिंग चालू होतं. सगळा मुलुख वाळवंटी. रेगिस्तान. चहू दिशांना क्षितिजापर्यंत ओसाड रेताड जमीन. अधूनमधून वाहत्या वाळूचे मुलायम रचनेचे सर्पाकृती लहरेदार डोंगर.

अशाच एका वळसेदार डोंगराआड एका खडकाला हजारो वर्षांपूर्वी निसर्गाच्या कृपेने पाझर फुटला होता. त्या पाझरातून एका गोड निर्मळ पाण्याच्या छोट्याशा झऱ्याचा जन्म झाला आणि त्याच्याभोवती शे-पन्नास इराणी शेतकऱ्यांच्या कुटुंबांनी वस्ती केली. वाळवंटाच्या रेताड उरावर एक छोटंसं हिरवंगार नंदनवन निर्माण केलं. 'त्या नंदन वनाचं नाव 'अश्क झर' – सुनहरे आसू.

माझ्याबरोबर माझा कौटुंबिक परिवार देखील होता. बायको आणि चार मुली.

सूर्य डोक्यावर येण्याअगोदर बरेच सीनस् चित्रित करून मी, माझं कुटुंब आणि इराणी साथीदार झऱ्याच्या काठी सतरंजी पसरून जेवणास बसलो. अश्कझरमधली स्थानिक मंडळी आमच्या अवतीभवती बसून त्यांच्यापैकी प्रत्येकाने आणलेला आपल्या घरातील अन्नपदार्थ आम्ही खावा म्हणून आग्रह करत मला आणि बायकोला ! हिंद ' आणि ' बानू

इंदिरा 'बद्दल अनेक प्रश्न विचारीत होती. त्यांच्यातला एखादा 'हिंद खैली बुजुर्ग, पीशरफ्त, वाली मामलीकत खैली ज्याद' (हिंदुस्थान खूप मोठा...प्रगती केलेला... पण लोकसंख्या अमाप) हेदेखील सुनावत होता. गप्पाटप्पा चालू असताना एका मध्यमवयीन स्त्रीनं बायकोला सवाल केला–

'फक्त मुलीच ? तुम्हाला मुलगा नाही?'

'हो. फक्त मुलीच आणि आता 'बस'; बायकोनं जबाब दिला.

ती मध्यमवयीन मुसलमान स्त्री आणखी काही प्रश्न विचारणार इतक्यात तरतरीत नाकाचा, पांढऱ्या शुभ्र दाढीचा एक वयोवृद्ध इसम संमतिदर्शक मान हलवीत धीरगंभीर आवाजात वदला–

'इन् दुरुस्त आस्त...हे अगदी बरोबर आहे...जमाना आवाज शुदे...जमाना बदलला आहे...पेसार दुखतार इमरूझ हीच फर्क नीस्त...मुलगा–मुलगी आज–काल काही फरक पडत नाही...खानुम खयाल–ए–शुमा सही आस्त...बाई, तुमचा विचार योग्य आहे.'

आणि 'या अली' म्हणत आकाशाकडे दोन्ही हात उंचावून त्यांनी माझ्या चार छोकऱ्यांसाठी आल्लातालाजवळ दुवा मागितला.

इराणसारख्या इस्लामिक देशाच्या वाळवंटी प्रदेशामध्ये दूरवर वसलेलं अश्कझर हे एक वस्तीवजा खेडं. त्या खेड्यामधला तेजस्वी नजरेचा हा मुसलमान पीर 'देशकालवर्तमान' ह्यानुरूप आचार–विचारात फरक पडणं केवळ साहजिकच नाही तर आवश्यकदेखील असल्याचे सांगत होता.

अल्लाकडे दुवा मागताना त्याला जणू सुचवायचं होतं...आचारा-विचारात जर असा फरक पडला नाही तर या देशाचा वर्तमान आणि भविष्यकाल फारसा उज्ज्वल किंवा आशादायक असणं संभवत नाही.

□

इतिहासाचार्य राजवाडेलिखित 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' हा ग्रंथ वाचताना मला त्यामध्ये एक खालील कथा आढळली.

'दक्षप्रजापतीला वरिणप्रजापतीची मुलगी असिक्नी इच्या पोटी पाच हजार पुत्र झाले. त्यांना बेसुमार प्रजावृद्धी करण्याच्या नैसर्गिक छंदात निमग्न होणाऱ्या बेतात असलेले पाहून, नारदाने अर्थशास्त्रीय उपदेश करून दूरदेशी घालवून दिले. नारद म्हणाला, 'तुम्ही प्रजावृद्धी करू इच्छिता खरे; परंतु वर्धमान प्रजेला अन्न पुरविण्याचे पृथ्वीला सामर्थ्य कितपत आहे ते प्रथम पाहा आणि मग प्रजावृद्धीला लागा!' नारदाचा हा उपदेश त्या पाच हजार पुत्रांना पटला व ते दूरदेशी जे अन्नशोधार्थ गेले ते पुन्हा परत आलेच नाहीत! बहुधा जिकडे गेले तिकडेच वस्ती करून कायमचे राहिले. अशा युक्तीने पाच हजार पुत्रांची वासलात लागल्यावर दक्षाने असिक्नीच्या ठायी पुन्हा एक हजार पुत्र उत्पन्न केले. त्यांचीही वाट पूर्वीच्याच प्रमाणे नारदांनी लाविली. मूळ आर्य लोकांची फाटाफूट होऊन पूर्वेकडे, पश्चिमेकडे, दक्षिणेकडे व उत्तरेकडे रशिया, जर्मनी, इटली, ग्रीस, हिंदुस्थान, तिबेट इत्यादी पृथ्वीभागात आर्यलोक अतिप्राचीनकाळी जे पसरले त्या प्रसाराचा हा इतिहास आहे.'

धन्य तो दक्षप्रजापती आणि त्याहूनही धन्य त्याची पत्नी महाराणी असिक्नी! यंग्या गबाळ्याचे हे काम नोहे. एक गोष्ट मात्र लक्षात घेण्यासारखी आहे की, दक्षप्रजापतीचे जे पुत्र पश्चिमेकडे गेले त्यांनीच फक्त 'अन्न पुरविण्याचे पृथ्वीला सामर्थ्य कितपत आहे ते प्रथम पाहा आणि मगच प्रजावृद्धीला लागा!' हा नारदमुनींचा उपदेश तंतोतंत पाळल्याचे आज आपल्या निदर्शनास येते. आपण मात्र नारदमुनींचो 'कळलाव्या' म्हणून बदनामी करीत प्रजावृद्धी करण्याच्या नैसर्गिक छंदात आजही संपूर्णपणे निमग्न झालेले आहोत. दक्षप्रजापतीच्या हजारो पुत्रांपैकी जे हिंदुस्थानात येऊन संतती निर्माण करण्यात रमले तीच आपली मूळ परंपरा.

अशी मूळ परंपरा असलेल्या भारतावर राज्य करणाऱ्या बिनरंगी इंग्रज सरकारचा कधीही न मावळणारा सूर्य जेव्हा हिटलरच्या बंबारींनी आणि महात्मा गांधींच्या असहकारितेने खंगत खंगत अस्ताला जात होता त्या काळात मी जन्मलो.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी मी आठ वर्षांचा होतो. पंडित जवाहरलाल नेहरूंनी लाल किल्ल्याच्या तटावरून इंग्रजीमध्ये Tryst with destiny चे भावनाप्रधान भाषण केले. घरामध्ये नवीनच आलेल्या रेडिओवर ते मी ऐकले. काहीच कळले नाही. Tryst with destiny म्हणजे नक्की काय? आज सहज गंमत म्हणून वाराणसीच्या भार्गवांच्या इंग्रजी हिंदी निघंटूच्या सहाय्याने ह्या वाक्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला तेव्हा तो 'भाग्य या प्रारब्ध को छिपकर मिलके गुप्त सभा लेनेका कारस्थान' असा काहीसा विचित्र, पण सद्यःपरिस्थितीचे यथार्थ व सूचक वर्णन करणारा निघतो. असो.

पंडित नेहरू दर पंधरा ऑगस्टला लाल किल्ल्यावरून भारताला संदेश देत. आम्ही पण दर पंधरा ऑगस्टला ध्वजारोहण, वंदन आणि शाळेला सुट्टी हे कार्यक्रम आनंदाने पार पाडीत 'ट्रिस्ट विथ् डेस्टिनी'चा मोका शोधीत वाढत होतो. अशाच एका पंधरा ऑगस्टनंतर पंडीतजींनी भारत देशामध्ये राष्ट्रीय पातळीवर कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम जाहीर केला. आम्हाला तेव्हा नुकतीच मिसरूड फुटू लागली होती. स्वतंत्र भारताप्रमाणेच आम्ही देखील वयात पदार्पण करीत होतो. पंडितजींनी जाहीर केलेल्या ह्या राष्ट्रीय कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाची कार्यवाही तेव्हाच्या आपल्या आरोग्यमंत्री राजकुमारी अमृत कौर ह्यांच्या नाजूक हातात होती. भारत सरकारने कुटुंब नियोजनाबद्दल राष्ट्रीय धोरण आखले त्याबद्दल सर्व जगाने भारताचे कौतुक केले. असे राष्ट्रीय धोरण धरणारा भारत हा तेव्हा एकमेव देश पृथ्वीच्या पाठीवर होता. कौतुकामुळे पंडितजी आनंदित झाले. राजकुमारी अमृत कौर तर इतक्या हुरळून गेल्या आणि तृप्त झाल्या की, कुटुंब नियोजनाबद्दल प्रत्यक्ष काही कृती करण्याचे भानच त्यांना राहिले नाही. एकदा कौतुक केले की काम न करणे हा तर आपल्या सर्वांचाच मूळ स्वभाव. तसाच तो राजकुमारींचादेखील. त्यामुळे त्यांना अवास्तव दोष देण्यात अर्थ नाही. खरे सांगायचे तर कुटुंब नियोजनाचे राष्ट्रीय धोरण जाहीर केल्यानंतर दस्तुरखुद्द पंडितजीच ते धोरण संपूर्णपणे विसरून गेले होते. हा तर पंडितजींचा खासा स्वभाव!

तो काळच तसा होता. तेव्हा सुंदर सुंदर कल्पनांचा नुसता पाऊस पडायचा. सर्वांचे कसे भव्य, दिव्य, उदात्त, त्यागी वगैरे वगैरे असायचे. (आज चरणसिंग आणि मोरारजी ह्यांच्यामध्ये जो 'फॅक्रनेस्' आहे तसे तेव्हा नव्हते) हुषार हुषार लोक मोठमोठ्या योजनांची आखणी करायचे, त्या लोकांहून

हुषार असलेले इतर अतिशहाणे मोठ्या योजनांतून छोटया छोटया नवनवीन योजना तयार करायचे. रोज नवीन योजना जन्माला यावयाच्या. योजनाच योजना! अनेक मध्यम-वर्गीय कुटुंबांनी त्या काळी जन्माला आलेल्या मुलीचे नाव योजना आणि मुलाचे नाव विकास ठेवल्याचे मला माहीत आहे. खऱ्या अर्थाने तो 'योजना-विकासाचा' काळ होता.

अपरंपार योजनांच्या निर्मितीमुळे अगोदरच्या अनेक योजना अर्धवट रहायच्या, काही अडगळीत पडायच्या आणि काही तर सुरू देखील व्हायच्या नाहीत! नुसताच कागदपत्रांचा ढीग! अशाच एका कागदपत्रांच्या ढिगात कुटुंब नियोजनाची योजना पंडितजींच्या काळी धूळ खात पडून होती. लोकसंख्येबद्दल 'काही तरी केले पाहिजे' हे पंडितजींना पटलं होतं; पण 'काय बरं करावं?' असा प्रश्न पडला असावा असा अंदाज.

हे सर्व चालू असताना भारताच्या लोकसंख्येने मात्र वाढीव वेग धरला होता. प्रगतिपथावर पाऊल टाकण्यास उत्सुक झालेल्या भारतात देवी टोचणे, कॉलरा, प्लेगप्रतिबंधक इंजक्शने देणे वगैरे कार्यक्रम आंतरराष्ट्रीय मदतीवर जोर धरीत होते. साथीच्या रोगाने माणसे मरण्याचे प्रमाण घटत चालले होते. त्याचबरोबर नेमेचि येणाऱ्या पंधरा ऑगस्टी पंडितजी वेगवेगळे संदेश भारतीय नागरिकांना देत प्रारब्धाबरोबर लपंडाव कसा खेळायचा ते शिकवीत होते. हा लपंडाव चालू असतानाच आम्हाला मात्र आमच्या भाग्याशी 'गुप्तसभा लेके मिलने का कारस्थान करने का योग प्राप्त हुवा' आणि ऑक्टोबर १९६४ साली मी विवाहबद्ध झालो. वय पंचवीस. प्रेमविवाह.

प्रेमविवाह खरा; पण १९६४ सालचा — म्हणजे संध्याकाळी दोन तास फक्त गप्पा मारणे. मी आणि माझी प्रेयसी लग्नानंतरच प्रथम स्त्री आणि पुरुष म्हणून एकमेकांना भेटलो. हीसुद्धा तेव्हाची — निदान आमची तरी रूढी.

लग्नाचा सोहळा करण्याच्या मी संपूर्ण विरुद्ध होतो. मला साधे सरळ रजिस्टर पद्धतीने लग्न करायचे होते. झाले रजिस्टर पद्धतीनेच; पण भाड्याच्या हॉलमधे. माझ्या बायकोच्या आई-वडिलांनी त्यांचे नातेवाईक आणि मित्रमंडळी ह्यांना जेवणास बोलाविले. माझ्या आई-वडिलांनीदेखील काही नातेवाईक आणि मित्र पंगतीस बोलाविले. मी आणि बायकोने रजिस्टरवर सह्या केल्या. इतर मंडळींनी प्रत्येकाच्या नावाखाली बारीक-सारीक घोळ घातला. रूढी म्हणून आणि त्या दिवशीच्या सहभोजनातच सर्व ज्येष्ठ मंडळींनी एकमेकांच्या बारीक-सारीक उखाळ्या-पाखाळ्या काढून एकमेकांना निष्कारण दुखाविले. एवढेच नव्हे तर काही जणांनी अनेक वर्षे रुसवा देखील धरला. तर अशी आमची रूढी.

लग्नानंतर सर्वच नवीन. एकमेकांचा चोवीस तासाचा सहवास देखील चुकतमाकत, एकमेकांना संभाळीत, समजावून घेत पुन्हा नव्याने आम्ही एकमेकांची खरी ओळख करून घेत होतो. बायको वीस वर्षांची. मी तिच्यापेक्षा पाच वर्षांनी मोठा. ओळख वाढली आणि बायकोची पाळी चुकली. आम्हा दोघांना अतिशय आनंद झाला. मुलगा झाला तर धनंजय, मुलगी झाली तर माधवी. आम्ही नावसुद्धा ठरवून टाकले. लग्नानंतर अकरा महिन्यांनी माधवी जन्माला आली.

'पहिला पाळणा आताच नको' हे आम्हाला तेव्हा माहीतदेखील नव्हते. तो प्रश्नच निर्माण झाला नाही. संततिप्रतिबंधक म्हणजे 'गर्भपातासाठी डॉ. खान याच्या श्री नॉट गोळ्या' ह्यापलीकडे तेव्हा आम्हाला इतर काही कल्पना नव्हती. लग्नाअगोदर माझ्या परदेशवाऱ्या अनेक झाल्या होत्या; पण तेव्हा (आणि आतादेखील — परदेशात) कंडोम किंवा रबरी पिशवी ही गर्मी–परमा वगैरेसारख्या गुप्त रोगांपासून बचाव करण्याची साधने, असाच प्रचार माझ्या माहितीत होता. माझी बायको M. B. B. S. च्या दुसऱ्या वर्षाला असताना कॉलेज सोडून विवाहबद्ध झालेली. तिला शरीरशास्त्र समजले होते; पण संततिनियमन किंवा साधनांचा वापर ह्याबद्दल कुठलीच विशेष माहिती नव्हती.

स्पष्ट सांगायचे तर तेव्हा संततिनियमाची साधने वापरण्याबद्दल आम्हाला कुणी उपदेशही केला नाही किंवा आम्ही स्वत: होऊन कुणाला काही विचारण्याच्या फंदात देखील पडलो नाही. पाळी चुकण्याची आम्ही दोघेही आतुरतेने वाट पहात होतो हेच खरे.

पंडित नेहरूंच्या पंतप्रधानकीच्या काळात माझे शालेय शिक्षण (?) कॉलेज एज्युकेशन (?) वगैरे पार पाडून मी नोकरीला लागलो. शास्त्रीजींच्या दोन–पावणे दोन वर्षांच्या कारकीर्दीत माझे लग्न होऊन मी एका लेकराचा बापदेखील झालो. शास्त्रीजींच्या आकस्मिक मृत्यूनंतर गुलझारीलाल नंदा हे दोन दिवस भारताचे पंतप्रधान होते तेव्हा आमची माधवी उपडी पडून रांगू लागली होती.

इंदिरा गांधींची राजवट सुरू झाली आणि दिल्लीमध्ये जागोजाग लाल त्रिकोण दिसू लागले. 'लिपीज लूप' भारतात आला. तेव्हाच्या आरोग्यमंत्री डॉ. सुशिला नायर यांची जर्मन टीव्हीसाठी छोटीशी मुलाखत मी चित्रित केली. लूपनंतर भारताच्या कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमात क्रांतिकारक फरक पडेल हे त्यांचे मत ऐकून मी प्रभावित झालो. सर्वत्र लूपचा जयजयकार सुरू झाला. संपूर्ण भारतात कँप सुरू झाले आणि लाखो स्त्रियांना लूप बसविण्यात आले. माझ्या बायकोनेदेखील लूप बसवून घेतला.

संतती–नियमनाचा आमचा हा पहिला जाणीवपूर्वक प्रयत्न. 'दुसरा पाळणा आताच नको' ह्या प्रचाराचा आम्हा दोघांवर निश्चितच परिणाम झाला होता. लूप बसविल्यानंतर बायकोला कसलाच त्रास झाला नाही. आमच्या शरीरसंबंधातही त्यामुळे कसलीही अडचण निर्माण झाली नाही. सुखासमाधानात आमचा संसार चालू होता. माधवी तीन वर्षांची झाल्यानंतर दुसरा चान्स घेण्याचे आम्ही ठरविले होते.

खेडोपाडी लूप बसविण्याचे कॅम्प मोठ्या धामधूमीत पार पडत होते. भारतीय नारीला लूप बसविण्याचा सपाटा सुरू झाला होता. अर्थशास्त्रतज्ज्ञ, विकासयोजनांचे संयोजक, राजकीय नेते, मंत्रीगण, डॉक्टरमंडळी उत्साहाने लूपवर बोलत होते. सेमिनार, रेडियो प्रोग्रॅम्स्, वर्तमानपत्रांचे रकाने — सर्व लूपमय झाले होते; पण लूपने शेवटी दगा दिला — भारतीय कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाला पुन्हा एकदा ठेच बसली. पर्यायाने आम्हाला देखील!

लूप असतानाच बायकोला दिवस गेले. वैद्यकीय तपासणीत गर्भधारणेची खात्री झाली

आणि तिसऱ्या महिन्यात लूप आपोआप बाहेर पडला. डॉक्टर-मित्रमंडळींनी आमची मनसोक्त चेष्टा केली आणि संपूर्ण नऊ महिने नऊ दिवस घेऊन स्वाती जन्मास आली. माधवी आणि स्वातीमध्ये दोन-वर्षांचे अंतर मी अठ्ठावीस वर्षांचा-बायको तेवीस वर्षांची. दोन पोरींचे आम्ही आई-बाप !

एव्हाना भारतामधील खेड्याखेड्यांतील भिंतींवर मोठाले लाल त्रिकोण रंगविले जात होते. 'कुटुंब लहान तर सुख महान' ही जाहिरातबाजी सुरू झाली होती. पुरुष आणि स्त्री नसबंदीचे कॅम्प्स लहान लहान प्रमाणात देशभर सुरू झाले होते. महाराष्ट्रामध्ये नसबंदी कार्यक्रमांनी बऱ्यापैकी जोर धरला होता. अनेक सुशिक्षित मध्यमवर्गीय लोक दोन मुलांनंतर स्वेच्छेने नसबंदी करून घेत होते.

दोन जीव जन्माला घातल्यानंतर आपण देखील नसबंदी करून घ्यावी असे एक-दोन वेळा मनात आले; पण कुठल्याही डॉक्टरकडे गेलो असता ते समजावणीच्या स्वरात म्हणायचे – 'तरुण आहात. सुखवस्तू आहात. दोघेही धडधाकट आहात. इतक्यातच नसबंदीची घाई कशाला करता? आणखी चान्स घ्या. दोन मुलींनंतर निश्चित मुलगा होईल तुम्हाला ! मग घ्या करून मिसेसचे ऑपरेशन –'

नसबंदी न करून घेण्याच्या डॉक्टरांच्या ह्या आग्रहाला मी तेव्हा फारसा विरोध केल्याचे स्मरत नाही. उलट डॉक्टर जर नको म्हणताहेत तर आपण उगाचच कशाला आग्रह धरा, असेच माझे मन म्हणत होते. त्याचबरोबर जसा मी माझ्या मातेच्या पोटी कुलदीपक जन्माला आलो तसाच एखादा कुलदीपक आमच्या पत्नीच्या पोटीदेखील उपजेल अशी थोडी-फार आशा मनात होतीच, हेही नाकारीत नाही. शेवटी चितेला अग्नी देण्यास कुणी तरी हवेच, नाही का ?

स्वातीच्या जन्मानंतर पाळणा लांबविण्याचा आम्ही निकरानं प्रयत्न केला. माझी नोकरी फिरतीची. महिन्यातून चार-पाच दिवस घरी मुक्काम. त्यामुळे संयमन, रिदम् मेथड वगैरे जमण्यासारखे नव्हते. स्वातीच्या जन्मानंतर आम्ही डायफ्रॅम आणि जेली वापरण्याचं ठरवलं; पण तो सर्वच प्रकार जरासा घोटाळ्याचा, किचकिचीचा आणि मन निरुत्साही करणारा भासू लागला. काही काळ कंडोम वापरले; पण तेव्हा मिळणारे कंडोम अगदीच कंडम होते. त्यांची शंभर टक्के खात्री देता येत नव्हती. पाळणा लांबवणं तर आवश्यक होतं. शेवटी डॉक्टरांनी, लूपनी केलेली पहिली फसगत हा अपवाद मानण्याचा उपदेश केला आणि बायकोने पुन्हा एकदा लूप बसवून घेतला.

काही महिने आम्ही निश्चिंत होतो; पण पुन्हा व्हायचा तोच गोंधळ झाला. गर्भधारणा. तेव्हा मी युनायटेड नेशन्सच्या नोकरीला नुकतीच सुरुवात केली होती. मुक्काम बँकॉक येथे.

एका जर्मन डॉक्टरीणबाईकडून बायकोनं तपासणी करून घेतली. तीन-चार महिने झाले; पण लूप बाहेर येण्याचं चिन्ह दिसेना. आम्ही दोघं जाम हादरलो. वाढत्या गर्भावर लूपचा काही विपरित परिणाम तर होणार नाही ना, अशी चिंता लागली. दिवस भरत आले तरी लूप आतच. बाळंतपणासाठी बायकोनं कोल्हापूर माहेर गाठलं. मी श्रीलंकेच्या दौऱ्यावर गेलो. कोलंबोला मला तिसऱ्या कन्येच्या जन्माची बातमी देणारी तार मिळाली. मी उलट तार केली–'अभिनंदन. आपण तिचं नाव राधा ठेवू आणि पुन्हा एकदा प्रयत्न करू !'

'पुन्हा एकदा प्रयत्न करू' असा संदेश तारेमधून देण्यास तेव्हा काही सबळ कारणं होती. युनोच्या नोकरीमुळे विविध क्षेत्रांतील आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांशी विचारांची देवाणघेवाण करण्याची संधी उपलब्ध झाली होती. अनेक विकासयोजनांवर उलटसुलट चर्चा ऐकावयास मिळत. जितके तज्ज्ञ तितकी मतं. औद्योगिकदृष्ट्या प्रगत झालेल्या पाश्चिमात्य राष्ट्रांच्या तज्ज्ञांची विचारसरणी औद्योगिक प्रगतीच्या मार्गावर असलेल्या देशांच्या तज्ज्ञांपेक्षा वेगळी. अप्रगत देशांतील तज्ज्ञांच्या म्हणण्याकडे कुणीच विशेष लक्ष तेव्हा तरी देत नसत. ऐकून घेत; पण केवळ उपचार म्हणून. प्रगत कोण ? प्रगती म्हणजे काय ? ह्याबाबत प्रत्येक देशाच्या तज्ज्ञांच्या विचारसरणीत 'मूलभूत' फरक असल्याचं वारंवार निदर्शनास येत होतं. अन्नमधून ही तज्ज्ञमंडळी कुटुंब नियोजन, वाढती लोकसंख्या वगैरे विषयांवर देखील विचार-गोष्टी करीत. १९६८–१९६९ सालचा हा काळ.

मी तेव्हा युनिसेफसाठी आग्नेय आशियामध्ये सकस आहार आणि माता-बालसंगोपन ह्या विषयांवर शैक्षणिक फिल्मस् बनवत होतो. ज्या विषयावर फिल्म बनवायची तो विषय संपूर्णपणे समजावून घ्यावयाचा माझा नियम आहे. त्यामुळे सकस आहार आणि माता–बालसंगोपन ह्याबद्दल मिळेल तेवढं मी वाचत होतो. त्या विषयातील तज्ज्ञांच्या गाठी–भेटी घेऊन शंकानिरसन करून घेत होतो. केरळ आणि मद्रास सरकारसाठी सकस आहाराच्या फिल्मस् बनवण्यासाठी मी सल्लागार म्हणून काम पहात असताना हैद्राबादच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ न्युट्रिशनचे मुख्य डॉ. गोपालन ह्यांची भेट झाली, त्यांच्यासाठी 'प्रोटीन कॅलरी मालन्युट्रिशन' आणि 'व्हिटॅमिन् ए डिफिशियन्सी' ह्या दोन फिल्मस् बनवीत असताना सकस आहार, समतोल आहार आणि त्याचे असाधारण महत्त्व ह्याबद्दल खूप माहिती मिळाली. शून्य ते चार ह्या वयोगटातील बालकांचा आहार सकस आणि समतोल असणं अत्यंत महत्त्वाचं आहे आणि ते सर्व भारतीय माता–पित्यांना समजण आवश्यक आहे. तेव्हा त्या दृष्टीनं लोकशिक्षण दिलं पाहिजे, असा डॉ. गोपालनचा आग्रह होता. ते स्वतः त्या दृष्टीने जोरदार प्रयत्न करीत होते.

शून्य ते चार–म्हणजे मातेच्या पोटात गर्भधारणा झालेल्या दिवसापासून ते जन्माला आलेले मूल चार वर्षांचे होईपर्यंतचा काळ. मुलाच्या सर्वांगीण वाढीच्या दृष्टीनं हा काळ सर्वांत महत्त्वाचा मानला जातो. गरोदर स्त्रीचा आहार सकस आणि समतोल असणं आवश्यक आहे. त्यामुळे गर्भाची वाढ चांगली होते. जन्माला आलेलं मूल अंगावर पीत असतानादेखील मातेनं सकस आहार घेणं आवश्यक आहे. सहा महिन्यांपासून मुलाला हळू हळू वरचं अन्न आणि नंतर सकस

आहाराची अत्यंत जरूर आहे.

शून्य ते चार ह्या काळात बालकाला योग्य आहार मिळाला नाही तर ते कुपोषित होते. असं कुपोषित बाळ मंदबुद्धी होण्याचा फार मोठा धोका आहे. त्याची शारीरिक वाढ बरोबर होत नाही. त्याच्यामध्ये रोग-प्रतिकारशक्ती कमी असते.

ह्या सर्व नवीन माहितीचा कुटुंब नियोजन कार्यक्रमाच्या संदर्भात माझ्या विचारावर एक वेगळा दबाव पडत चालला. १९६८–६९ ह्या काळामध्ये कुटुंब नियोजनाच्या प्रचारामुळे सुखवस्तु, सुशिक्षित मध्यमवर्ग आपल्या कुटुंबाचे नियोजन करण्याचा स्वेच्छेनं आणि मनापासून प्रयत्न करीत होता; पण खेड्या-पाड्यांतून, हरिजनवस्तीतून, कामगारांच्या चाळींतून, रोजगारीवर काबाडकष्ट करून हातातोंडी आयुष्याशी झगडत झोपडपट्टीत राहणाऱ्यांच्या खोपटयांमधून आणि इतस्तत: पसरलेल्या व्यावसायिक भिकाऱ्यांच्या टोळ्यांमधून मात्र भसासा मुलं जन्माला येत होती.

मला कुठं तरी लाल त्रिकोणाऐवजी लाल कंदील दिसू लागला. सकस आहाराची माहिती, शून्य ते चार ह्या काळात आवश्यक असलेल्या समतोल आहाराचा प्रश्न मनाला भेडसावू लागला. अर्धपोटी, अशक्त, भुकेल्या अशिक्षित माता–पित्यांच्या पोटी जन्माला येणारी कुपोषित मुलं आणि दुसरीकडे नियोजनाची कल्पना पटून मुलं पोसायची आर्थिक क्षमता असलेल्या सुशिक्षित मध्यम वर्गाने रोखून धरलेले जीव. ज्यांना एक मूल वाढवणंदेखील महाकठीण त्यांना आठ–आठ, दहा–दहा मुलं आणि जे सहज चार मुलं व्यवस्थित वाढवू शकतील त्यांनी मात्र दोन होताच 'बस्स' केलेलं. हा प्रकार असाच चालत राहिला तर वीस वर्षांनंतर भारताच्या लोकसंख्येचं चित्रं कशा प्रकारचं असेल ?

प्रश्नाचं उत्तर स्वच्छ दिसत होतं. सर्वच कुपोषित मुलं मरतात असं नाही. उलट ती नेटानं जगतात. ह्या दुबळ्या, मंदबुद्धी जीवांचं, दुबळ्या मंदबुद्धी तरुण-तरुणीत रूपांतर होतं. इवलाल्या छात्या, काटकुळे पाय, शक्तिहीन बारकाली मनगटं, निष्प्राण, भकास, दिशाहीन डोळे, खुजं शरीर आणि त्याहूनही खुजलेला मेंदू– अशी प्रजा भरमसाठ वाढली तर भारताचं काय होणार ?

हे सर्वच गणित कुठं तरी लवकरच चुकणार असं वाटायचं. त्यातच मधून मधून एखाद्या हरिजन पुढाऱ्याच्या तोंडून हरिजनांना कुटुंब नियोजन न करण्याबद्दल उपदेश होत असल्याच्या 'ऐकीव' बातम्या कानी पडायच्या. जातिसंस्था, धर्मसंस्था, आर्थिक पातळीवर वर्गवारीने जगणाऱ्या (लोअर क्लास– मिडल क्लास– अपर क्लास वगैरे) मंडळींच्या संस्था, वेगवेगळ्या विचारसरणीच्या राजकीय संघटना ह्या सर्वांमध्ये तेव्हा कुटुंब नियोजनाबद्दल हलकी कुजबुज चालू असलेलं जाणवायचं. ह्या सर्वांचा परिणाम माझ्या विचारसरणीवर तेव्हा निश्चितच झाला.

मी कुटुंब नियोजनाबद्दल उघड उघड माझी मतं मांडू लागलो. कुटुंब नियोजनाचा खरा अर्थ काय ? प्लॅनिंग–नियोजन म्हणजे 'दोन किंवा तीन' का तुम्हाला झेपतील आणि व्यवस्थित वाढविता येतील तेवढी ?

जे मुलाला जन्म दिल्यानंतर त्याचे व्यवस्थित संगोपन करू शकत नाहीत अशांना भरमसाठ मुलं होऊ देणं हा मानवतावाद, का अशांना अवास्तव मूलं होऊ न देणं हा मानवतावाद ?

हिंदूंनी नियोजन करायचं आणि मुसलमान, ख्रिस्ती लोकांनी धर्माच्या नावाखाली प्रजा वाढवायची ? सवर्णांची नसबंदी पण हरिजनांनी मन मानेल तेवढी संतति निर्माण करायची ? सुखवस्तु, मिडल क्लास 'दोन'-नंतर बंद आणि अर्धपोटी भुकेला झोपडपट्टीवाला मात्र बेबंद !

दहा वर्षांपूर्वी ह्या सर्व प्रश्नांनी मनात थैमान घातलं होतं. चूक काय, बरोबर काय काहीच धडपणे बुद्धीला कळत नव्हतं. तशातच एकदा 'लाइफ' ह्या प्रसिद्ध इंग्रजी मासिकाचा एक जुना अंक हाती पडला. अंकाच्या मधल्या पानावर रंगीत छायाचित्र होतं. ओसवाल्डनं ज्याचा खून केला त्या प्रेसिडेंट केनेडींच्या धाकट्या भावाच्या कुटुंबाचा तो रंगीत फॅमिल फोटो होता. बॉबी केनेडी, त्याची बायको आणि दहा मुलं. अकरावं मूल बॉबीच्या बायकोच्या पोटात वाढत असल्याचं फोटोवरून स्पष्ट दिसत होतं. बॉबी कॅमेऱ्याकडे पाहून केनेडीटाइप हसत होता. जणू तो मला सांगत होता–

'–तू–तू एका भिकार देशाचा नागरिक आहेस. तुझ्या झोळीत अमेरिका गहू टाकते तेव्हा तुला एक वेळचं जेवण मिळतं. तुझ्यासारख्या भिकारड्याला दोनपेक्षा जास्त मुलं होऊन उपयोगी नाही. तो अधिकार आमचा आहे ! बघ माझी मुलं कशी सशक्त, हसरी आणि टुणटुणीत आहेत ! अशा सशक्त लोकांनाच पृथ्वीचं राज्य करण्याचा अधिकार आहे. तुझ्यासारख्या भीकमाग्या कुपोषिताचं हे काम नाही !'

तो फॅमिली फोटोग्राफ पाहून मी मुळापासून हादरलो. विचारांचा एकच गोंधळ उडाला. कुटुंब नियोजनाकडे वेगळ्या दृष्टिकोनातून बघितलं पाहिजे, ही टोचणी लागली. पण वेगळा दृष्टिकोन म्हणजे काय ? तो आणायचा कुठून ? त्या दृष्टिकोनाच्या शोधात वेगवेगळ्या आशियायी राष्ट्रांच्या कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाविषयी माहिती मिळविण्याचा प्रयत्न सुरू झाला. आपण काय करतोय ? इतर राष्ट्रे काय करतात ?

'हे विश्वचि माझे घर' असे जर विश्वातील सर्वजण खरोखरच मानणार असतील तर पृथ्वीला लोकसंख्येचा असह्नीय भार खरोखरच झाला आहे का ? जगाची लोकसंख्या आणि जगातील अन्न-उत्पादनक्षमता हे विचारात घेता अन्न आणि पैसा सर्वांना पुरून उरण्याइतके आहे की नाही ? तसे जर असेल तर जगातील काही देशात लोक उपासमारीने का मरतात ? भुकेनं मानव मरत असताना अमेरिकेसारखं समृद्ध आणि मानवतावादी राष्ट्र कोटीकोटी टन गहू समुद्रात फेकू किंवा जाळू कसं शकतं ? ऑस्ट्रेलियासारखा वसाहतीतून निर्माण झालेला देश हजारो टन लोणी आणि तूप गाई-गुरांना कसं चारू शकतं ?

अमेरिकन घटनेचं पहिलं वाक्य आहे 'ऑल मेन आर बॉर्न ईक्वल.'

पण त्या वाक्याचा खरा अर्थ All men are born equal and they are all inferior to American superhumans असा तर नसावा ?

तीच गोष्ट आपल्या घटनेची. बिनरंगी माणसाची गुलामगिरी केलेल्या आमच्या मेंदूत असलीच भव्य–दिव्य वाक्यं घातली आहेत. हेतू चांगलाच आहे. 'हे विश्वचि माझे घर' ह्याइतकं उदात्त दुसरं काही असू शकेल का ? पण विश्व ते ऐकत नाही ना ! तशीच स्थिती ह्या वाक्यांची. न्याय, स्वातंत्र्य,

समानता ही प्राप्त व्हावीत म्हणून आणि भारताचे ऐक्य आणि व्यक्तीची प्रतिष्ठा यासंबंधी भरवसा देऊन त्यांच्यामध्ये मातृभाव वाढावा याकरिता... खरंच असं जर घडेल तर आपणच आपले राजे होऊ नाही का? पण असं घडतंय का? असं घडण्याच्या दृष्टीनं खरोखरीच काही प्रयत्न चालू आहेत का? का हा सगळाच नुसता शब्दांचा खेळ? फसवं मायाजाळ?

कुटुंब नियोजनाबद्दलचे वर लिहिलेले विचार दहा वर्षापूर्वी मी जेव्हा माझ्या मित्रांजवळ किंवा सहकाऱ्यांजवळ प्रगट करायचा तेव्हा बहुतेक सर्व माझ्यावर वेगवेगळे हेत्वारोप करायचे. त्यातला एक मुख्य आरोप माझे विचार क्लास माइंडेड् असल्याचा.

१९६९ साली आम्ही तीन मुलींचे आई-बाप झालो होतो. पुन्हा कुटुंब नियोजनाचा प्रयत्न सुरू झाला. पाश्चिमात्य प्रगत राष्ट्रांमध्ये सर्व परीक्षा पास होऊन 'पिल्' (गोळी) आशियामध्ये आली होती कुटुंब-नियोजनाच्या कार्यक्रमाला क्रांतिकारक चालना देणारा महत्त्वपूर्ण शोध, असा 'पिल्'चा गवगवा चारी दिशा गाजवू लागला. डॉक्टरी सल्ल्याने बायकोने 'पिल्' घेण्यास सुरुवात केली. तिला कसलाच त्रास झाला नाही. आमचे कौटुंबिक जीवन खऱ्या अर्थाने सुखी होऊ लागलं.

अडीच वर्षे सतत गोळी घेतल्यानंतर बँकॉकच्या जर्मन डॉक्टरीणबाईने काही महिने गोळी थांबवून संपूर्ण शारीरिक तपासणी करण्याचा सल्ला बायकोला दिला. तिने गोळी थांबवली आणि आम्ही इतर साधने वापरू लागलो. परिणाम गर्भधारणा. बँकॉकमध्ये गर्भपाताची कायदेशीर सोय नव्हती. १९७१ साली मुक्ता जन्माला आली आणि आम्ही चार पोरींचे आई-बाप झालो.

१९७१ ते १९७८ आम्ही नियोजन केले. म्हणजे बायकोने 'पिल्' घेतली. १९७७ च्या अखेरीस बायकोचा उजवा पाय एकाएकी सुजला. पायाच्या रक्तवाहिनीत रक्ताची गुठळी होऊन तिला थ्रॉबोफ्लेबायटिस हा गंभीर आजार झाला. डॉक्टरांनी 'पिल्' ताबडतोब थांबवण्याचा सल्ला दिला. वास्तविक मी ताबडतोब नसबंदी करून घेणे आवश्यक होते. आज जाऊ, उद्या जाऊ म्हणत ते राहून गेले.

'पिल्' बंद होऊन बायको थ्रॉम्फ्लेबायटिसमधून संपूर्ण बरी झाल्यावर आम्ही निरोध आणि डायफ्रॅमचा वापर करण्याचे ठरवले. काही तरी कुठे तरी चुकले आणि तिला पुन्हा दिवस गेले. पुण्यामध्ये पहिल्या महिन्यातच तिने गर्भपात करून घेतला तेव्हा डॉक्टरांनी टय़ुबेक्टोमीचा सल्ला दिला. मी विरोध केला.

स्त्री-नसबंदीपेक्षा पुरुष-नसबंदी फारच सोपी आहे, हे तत्त्वतः मला मान्य असल्यामुळे स्वतःचे ऑपरेशन करून घेणे हे जास्त बरोबर, म्हणून मी हा अंक वाचकांच्या हाती पडण्याअगोदर शस्त्रक्रिया करून घेण्याचा निश्चय केला.

माझ्या कुटुंबाची कुटुंबनियोजनाची कथा सांगण्यामागचा मुख्य हेतू त्यामधून आपल्या १९६४ सालापासूनच्या कुटुंबनियोजन कार्यक्रमाचा एक धावता अहवाल देण्याचा हा प्रयत्न आहे.

कुटुंबनियोजनाची सर्व साधने वापरून, चार जीवांना जन्म देऊन आणि एक गर्भपात ह्यानंतर मी पुरुषनसबंदी हाच एकमेव उपाय, ह्या निर्णयाप्रत येऊन पोचलो आहे. वयाच्या चाळिसाव्या वर्षी, चौदा वर्षांच्या वैवाहिक जीवनानंतर हा निर्णय घेण्यास मन तयार झाले.

ह्या चौदा वर्षांत कुटुंबनियोजनाच्या वेगवेगळ्या सोयींचा, साधनांचा अनुभव घेत शेवटी नसबंदी ह्या अंतिम उपायाशी स्थिर जसा झालो त्याचप्रमाणे कुटुंबनियोजनाबद्दलच्या माझ्या विचारसरणीमध्ये देखील कालानुरूप फरक पडत मी 'सक्तीचे कुटुंब-नियोजन' ह्या विचाराशी आता स्थिर झालो आहे. सध्या तरी हाच एक मार्ग भारतासमोर दिसतो आहे. दुसरा पर्यायच नाही.

इंदिरा गांधींनी आणीबाणी जाहीर केली. त्यांच्या वीस कलमी कार्यक्रमात सक्तीचे कुटुंब नियोजन हे कलम नव्हते. नसबंदीच्या कार्यक्रमाने वेग घेतला तो संजय गांधीमुळे. त्यात अनेक बऱ्या-वाईट गोष्टी घडल्या हा भाग वेगळा. महाराष्ट्राने क्रांतिकारक पाऊल उचलले. शंकररावजी चव्हाणांनी सक्तीच्या कुटुंब नियोजन कायद्याचे बिल पास केले.

मी तेव्हा इराणमध्ये होतो. युनोची नोकरी. तुर्किस्तान आणि इराण ह्या देशांसाठी कुटुंब नियोजनाबद्दल शैक्षणिक फिल्म बनविण्याचे काम चालले होते. टर्कीमध्ये खेड्या-खेड्यांतून गावठी उपचारांनी गर्भपात करण्याचे प्रमाण फार मोठे आहे. अशा गर्भपातांमध्ये मृत्यूचे प्रमाणदेखील चिंता करण्याइतके मोठे आहे. टर्कीच्या पहिल्या फिल्मचा विषय 'गर्भपातापेक्षा संततिनियमन बरे' असा होता इराणला 'दोन किंवा तीन पुरे' ह्या स्वरूपाची फिल्म पाहिजे होती. त्याऐवजी 'दोन मुलांमधील अंतर' हा विषय मी त्यांना सुचविला. इराणने तो मान्य केला. संपूर्ण फिल्म दोन मुलांमधील अंतर आणि दोन फळझाडांमधील नियोजित अंतर अशा प्रकारची वेगवेगळी प्रतीके वापरून केली. टर्की, अफगाणिस्तान, पाकिस्तान, इराण ही सर्व इस्लामिक राष्ट्रे आहेत. ह्या राष्ट्रांमधून संततिनियमन आणि कुटुंबकल्याण ह्याविषयी लोकशिक्षणाचे प्रामाणिक प्रयत्न चालू आहेत. त्याबद्दल नंतर एखाद्या लेखात विस्ताराने माहिती देईन. जाता जाता एवढेच नमूद करतो की, पाकिस्तानमध्ये भुत्तोंच्या राजवटीत हा कार्यक्रम अतिशय चांगल्या पद्धतीने राबविला जात होता. सध्या काय चालू आहे, ह्याची मला काहीच माहिती नाही.

तर इराणमध्ये मी ह्या फिल्मस् बनवत असताना तेथील आपले राजदूत श्री. राम साठे यांची गाठभेट पडायची. तेव्हा मी माझ्या डोक्यातील काही कल्पना त्यांच्याकडे मनमोकळेपणे बोलायचो. तेदेखील मनापासून सर्व ऐकत मार्गदर्शन करायचे. भारतामध्ये आणीबाणीच्या काळात नसबंदी कार्यक्रमाने जोर धरला होता. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लोकशिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे, असे मला सारखे जाणवत होते. त्याबद्दल अनेक कल्पना मी श्री. साठेंच्या समोर मांडत असे.

शेवटी सर्व कल्पनांचे एकत्रीकरण करून

## टर्की, अफगाणिस्तान, पाकिस्तान, इराण....लोकशिक्षणाचे प्रयत्न

मी एक छोटा रिपोर्ट तयार केला आणि तो आपले तेव्हाचे आरोग्यमंत्री डॉ. करणसिंग यांचेकडे पाठवून दिला. रिपोर्टसोबत जोडलेल्या पत्रात मी डॉ. करणसिंगांना लिहिले होते की, माझ्या काही सूचना त्यांना विचारार्ह वाटल्या तर मी युनोच्या नोकरीचा राजीनामा देऊन लोकशिक्षणाचे काम हाती घेण्यास तयार आहे. त्या पत्रात असे देखील लिहिले होते की, जरूर पडल्यास मी दिल्लीला येऊन प्रत्यक्ष भेटेन.

त्याप्रमाणे रजा काढून तेहरानहून दिल्लीला आलो. अनेकांशी रिपोर्टवर चर्चा करून तेहरानी परतलो. डॉ. करणसिंगांनी निर्णय कळविण्याच्या आत भारतामध्ये आणीबाणी उठल्याची बातमी कळली आणि त्यानंतर मतदान.

इंदिरा गांधींची राजवट कोसळून पडली. नसबंदी हे एक प्रमुख कारण ठरले. आणीबाणी उठल्यानंतर आपल्या सर्वच वर्तमानपत्रांनी नसबंदी कार्यक्रमाबद्दल अतिशय अविचारी बोंबाबोंब केली. राजनारायण ह्यांनी तर निवडणुकाअगोदर आणि नंतर आरोग्य आणि कुटुंबकल्याणमंत्री असताना देखील 'नसबंदी म्हणजे खच्चीकरण' असा आरडाओरडा फार हिणकस पद्धतीने केला. निवडणुका संपल्या, जनता पार्टीचे सरकार झाले–त्यांच्या आपापसात यथेच्छ लाथाळ्या देखील लागलीच सुरू झाल्या. वर्तमानपत्रांनी विचार स्वातंत्र्याचा दुरुपयोग पहिले काही महिने नसबंदीबद्दलच्या खऱ्या खोट्या बातम्यांचे भांडवल करण्यात केला. शहा आयोग सुरू झाल्यावर सर्व वर्तमानपत्रवाले सुखावले. रोज त्यांना रकानेच्या रकाने भरून रेडिमेड मटेरियल मिळू लागले. 'जस्टिस शहांनी अमुक अधिकाऱ्यास घाम फोडला' ('तव्यावर बसविला,' 'निखाऱ्यावर भाजला' इ.) असे सनसनाटी मथळे देण्यामध्ये संपादकमंडळी स्वतःस धन्य मानू लागली.

शहा आयोग संपल्यानंतर काय लिहावे ह्या प्रश्नदेखील वृत्तपत्रांना पडला नाही. आपल्या सगळ्या वृत्तपत्रांचा आवडीचा विषय म्हणजे राजकारण. देशात त्याच्याशिवाय दुसरे काहीच घडत नाही आहे. चरणसिंग, मोरारजीभाई वगैरे वयोवृद्ध नेते आपापली वये विसरून बिगरीतील मुले चिंचेच्या बटुकावरून जशी भांडतात तसे भांडत बसले आहेत. ही मोठाली माणसं फार तत्त्वप्रिय आहेत आणि 'देश खड्ड्यात गेला तरी हरकत नाही; पण आपण आपलं तत्त्व सोडणार नाही,' अशा तत्त्वकर्कश भूमिका उराशी धरून हे सर्व नेते भारताची कबर खोदण्यात रंगलेले आहेत. कुटुंब नियोजनाचं कुटुंब कल्याण झालं, पण एकमेकांचं कल्याण किंवा अकल्याण करण्यात अहोरात्र गुंतलेल्या राष्ट्रीय, राजकीय आणि स्थानिक नेत्यांना देशकल्याणाकडे लक्ष देण्यास सवडच मिळेनाशी झाली.

कुटुंब नियोजनाचा, लोकसंख्यानियंत्रणाचा खरा संबंध विकासयोजनांशी असायला हवा. तसा तो होता देखील. दुर्दैवाने आज हा विषय राजकारणाशी निगडित झाला आहे. ह्याला जबाबदार आपण सर्वच म्हणजे तथाकथित सुशिक्षित मध्यमवर्गीय दीडशहाणेच आहोत. आमच्यासारख्या वाचाचतुर शब्दवीर लोकांना देशाचे कल्याण कशात आहे हे कळते तर सर्व लटांबर बरोबर घेऊन पानिपतला मार खाण्याचा प्रसंग आम्ही स्वतःवर ओढवून घेतला नसता! □

पुण्याच्या के. ई. एम्. हॉस्पिटलच्या काही डॉक्टरांच्याबरोबर मागील महिन्यात मी हवेली आणि शिरूर तालुक्यातील खेड्यांतून फिरत आरोग्यविषयक माहिती गोळा करीत होतो. दिवस आषाढाचे, म्हणजेच रोगराईचे. कॉलऱ्याच्या साथीची लागण होण्याची वेळ. कुठल्याही खेड्यातून वांती किंवा ओकारी झाल्याची बातमी आल्यास ताबडतोब लस टोचायला सुरुवात करायची म्हणून संबंधित अधिकारी जय्यत तयारीत दिसले.

आणि वांती झाल्याची बातमी एका खेड्यातून आली. कॉलऱ्याच्या लशीचे बल्बज् आणि इंजक्शने घेऊन अधिकारीमंडळी तातडीने खेड्याच्या दिशेने रवाना झाली. इतक्यात दुसऱ्या खेड्यातून 'ओकारी' झाल्याची वार्ता आली. लस आणि सुया घेऊन दुसरा गट त्या दिशेने धावला. तिसऱ्या खेड्यातून खबर आली–'उलट्या सुरू झाल्यात'–चौथे खेडे–पाचवे–चोहो बाजूंनी 'वांती', 'उलट्या', 'ओकाऱ्या' सुरू झाल्याच्या खबरीवर खबरी! इतकी मोठी लागण! सर्वजण चिंताक्रांत झालेले दिसले.

पहिल्या खेड्याकडे लस टोचण्याच्या सुसज्ज तयारीने गेलेल्या अधिकाऱ्याला वेशीआत शिरताच एक चमत्कारिक दृश्य नजरेस पडले. वडाच्या पारावर समस्त गावकरी मंडळी आरामात तंबाखू चोळीत, बिड्या फुंकीत 'आयडियेची कल्पना' वगैरे शहरी जोकस् मारीत ऊन खात बसली होती. खंडीभर पोरे देखील सर्वत्र आटयापाट्या आणि आंधळी कोशिंबीर खेळण्यात रमलेली. सर्व काही नॉर्मल दिसत होते. कॉलऱ्याच्या साथीत गाव असे दिसत नाही. त्यावर अवकळा पसरलेली असते. इथे पहावे तर सर्व आनंदी आनंद आणि उत्साहाचे, उत्सवाचे वातावरण दिसत होते.

कॉलरा–प्रतिबंधक लस टोचणारा गटाधिकारी गोंधळला. त्याला पाहून वडाच्या पारावरचे गावकरी गोंधळले. सरपंचांनी पिचकारी टाकली आणि प्रश्न केला,

'काय हो डाकतर, तुम्ही इथे कशाला?'

'वांत्या!' डाकतर म्हणाले.

'मग त्यासाठी तुम्ही कशाला? आम्हाला येयेन् येम्म पाहिजे.'

'येयेन् येम्म?' डाकतर आणखीनच गोंधळले.

'आवो, म्हंजी ऑक्झिलरी नर्स मिडवाइफ–आपल्या अकोळकर बाई!'

'त्यांचा आणि कॉलऱ्याचा काय संबंध?' डाकतर.

'आता तुम्हीच सांगा-ह्या वांत्यांचा आणि कॉलऱ्याचा काही तरी संबंध हाये का?' सरपंचांनीच उलट सवाल केला.

तर ही लागण वेगळी होती. ह्या वांत्या कॉलऱ्याच्या नव्हत्या. श्रीमान राजनारायण ह्यांच्या पंधरा महिन्याच्या कारकीर्दीची ही लागण होती. त्यांच्या सल्ल्यानुसार सर्व मंडळींनी आत्मसंयमन, ब्रह्मचर्य, आयुर्वेदिक झाडपाला, युनानी जडीबुटी वगैरेचा वापर करून कुटुंब कल्याण केले होते. परिणामांती प्रत्येकाच्या कुटुंबाला वांत्या सुरू झाल्या होत्या. आता राजनारायण नाहीत; पण नवीन येणाऱ्या आरोग्य आणि कुटुंब कल्याणमंत्र्यांना ह्या सर्व स्त्रियांची डोहाळजेवणे आणि जन्माला येणाऱ्या लाखो मुलांचे बारसे करण्याची वेळ येणार आहे!

सक्तीचे कुटुंब नियोजन होणार नसेल तर कुटुंब कल्याण योजनेत डोहाळजेवण आणि बारसे ह्यांची सर्व व्यवस्था तरी सरकारने हाती घेणे आवश्यक आहे.

शिवाजीला मौल्यवान उपदेश देणाऱ्या एका संताने म्हटले आहे, 'झाले ते होऊनी गेले। आता तरी वर्तले पाहिजे जाणपणे.' □

# आत्ताच सावध झालो नाही तर पाचच वर्षांत माणूस माणसाला खायला उठेल हे मला अगदी स्पष्ट दिसतंय....

## मा. शंकररावजी चव्हाण



मुलाखत :

विजय परूळकर

शंकररावजी चव्हाण. एक अतिशय सरळ, स्वच्छ मनाचा, शिस्तीची आवड असलेला नेता. ज्यांना शिस्त आवडत नाही, कर्तव्य-दक्षता पेलत नाही ते शंकररावजींना 'हेड मास्तर' म्हणतात. ज्या लोकांच्या गलथान कारभार करण्याची सवय अंगवळणी पडली आहे, हलगर्जीपणा हा ज्यांचा स्वभावधर्म आहे अशा लोकांना शंकररावजींची भीती वाटते. 'भलताच कडक आणि करडा माणूस !' असं त्यांच्या-बद्दल ह्या अकार्यक्षम पण तोंडावर गोड बोलणाऱ्या लोकांचं मत आहे. सरळ स्वच्छ वागणं, मनातलं स्पष्टपणे उघड करणं, थोडे–फार रांगडे बोलणं हे ज्यांना मानवत नाही आणि संस्कृत सुभाषितांमधून टोमणे मारीत 'लिलिपुटीयन्' कारस्थानात सदैव रमण्याची ज्यांना अपरंपार हौस आहे अशी काही मंडळी म्हणतात-'शंकररावांना जरासं डिप्लोमॅटिक वागणं जमलं असतं ना तर 'त्यांचं' आणि 'आमचं' एकदम पटलं असतं...पण माणूस अगदीच बाणासारखा सरळ– राजकारणात हे कसं चालायचं ?'

मला स्वतःला करारी, स्पष्ट बोलणारी, मन उघडं करणारी, हरामाचा पैसा न घेणारी, गरिबांसाठी अंतःकरणपूर्वक धडपडणारी; शाब्दिक घोळ न घालता कार्य तडीस नेण्यास उत्सुक असलेली; कर्तव्यदक्ष. अगदी तत्त्वनिष्ठुर म्हणावी इतकी साधी सरळ, त्याच-बरोबर थोडी–फार देवभोळी, व्यवहारात अतिशय चोख आणि सरळ असणारी माणसं फार आवडतात, आदरणीय वाटतात. माझे वडील अशापैकीच एक होते. एक करारी, निर्मळ चारित्र्याचा सीधासाधा माणूस.

शंकररावजींच्याबद्दल मला आदर आहे तो वरील कारणांसाठीच. 'माणूस'साठी कुटुंब नियोजन ह्या विषयावर मी त्यांच्याशी चर्चा केली, त्यांची मुलाखत घेतली आणि त्यांचे मनमोकळे बोलणे, आपले मत निर्भीडपणे मांडणे ह्या गोष्टींनी माझा आदर द्विगुणित झाला.

भारतामध्ये येऊन मला आता नऊ महिने झाले. ह्या नऊ महि-न्यात कुटुंब नियोजन ह्या विषयावर उघडपणे मत मांडणारे मला

कुणीच भेटले नाहीत. के. ई. एम्. हॉस्पिटलच्या डॉक्टर बानू कोयाजी हा अपवाद. ' अतिरेका ' बद्दल बोलायला मात्र अनेक मंडळी तत्पर आणि उत्सुक दिसली.

दिवसागणिक कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम मागे पडत चालला होता. ह्याबद्दल 'जनते 'च्या मनात पुन्हा एकदा जागृती निर्माण करणे जरुरीचे भासू लागले; पण कुठले वृत्तपत्र किंवा मासिक किंवा साप्ताहिक ह्या विषयावर मतप्रदर्शन करून फुकाफुकी आपल्या पायावर धोंडा पाडून घेणार ? सध्या मध्यवर्ती शासनाचा आणि बहुतेक सर्व राजकीय पुढाऱ्यांचा अत्यंत नावडता विषय म्हणजे कुटुंब नियोजन! 'माणूस ' ने पुढाकार घेतला. ' तुला ह्या विषयावर लिहायचे आहे ना ?' श्रीभाऊ माजगावकर म्हणाले-' चल-लिही-आपण संपूर्ण अंकच ह्या विषयावर काढू! '

झटपट तयारी सुरू झाली. ' केव्हाही या, ' असा शंकररावजींचा निरोप मिळाला आणि मी मुंबई गाठली. विषय ' स्फोटक. ' कुणीही आमदार किंवा मंत्री ह्याबद्दल निःसंदिग्धपणे काही बोलेल ह्याची खात्रीच नव्हती. तशात मराठवाड्यात ठिणगी पडली होती. असे असून देखील शंकररावजींनी अतिशय मनमोकळेपणाने ह्या विषयावर चर्चा केली. तीच आपणापुढे मांडीत आहे.

हेतू ' सक्ती ' ' अतिरेक ' ' आणीबाणी ' ह्याबद्दल विचारांची पुन्हा खळबळ माजविण्याचा नसून, कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम पुन्हा यशस्वी रितीने राबविण्याचा मार्ग शोधणे हा आहे.

**मी :** सध्याच्या राजकीय परिस्थितीत कुटुंब नियोजन किंवा लोकसंख्यानियंत्रण ह्याबद्दल निश्चित असे शासकीय धोरण आहे का ? मध्यवर्ती शासनाने जनसंख्या नियंत्रणाबद्दल शासकीय धोरण जाहीर करणे आवश्यक आहे का ? सध्याचे धोरण लोकसंख्येचीच वाढ थांबवण्यात यशस्वी ठरेल का ? आज अनेक लोकांच्या मनात या प्रश्नांनी नाना प्रकारचे संभ्रम निर्माण झाले आहेत. आपले ह्याबद्दल काय मत आहे ?

**शंकररावजी :** लोकसंख्या नियंत्रित करण्याचे आजचे धोरण लोकसंख्येची वाढ यशस्वीपणे काबूत आणू शकेल, असे मला स्वतःला वाटत नाही. ह्या सर्वच प्रश्नाबद्दल फार गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे असे मी स्वतः मानतो.

आम्ही जेव्हा सक्तीच्या कुटुंब नियोजनाचा प्रस्ताव (बिल्) मांडला तेव्हा लोकांचे ह्या प्रश्नाकडे लक्ष वेधावे हाच फक्त मूळ उद्देश होता. कुटुंब नियोजन करणे अगत्याचे आहे अशी लोकांमध्ये भावना निर्माण करण्याचा तो प्रयत्न होता. आपण जर स्वेच्छेने कुटुंब नियोजन केले नाही तर सरकारमार्फत त्याबद्दल काही तरी कारवाई केली जाईल, अशी लोकांना जाणीव असावी हा त्यामागचा हेतू होता.

फार मोठ्या प्रमाणावर बळजबरी करणे किंवा लोकांच्यावर कारवाई करणे हा उद्देश अजिबात नव्हता.

सुदैवाने म्हणा, दुर्दैवाने म्हणा, आपल्या इथे परिस्थिती अशी आहे की, लोकांना जोपर्यंत कायदा केल्याशिवाय एखाद्या गोष्टीचे महत्त्व पटवून देऊ शकत नाही तोपर्यंत ' कायदा करणे ' ह्याखेरीज दुसरा कुठलाच मार्ग आपल्यापुढे नसतो.

आज ह्या सर्वच कार्यक्रमाला उलटो दिशा मिळाली आहे. निवडणुका लढविताना मतभेदाचे अनेक विषय असू शकतात. भारताच्या दुर्दैवाने काही लोकांनी कुटुंब नियोजनाचा विषय हाच निवडणुका लढविण्याचा मुख्य विषय केला. त्यामुळे नसबंदी करणे हा काही एका ठराविक वर्गाचा किंवा राजकीय गटाचाच कार्यक्रम आहे, इतरांना त्यात काहीच करावे असे वाटत नाही, अशी काही तरी विचित्र भूमिका अनेकांनी घेतली.

मला स्वतःला मात्र असे वाटते की, ह्या देशाचे दारिद्र्य जर घालवायचे असेल तर जोपर्यंत आपण लोकसंख्येवर नियंत्रण बसवीत नाही तोपर्यंत इतर कसलेही विकासाचे कार्यक्रम आपण आखले तरी ते सर्व तोकडे पडणार आहेत. आज ज्या गतीने विकासाची अंतिम फळे गाठण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत– आणि दुसरीकडे ज्या स्फोटक प्रमाणात जनसंख्या वाढत आहे– ह्या दोहोंमध्ये मेळ उरलेला नाही.

लोकसंख्या जर आटोक्यात आली नाही, ती नियंत्रित केली गेली नाही तर मग मात्र त्यामधून फार भयानक स्वरूपाचे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता निदान मला तरी स्पष्ट दिसते.

**मी :** महाराष्ट्र सरकारने सक्तीच्या कुटुंब नियोजनाचे बिल जेव्हा मंजूर केले तेव्हा ह्या कार्यक्रमाने चांगलाच वेग घेतला होता. महाराष्ट्र सरकारची यंत्रणा आणि सरकारी कर्मचारी अतिशय तत्परतेने हा कार्यक्रम राबविण्यासाठी सिद्ध झाले. हा कार्यक्रम राबविला जात असताना निदान महाराष्ट्रामध्ये तरी, इतकी प्रचंड आणि अवास्तव टीका करण्याइतक्या मोठ्या प्रमाणात सक्ती, जुलूमजबरदस्ती किंवा अक्षम्य हलगर्जीपणा झाला नसावा. उलट सरकारी यंत्रणा संचलित शक्तीने हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अतिशय दृढनिश्चयाने कार्यमग्न झाली असण्याची शक्यताच जास्त आहे. जुलुम–जबरदस्ती आणि हलगर्जीपणाची थोडीबहुत उदाहरणे सापडतीलच. ती कुठल्याही कार्यक्रमात शोधून काढता येतात.

आज मात्र परिस्थिती अशी आहे की, कुटुंब नियोजनाबद्दल काही करण्यासाठी आपण होऊन कुणीही पुढे येत नाही. सर्वत्र निरुत्साहाचे, दबावाखाली असल्यासारखे वातावरण आहे.

आणीबाणी संपल्यानंतर, निवडणुकांच्या प्रचारासाठी, नसबंदीच्या कार्यक्रमावर अविवेकी झोड उठविण्याचा अदूरदर्शीपणा अनेक राजकीय पुढाऱ्यांनी केला. वृत्तपत्रांनीदेखील ह्या कार्यक्रमाचे महत्त्व लक्षात न घेता केवळ ' इंदिरा हटाव ' ह्यासाठी नसबंदीवर एकांगी गदारोळ माजविला.

इंदिरा गांधींची राजवट कोसळली, जनता पार्टीचे सरकार आले; पण आजदेखील वृत्तपत्रे कुटुंब नियोजनाकडे ज्या गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे तसा प्रयत्न करताना दिसत नाहीत. ह्या परिस्थितीत कुटुंब नियोजनाचा हा महत्त्वाचा प्रश्न आता लोकांसमोर मांडायचा तरी कसा ?

**शंकररावजी :** खरे म्हणजे हा लोकशिक्षणाचा प्रश्न आहे. लोकांना ह्या कार्यक्रमाचे महत्त्व पटवून देणाऱ्या कार्यकर्त्यांची आज फार मोठी गरज आहे. केवळ सरकारी यंत्रणेमार्फत ह्याबद्दल काही केले जाईल किंवा होऊ शकेल, ह्यावर माझा फारसा विश्वास नाही.

दुर्दैवाने आज जितके पक्ष आहेत त्या पक्षातील मंडळींना ह्या प्रश्नाचे महत्त्व जितके पटले पाहिजे तितके पटल्यासारखे निदान मला तरी आढळत नाही.

शाब्दिक सहानुभूती ते व्यक्त करतात. सक्ती, जुलूम, जबरदस्ती नको असे म्हणतात– पण त्याचबरोबर कुटुंब कल्याणासाठी लोकशिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे आणि त्यासाठी काही योजना आखणे आवश्यक आहे हे लक्षात न घेता उलट त्या प्रश्नाकडे संपूर्ण दुर्लक्षच ह्या मंडळींकडून होतेय, असे मला तरी वाटतेय.

ह्या प्रश्नासंबंधी आपण जर वेळेवर योग्य दिशेने पावले उचलली नाहीत तर मात्र फार भयानक स्वरूपाचे प्रश्न देशाच्या आणि महाराष्ट्राच्या समोर निर्माण होतील.

मी : मला तर असे वाटते की हे 'लोकशिक्षण' वेगवेगळ्या थरांतील आणि पातळीतील 'लोकांसाठी' करण्याची आज जरूर आहे.

नव्यानव्यानेच सत्तेवर आलेल्या मंडळींना आणि त्यांच्या त्यांच्या पक्षातील राजकीय पुढाऱ्यांना २·१, ३·१ किंवा ४·२ अशी लोकसंख्येची वाढ झाली तर काय होईल ह्याचे चित्र डोळ्यांसमोर नीटसे उभे रहात नसावे, असा माझा अंदाज आहे. लोकसंख्येची वाढ ४·२ ह्या गतीने झाली तर काय होईल ह्याची जाणीव असल्यासारखे वागताना कोणी दिसत नाही. म्हणूनच हे 'लोकशिक्षण' वरपासून करण्याची आज पाळी आली आहे का ?

शंकररावजी : आता वरपासून लोकशिक्षण करण्याची वेळ आली आहे असे मी काही म्हणणार नाही– मी स्वत: असे मानतो की; वरच्या मंडळींना ह्याचे महत्त्व पटलेले आहे, असले पाहिजे आणि म्हणूनच जनसामान्यात कुटुंब नियोजनाविषयी अतिशय वाईट मत असतानादेखील काहीजणांनी हा कार्यक्रम अतिशय महत्त्वाचा आहे अशी वक्तव्ये तरी केली आहेत; पण नुसत्या वक्तव्याने हा प्रश्न सुटणार नाही. लोकांमध्ये काही अतिशय चुकीच्या कल्पना आहेत.

काही लोकांना असे वाटते की, मुले होणे ह्या नैसर्गिक कृतीच्या विरुद्ध काही तरी करण्याची खटपट काही विशिष्ट मंडळींकडून होत आहे. धर्माशी ह्या कार्यक्रमाचा संबंध आहे, अशीदेखील काही लोकांची समजूत आहे ह्या सर्व मंडळींना समजावून सांगण्याचे मी स्वत: खूप प्रयत्न केले.

त्यांना मी म्हणालो की, कुटुंब नियोजन, नसबंदी हे सर्व अधार्मिक आहे असे तुम्ही जे समजता तसे नाही आहे. नीतीला सोडून काही तरी करण्याचा प्रयत्न चालू आहे असे तुम्ही मानीत असाल तर ती अतिशय चुकीची कल्पना आहे.

आता तुम्हाला सांगायला हरकत नाही, एका धर्माच्या मंडळींनी मला सांगितलं की, 'आमच्या धर्माप्रमाणे हे निषिद्ध आहे.' मी त्यांना म्हणालो: 'मुंबई शहरामधीलच आकडेवारी मी तुम्हाला दाखवितो. तुम्ही लोक आम्हावर जीव मारण्याचा निषिद्ध प्रयत्न करणारे असा आरोप करता; पण खरी परिस्थिती ह्याहून अगदी उलटी आहे. मी त्यांना विचारलं – मुंबई शहरामध्ये तुमच्याच धर्माच्या किती बायका गर्भपात करून घेतात ? गर्भपातामध्ये तर प्रत्यक्ष निर्माण झालेला जीवच मारला जातो आणि आमची खटपट तर जीव निर्माणच होऊ नये ह्यासाठी आहे. ह्या दोहोंपैकी निषिद्ध कुठलं ?'

मी : मला वाटतं, आज हा कार्यक्रम लोकांना पुन्हा एकदा नव्यानं समजावून सांगण्याची फार जरूर आहे. पूर्वीदेखील तो कधी नीट समजावून सांगितला गेला नव्हताच... पण 'लोकशिक्षण' हाती घेण्याअगोदर सरकारनं ह्याबद्दल काही तरी ठाम आणि निश्चित स्वरूपाचं धोरण जाहीर करणं आवश्यक नाही का ? कुटुंब नियोजनावर राजकीय पातळीवर धोरण असणं सर्वप्रथम जरुरीचं आहे.

शंकररावजी : राजकीय पातळीवर घेतलेला निर्णय आहेच–निदान महाराष्ट्रात तरी आहे– आणि तिथं काही अडचण येईल असं मला स्वत:ला वाटत नाही. धोरण आहे, पण त्याची अंमलबजावणी करण्यासाठी स्वेच्छेनं पुढाकार घेणाऱ्या स्वयंसेवकांची, कार्यकर्त्यांची मात्र आज फार उणीव आहे.

मी : ... पण आज अशा कार्यकर्त्यांची, स्वयंसेवकांची, सरकारी कर्मचाऱ्यांची फार मोठी कुचंबणा झाली आहे. एखाद्या सरकारी डॉक्टरकडे एखादी स्त्री किंवा पुरुष नसबंदीसाठी स्वेच्छेनं जरी आला असेल तर नसबंदीची शस्त्रक्रिया शक्यतो टाळण्याचा प्रयत्न तो डॉक्टर करतो. उद्या जर त्या स्त्रीला किंवा पुरुषाला काही झालं तर आपल्यावर विनाकारणच ठपका येईल, असं त्याला वाटतं. अनेक डॉक्टरांना असं वाटत असावं.

काही सरकारी अधिकाऱ्यांनी आणि डॉक्टरांनी तर मला स्पष्ट सांगितलं की, दिल्लीमध्ये नवीन सरकार आल्यावर आम्हाला नसबंदी शस्त्रक्रियेच्या भानगडीत न पडण्याच्या सूचना आल्या होत्या.

भूतपूर्व आरोग्यमंत्री डॉ. करणसिंग ह्यांनी कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाची दमदार आखणी केली. राजनारायण मंत्री झाले तेव्हा त्यांनी 'कुटुंब कल्याण' असं व्यापक स्वरूप त्या कार्यक्रमाला देण्याचा विचार प्रकट केला; पण प्रत्यक्षात घडले काहीच नाही.

उलट पहिल्या दोन महिन्यांत आपल्या वक्तव्यांनी राजनारायण ह्यांनी संतति नियमनाच्या कार्यक्रमाचं अतोनात नुकसान केले. त्याचे दुष्परिणाम आजदेखील चालू आहेत.

अशा परिस्थितीत महाराष्ट्रामध्ये सक्तीच्या कुटुंब नियोजनाचा कायदा पुन्हा अमलात येण्याची शक्यता कितपत आहे ?

शंकररावजी : महाराष्ट्रात सक्तीच्या कुटुंब नियोजनाचा प्रस्ताव पुन्हा नव्यानं आणण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. महाराष्ट्र असेंब्ली आणि कौन्सिल, दोहोंनी हे बिल पास केलं आहे.

आता जे काही ह्याबाबत करायचं आहे त्याची सर्व जबाबदारी मध्यवर्ती शासनाकडे आहे आणि त्यांचा आग्रह एवढाच आहे की, तुम्ही त्यामधील 'सक्ती' हा शब्द फक्त काढून टाका आणि मग बाकीचं बिल अमलात आणावयास तुम्हाला काही हरकत नाही.

पण मला स्वत:ला अजूनही असं वाटतं की, जोपर्यंत तुम्ही 'कुटुंबनियोजन हे एक राष्ट्रीय धोरण आहे, त्याबद्दल आपणाला काही तरी करावंच लागणार आहे ह्याला दुसरा पर्याय नाही असं लोकांच्या मनात ठसवीत नाही तोपर्यंत ह्या कार्यक्रमाला आवश्यक ती चालना मिळणं शक्य नाही.

मी : 'सक्ती' हा शब्द वापरणे आज जरा जड जाते. आणी-

## 'स्वेच्छेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची आज खरी गरज आहे'

बाणीनंतरच्या अनुभवाचा हा परिणाम असावा. म्हणून अनुत्तेजन (disincentives) ह्यावर आज जर भर दिला तर? प्रलोभने (incentives) नकोत. त्यामधून माणसे पकडून आणणे, टारगेटस्, दलाली वगैरे पुन्हा होण्याची शक्यता आहे. त्याऐवजी तुला जर तीनपेक्षा जास्त मुले झाली तर बँकेचे कर्ज मिळणार नाही– इतकेच काय तर चवथ्या मुलाचे नाव रेशन कार्डावरदेखील लिहिले जाणार नाही असे काही ठरविता आले तर?

शंकररावजी : माझ्या कल्पनेप्रमाणे 'इन्सेन्टिव्ह' आणि 'डिस्इन्सेन्टिव्ह' ह्यामधून हा प्रश्न सुटू शकेल असे मला वाटत नाही. नुसत्या 'डिस्इन्सेंटिव्हज्'नी आपण शिक्षा करतो प्रथम जन्माला आलेल्या मुलाला आणि मग त्याच्या पालकाला; पण त्यामधून लोकसंख्येचा प्रश्न सुटत नाही.

प्रश्न जर सोडवायचा असेल तर चौथे मूल होऊ नये ह्याबद्दल पालकांना प्रवृत्त करणे हे जास्त महत्त्वाचे आहे. ज्याला आपण सद्हेतूने केलेली आग्रहाची सक्ती (coercive persuasion) असे म्हणतो त्याखेरीज इतर कुठल्याही मार्गाने प्रगतीसाठी धडपडणाऱ्या देशांमध्ये दुसरा कुठलाही मार्ग यशस्वी होईल आणि विकास घडवून आणील, असे मला वाटत नाही.

मी : आणीबाणीच्या काळात आणि त्यानंतर वृत्तपत्रांनी हा विषय योग्य तऱ्हेने हाताळला की त्याबद्दल गैरसमजच करून घेतले असे आपल्याला वाटते?

शंकररावजी : फार मोठ्या प्रमाणावर त्यांनी गैरसमज करून घतले आणि वाचकांचे पण करून दिले.

लाखामध्ये पाच-दहा शस्त्रक्रिया चुकीच्या झाल्या असतील तर त्यांचेच अतिभडक वर्णन करण्याचा त्यांनी सपाटा लावला; पण अतिशय मोठ्या संख्येने ज्या शस्त्रक्रिया चांगल्या प्रकारे केल्या गेल्या त्यांची स्तुती मात्र कुणीही केली नाही किंवा त्या डॉक्टरांचे कौतुकही केले नाही.

एखाद्या चुकीच्या ऑपरेशनचे भांडवल करून मात्र सबंध महाराष्ट्रभर जणू काही अशाच प्रकारचा नसबंदी कार्यक्रम चालू आहे असे वातावरण मात्र त्यांनी निर्माण केले. हे असे करण्यामागे त्यांचा हेतू काय हे मला कळले नाही. म्हणूनच त्याबद्दल त्यांच्यावर काही आरोप मी करणे हे बरोबर नाही.

लाखामध्ये दहा शस्त्रक्रियादेखील चुकीच्या होऊ नयेत असे माझे स्वतःचे स्पष्ट मत आहे; पण काही कारणाने तशा जर त्या झाल्या तर त्याबद्दल इतका भडक प्रचार करण्याची जरुरी होती असेही मला वाटत नाही.

आता ज्याबद्दल विचार चालू आहे त्या दारुबंदीच्या धोरणाचे उदाहरण घ्या. दारुबंदीच्या धोरणामध्ये 'कोअरसिव्ह पर्सवेशन'च आहे ना? सर्वसामान्य नागरिक स्वेच्छेने दारुबंदी स्वीकारील अशी भावना निदान मला तरी दिसत नाही. ज्यांना दारू पिण्याची सवय आहे ती माणसे नुसती व्याख्याने ऐकून दारू पिण्याचे सोडणार नाहीत. दारुबंदी ही अंतिमतः त्याच्या हिताची गोष्ट आहे, हे मान्य करून त्याला कायद्याने दारू पिण्याची बंदी घालणे आवश्यक आहे. अशीच भूमिका आज घेतली जात आहे. त्या दृष्टीने प्रयत्नदेखील चालू आहेत.

मला तर वाटतं की, लोकसंख्या नियंत्रण आणि नसबंदी हे कार्यक्रम दारुबंदीपेक्षा देखील महत्त्वाचे आहेत. कुटुंब नियोजन ही अन्तिमतः माणसाच्या हिताचीच गोष्ट आहे. त्यामुळे दारुबंदीचा जर आम्ही कायदा करणार असलो तर त्याहीअगोदर कुटुंब नियोजन कायदा होणं जरुरीचं आहे.

ह्याबद्दल खोट्या मानवतावादी भ्रामक विचारात आणि समजुतीत आपण जर अडकून राहिलो तर नुसत्या 'उदात्त विचारांचा' काहीही उपयोग होणार नाही. कुटुंब नियोजन हा एक गंभीर विषय आहे आणि त्याच्याकडे अतिशय गांभीर्याने लक्ष पुरवून पावलं उचलली पाहिजेत.

मी : कुटुंब नियोजन हा विकासाशी निगडित असलेला प्रश्न आज राजकारणाचा विषय झाला आहे. त्यामुळेच सर्व अडचणी निर्माण झाल्या आहेत.

शंकररावजी : मला हे पूर्णपणे मान्य आहे. आज ह्या समस्येकडे पहाण्याची दृष्टीच साफ बदलली आहे. देशाच्या दृष्टीने ही फार मोठी दुर्दैवी घटना आहे. आज वेगवेगळ्या राजकीय गटांनी एकत्र येऊन ठरविलं पाहिजे की, ह्यापुढे कुटुंब नियोजन ह्या विषयाचं राजकीय भांडवल करावयाचं नाही. ही 'बेसिक कोड ऑफ कॉन्डक्ट' सर्वांनी जर मान्य केली – अशी आचारसंहिता राखली – तरच हा प्रश्न सुटू शकेल.

आज सर्वसामान्य माणूस वैतागलेला आहे. विशेषतः स्त्री–वर्ग. आम्ही सर्व जण स्त्रियांना बरोबरीचा दर्जा देण्याची भाषा बोलतो; पण सर्वसामान्य भारतीय स्त्रीचं जवळ जवळ, तीनचतुर्थांश आयुष्य हे मात्र फक्त मुलांना जन्म देणं आणि त्यांना वाढविणं यामधेच खर्ची पडतं. त्यामधून उरलेल्या एकचतुर्थांश आयुष्यातून ती जे थोडं फार कर्तृत्व दाखवू शकेल त्याचाच फक्त समाजाला उपयोग होतो. म्हणजे स्त्रियांनी मुख्यतः मुलांना जन्म देणे आणि त्यांना वाढविण्यात सारे आयुष्य खर्च करणे, असा त्याचा अर्थ निघतो.

आज वेळ अशी आली आहे की, स्त्री–वर्गानेंच मोठ्या संख्येनं पुढाकार घेऊन कुटुंब नियोजन कार्यक्रम अंमलात आणला पाहिजे, असा आग्रह धरायला हवा. अनिर्बंध प्रजोत्पादनाचा सर्वांत मोठा दुष्परिणाम स्त्रियांवर होतो.

इतरही अनेक वेगळे प्रश्न विचारात घेण्याची आवश्यकता आहे. आमची जेव्हा मुख्यमंत्र्यांची कॉन्फरन्स झाली होती तेव्हा मी एक मुद्दा मांडला होता – एखाद्या राज्याची लोकसंख्या जर वाढली तर त्या प्रमाणात त्यांना जास्त प्रतिनिधित्व मिळण्याचा अधिकार रद्द केला पाहिजे. लोकसंख्येच्या प्रमाणात अधिकार मागणे हे तत्त्व जर काढून टाकलं तर ज्यांना असं वाटतं की, आपल्याला काही तरी जास्त सवलती मिळतील ते त्यांच्या डोक्यातून निघून जाईल.

तशा प्रकारच्या सूचना मग मध्यवर्ती शासनानं राज्यशासनांना दिल्या होत्या. ठराविक काळामध्ये जी लोकसंख्या असेल त्या प्रमाणातच तुम्हाला जिल्हा परिषद, असेंब्ली अगर पार्लमेंटमध्ये प्रतिनिधित्व मिळेल. वाढलेली लोकसंख्या ध्यानात घेतली जाणार नाही.

मी : आजदेखील ही सूचना राज्यपालांना दिलेली आहे का?

शंकररावजी : आता मला प्रत्यक्षात सांगता येणार नाही की, सूचना तशीच आहे का आणखी काही उलटोच केली आहे.

मी : कुटुंब नियोजनाची आजची स्थिती किंवा धोरण असंच चालू राहिलं तर ?

शंकररावजी : तर पाचच वर्षात तुम्हाला त्याचे फार भयानक परिणाम अनुभवास येतील. ज्या गतीने आज लोकसंख्या वाढत आहे त्याचा पाच वर्षानंतरचा आकडा विचारात घेतला तर मला स्वतःला तरी माझ्या डोळ्यांसमोर एक अतिशय भेडसावणारं चित्र दिसतं आहे. त्या वेळी ह्या वाढलेल्या लोकसंख्येसाठी काहीएक करता येणार नाही. माणूस माणसाला खायला उठेल, हे अगदी स्पष्ट दिसतंय !

मला स्वतःला हे जाणवतंय त्याचं मुख्य कारण, गरिबांसाठी कार्यक्रम अंमलात आणीत असताना मी ह्या सगळ्या गोष्टींचा खूप बारकाईने अभ्यास केला आणि मला असं पटलं की, कुटुंबनियोजनचा हा मार्ग आपण पत्करला नाही तर गरीब जनतेला जे देण्याचा आपण प्रयत्न करतो आहोत ते सर्व तोकडं पडणार आहे.

दुर्दैवानं सत्य परिस्थिती अशी आहे की, गरिबांच्या घरीच जास्त मुलं जन्माला येतात आणि अनेक श्रीमंत माणसांना मुलं दत्तक घेण्याची पाळी येते.

सध्या जे चालू आहे हे असंच राहिलं तर त्यातून फक्त दारिद्रय वाढण्याचीच शक्यता आहे.

माणसाचं दारिद्रय दूर करण्याची मनापासून इच्छा असेल तर त्याला शिकविलं पाहिजे. समजावून सांगितलं पाहिजे – तुझं दारिद्रय दूर करण्याच्या प्रयत्नाला तूदेखील जरा हातभार लाव. समाजाने तुझी जबाबदारी घ्यावी असं वाटत असेल तर तूदेखील समाजावर वाजवीपेक्षा जास्त बोजा टाकू नकोस. हा निर्धार करणं तुला आवश्यक आहे.

पण मागील निवडणुकांनंतर विचार करण्याची सर्व तऱ्हाच बदलून गेली आहे. कुटुंब नियोजनाविषयी आपण काही बोललो तर विनाकारण अडचणीत येऊ, त्यापेक्षा न बोललेलं बरं, अशी वृत्ती निर्माण झाली आहे.

मी : अगदी खरं आहे. आज एखाद्याशी बोलताना मी कुटुंब नियोजन हा शब्द वापरला तर तो पटकन उपदेश करतो – ' नियोजन म्हणू नकोस – कल्याण म्हण ' – इतका ह्या शब्दाबद्दल गैरसमज पसरलेला आहे.

आज वैयक्तिक पातळीवर माणसामाणसांशी संपर्क साधून त्याचं मनं वळविलं पाहिजे. लोकशिक्षणानं हे काम केलं पाहिजे. प्रौढ शिक्षणात वेगळ्या, लोकांना सहज समजेल अशा माध्यमातून हा प्रश्न समजावून दिला पाहिजे.....

शंकररावजी : यासाठी प्रचारयंत्रणांचा, शैक्षणिक माध्यमांचा पुरेपूर वापर करावाच लागेल.

मी : मला असे वाटते की, आज जर हजार-दोन हजार सामाजिक शिक्षण देणारे स्वयंसेवक आणि कार्यकर्ते, खेडोपाडी जाऊन हा कार्यक्रम लोकांना नीट प्रकारे समजावून देण्यासाठी उभे करता आले तरी ह्या कार्यक्रमाला पुन्हा एकदा मोठी चालना मिळेल.

आपली वर्तमानपत्रे ह्याबद्दल विधायक स्वरूपाचे काम कितपत करू शकतील ह्याबद्दल मी स्वतः साशंक आहे. जनमानस प्रभावित करण्याची क्षमता वर्तमानपत्रांकडे निश्चितच आहे– पण कुठल्या प्रकारे प्रभावित करण्यासाठी ? गदारोळ उठविण्यासाठी, चळवळींना जन्म देण्यासाठी. प्रत्यक्ष विधायक कामासाठी जनमानस प्रभावित करण्याची त्यांची ताकद कितपत आहे ह्याबद्दल मात्र विचार करायला हवा.

विकासोन्मुख, विकासाला सहाय्यक ठरेल अशा प्रकारचे लिखाण करण्याची आपल्या वृत्तपत्रांची प्रथा नाही. राजकारण आणि चळवळ ह्यासाठी काही तरी सातत्याने लिहिणे. राजकारण हाच सर्व वर्तमानपत्रांचा आवडता विषय.

टेलिव्हिजनचा वापर तर फक्त शहरातूनच होतो आहे आणि सध्या ज्या प्रकारचे कार्यक्रम त्यावरून प्रसारित होत आहेत त्यांचा माणूस घडविण्यासाठी कितपत उपयोग होतोय त्याचादेखील विचार करणे आवश्यक आहे. अशा कार्यक्रमातून सर्वसामान्य ऐंशी टक्के लोकसंख्येला काय प्रेरणा मिळत असतील हेच मला कळत नाही. खेडोपाडी टेलिव्हिजन पोहचला पाहिजे हे खरे; पण त्यावरून दाखवायचे काय !

रेडियो मात्र फार मोठी कामगिरी बजावू शकेल – जर त्यांनी मनात आणले तर !

येत्या दोन ऑक्टोबरपासून प्रौढ शिक्षणाचा, सहाशे कोटी रुपयांचा एक महागडा कार्यक्रम जाहीर होणार आहे. त्या कार्यक्रमातून कुटुंब नियोजनाचा, कुटुंबनियंत्रणाचा, कुटुंब कल्याणाचा संदेश प्रौढ–साक्षरांना देणे अतिशय महत्त्वाचे आहे...

शंकररावजी : हे जरूर केले पाहिजे. कुटुंबजीवनाचे शिक्षण ह्या कार्यक्रमाद्वारे लोकांना दिले गेले पाहिजे. नियोजनाचे महत्त्व पटविले पाहिजे. भरमसाठ मुले असलेल्यांचे आज काय हाल होत आहेत ह्याचे चित्रदेखील लोकांच्या समोर मांडले पाहिजे. असा जर प्रामाणिक प्रयत्न केला तर त्याचा फार चांगला प्रभाव पडेल; पण हे सर्व संदेश कशा पद्धतीने लोकांसमोर मांडले जातात त्यावर सर्व अवलंबून आहे. संदेश देणाऱ्यांना ह्या कार्यक्रमाचे महत्त्व अगोदर मनापासून पटलेले असले पाहिजे. घरसोडपद्धतीने, काही तरी ह्याबाबत सांगितले पाहिजे अशा वृत्तीने वरवरचे गुळमुळीत संदेश देऊन त्यांचा काही उपयोग होणार नाही. अंतःकरणापासून संदेश देण्याचे हे काम केले पाहिजे. अशा प्रकारे लोकशिक्षण देऊ शकणारे कार्यकर्ते ह्या क्षेत्रामध्ये फार मोठे काम करू शकतील असा माझा स्वतःचा विश्वास आहे.

मी : हा प्रयत्न पूर्वीच झाला असता तर सर्वसामान्य माणूस स्वेच्छेने, स्वयंस्फूर्तीने नियोजन करण्यास तयार झाला असता. वेगवेगळ्या धर्मांच्या, जातींच्या समाजात जुलूम, जबरदस्ती, सक्ती ह्याबद्दल इतके गैरसमज पसरले नसते. अर्थात भारताची लोकसंख्या नियंत्रित करण्याचीच तेव्हा वेळ येऊन ठेपली होती. आणि आज तर ही वेळ टळून चालली आहे का असा प्रश्न निर्माण झालाय ...

## ' असंच चालू राहिलं तर फक्त दारिद्र्य वाढणार आहे '

शंकररावजी : मला पूर्णपणे मान्य आहे; पण तेव्हादेखील मी अनेकांना समजावून सांगितले – तुम्हाला पूर्णपणे मोकळीक आहे – बिलकूल जबरदस्ती करीत नाही – तुम्ही स्वेच्छेने प्रयत्न करून पहाणार असलात तर त्याचे स्वागतच केले जाईल– पण मला त्यातून निश्चित स्वरूपाचे परिणाम दाखवा – आकडेवारी दाखवा – Show me the results ... पण तुम्ही जर नुसतेच स्वयंस्फूर्तीने करतो, आम्हाला वर्षानुवर्षे परवानगी द्या असे म्हणत राहिलात तर जमणार नाही. तुम्हाला मुदत देतो– वर्ष, दोन वर्षं पण तुम्ही मला रिझल्ट दाखवा. त्या वेळी काही ख्रिश्चन मंडळींना सांगितले, गर्भपाताच्या केसेस ख्रिश्चन लोकांच्यात किती आहेत ह्याची आकडेवारी मी तुम्हाला दाखवितो. हे चांगले का नसबंदी चांगली, ख्रिश्चन धर्माच्या दृष्टीने कुठले जास्त चांगले ते तुम्हीच मला सांगा.

मी : आणीबाणीच्या काळातील किंवा त्याअगोदरच्या कुठल्याही वर्षाची आकडेवारी पाहिली तर कुठल्याही एकाच धर्माच्या, जातीच्या किंवा गटाच्या लोकांवर अन्याय होत होता असे दिसून येत नाही.

शंकररावजी : एकाच धर्माचे, जातीचे लोक पकडून त्यांच्यावर सक्तीने शस्त्रक्रिया केली जात आहे असे कुठेच नव्हते. मी स्वत: ग्रामीण भागात फिरून ह्याची पहाणी केली आहे, चौकशी केली आहे.

सगळ्या जाती–जमातींचे, धर्मांचे लोक पद्धतशीरपणे कँपमध्ये येत हे मी स्वत: पाहिलेले आहे. तिथे काही हेतुपुरस्सर भेदभाव केला जात होता अशी एकही तक्रार माझ्याकडे आलेली नाही.

मी : तेव्हा विचारस्वातंत्र्य नव्हते. त्या आणीबाणीच्या काळात आपल्यापर्यंत तक्रारी कदाचित पोहचल्याच नसतील.

शंकररावजी : आणीबाणी जूनमध्ये जाहीर झाली – पण आमचा कार्यक्रम त्याच्या आधीपासून सुरू झाला होता. तेव्हा तुम्ही म्हणता तो प्रश्न येण्याची शक्यताच नव्हती. इतरांचे सोडून द्या, पण माझे मित्र आहेत ना पुष्कळ, ज्यांनी खाजगी रीतीने मला निश्चितच माहिती दिली असती.

मला स्वत:ला तरी कुठे काही फार मोठ्या प्रमाणात चुकीच्या पद्धतीने ह्या कार्यक्रमाची अंमलबजावणी होत आहे असे पहायला मिळाले नाही. एकाही कार्यकर्त्याने येऊन मला सांगितले नाही की, ह्याबाबतीत फार मोठ्या प्रमाणावर जुलूमजबरदस्ती होत आहे.

मी : महाराष्ट्रात फार मोठ्या प्रमाणावर जुलूमजबरदस्ती झाली असावी ह्यावर माझादेखील व्यक्तिश: विश्वास नाही. काही थोड्या ठिकाणी अनुचित प्रकार जरूर घडले. बार्शीला रस्त्यातून लोक पकडले गेले तेव्हा दंगल घडली. उदगीरच्या कँपमध्ये निव्वळ हलगर्जीपणामुळे काही प्रकार घडले.

दुसऱ्या एका प्रश्नाबाबत मी अनेक शिक्षकांशी बोललो. तुमचा पगार अडकवून ठेवला होता ? तुम्हाला बदलीची धमकी दिली जात होती ? प्रत्येक शिक्षक म्हणायचा– 'मला नाही, पण कुलकर्णी गुरुजींना तसा अनुभव आला.' कुलकर्णी गुरुजींना विचारले असता ते म्हणायचे 'मला नाही हो – पवार गुरुजींना तसा अनुभव आल्याचं कांबळेगुरुजी सांगत होते,' असाच सर्व प्रकार. 'आमच्या खेड्यात घडलं नाही; पण पलीकडच्या खेड्यात घडल्याचं आम्ही ऐकलं'–एक प्रकारची व्हिस्परिंग कँपेन ...

शंकररावजी : काही ठिकाणी प्रत्यक्ष तसे प्रकार घडले असण्याची शक्यता मी नाकारीत नाही. माझ्या निवडणुकीच्या वेळी भाषणासाठी मी एक ठिकाणी गेलो असता एक शिक्षक उभे राहिले आणि म्हणाले – 'तुम्ही आमच्यामागे टारगेट्स् लावले होते. आमचा पगार मिळणार नाही असं आम्हाला सांगण्यात आलं होतं ...' मी त्या शिक्षकांना म्हणालो, 'टारगेट्स होता ही गोष्ट खरी आहे. महिन्याकाठी किती केसिस झाल्या पाहिजेत हे आम्ही तुम्हाला कळविलं होतं; पण कुठल्या केसिस करायला सांगितलं होतं ? म्हाताऱ्या लोकांच्या ? अहो, टारगेट दिलं होतं ते नियोजनपात्र जोडप्यांपैकी एकाची शस्त्रक्रिया करण्याचं. लग्न न झालेल्या व्यक्तीची नसबंदी करण्याचं आम्ही तुम्हाला सांगितलं होतं का ? '

मी : सध्या मी के. ई. एम.च्या एका प्रॉजेक्टसाठी अनेक खेड्यांतून फिरतो आहे. टारगेट पूर्ण केलं नाही म्हणून पगारच दिला नाही असं उदाहरण निदान माझ्या पहाण्यात तरी आलं नाही. त्याचप्रमाणे लग्न न झालेल्या व्यक्तीची नसबंदी झाल्याचं उदाहरण देखील पाहिलं नाही.

हरयाना, उत्तरप्रदेश दिल्लीच्या आसपासची खेडी इथं जे प्रकार घडले तसले काही महाराष्ट्रात तरी घडले असावे असे वाटत नाही. आमच्या इथं हा कार्यक्रम खूपच चांगल्या रीतीने राबविला जात होता.

काही ठिकाणी काही डॉक्टरमंडळी दोन–तीन मिनिटात ऑपरेशन्स पार पाडायची, घड्याळाकडे पाहून तासाभरात कोण जास्ती शस्त्रक्रिया करतो अशा प्रकारची चढाओढ लागायची. त्यातून काही गैरप्रकार घडले – – –

शंकररावजी : मान्य आहे; पण मी स्वत: अनेक खेड्यांमध्ये जाऊन प्रत्यक्ष पहाणी केली आहे. दहादहा टेबलस् ओळीनं लावून अगदी व्यवस्थितरीत्या ऑपरेशन्स चालू असायची. अशा चांगल्या डॉक्टरर्सनी चांगले कँपस घेतले–जिथं एकही चुकीची केस झाली नाही. असे अनेक कँपस् झाले त्यांचं मात्र कुणीही जरादेखील कौतुक केलं नाही; पण एखाद्या डॉक्टरकडून लहानशी जरी चूक झाली तरी त्याचं मात्र लगेच इतकं भडक वर्णन सगळ्यांनी केलं की, विचारू नका ! त्या डॉक्टरनं पुन्हा नसबंदीची केस हातात घेऊ नये असं वातावरण निर्माण करून ठेवलं जायचं.

तेव्हा एक हवाच निर्माण करण्यात आली सर्वत्र जुलूमजबरदस्ती होत असल्याची. वादळ उठविणाऱ्यांना तारतम्यच राहिलं नाही.

मी : पण आजदेखील तशीच परिस्थिती कायम असल्याचं नजरेस येतं. ज्यांनी वीस हजारांच्यावर उत्तम प्रकारे नसबंदीच्या शस्त्रक्रिया केल्या आहेत असे डॉक्टर्सदेखील पुढाकार घेऊन काही करण्यास कचरतात. त्यांच्या हातून एखादी लहानशी चूक जरी झाली तरी दिल्लीहून लागलीच काय फर्मान सुटेल ह्याची त्यांना धास्ती वाटते.

शंकररावजी : 'अहो, उत्तम ऑपरेशन करणाऱ्या डॉक्टरांच्या हातून ऑपरेशन–टेबलावर इतर केसिसमध्ये माणसं मरत नाहीत का ? टॉन्सिलसचं ऑपरेशन, अपेंडिक्सचं ऑपरेशन – माणसं दगावतातच ना ? – त्याचं कुणी भांडवल नाही करीत; पण नसबंदीशस्त्रक्रियेत एखादा माणूस दगावला तर तो डॉक्टर संपलाच ! सक्तीनं धरपकड करून हा माणूस मारला असाच त्याचा विपर्यास सर्व जण करीत.

मी : महाराष्ट्र शासनात सक्तीच्या कुटुंबनियोजनाचा प्रस्ताव

संमत केला, तसा कायदा करण्याचा निर्णय घेतला तेव्हा जगातील मानवतावाद्यांना थोडासा धक्का बसला. अनेक आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रांमधून त्यावर उलटसुलट चर्चा झाली; पण अखेरीस बहुतेक सर्वांचंच एकमत झालं की भारतामध्ये लोकसंख्येवर आवश्यक ते नियंत्रण येणं जरुरीचं असलं तर अशा प्रकारच्या कायद्याशिवाय पर्याय नाही.

अत्यावश्यक पण आपल्याकडच्या वृत्तपत्रांना, सर्वसामान्य सुशिक्षित जनतेला न मानवलेला सक्तीच्या कुटुंबनियोजनाचा हा प्रस्ताव. त्याची निर्मिती कशी झाली, कोणत्या प्रेरणा होत्या ह्याबद्दलचा काही इतिहास आपण सांगाल का ?

शंकररावजी : सामान्य माणसाच्या जीवनामध्ये परिवर्तन घडविता आलं पाहिजे, त्याला जमीन दिली पाहिजे, त्याला रोजगारहमीची कामं दिली पाहिजेत, काही नोकऱ्यांमधे प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. काहींना उद्योगधंद्याला लावता आलं पाहिजे. हे सर्व करीत असताना मला स्वतःला एक गोष्ट दिसायला लागली की, आपले हे सर्व प्रयत्न तोकडे पडणार आहेत. जमीन मर्यादित आहे, नोकऱ्या मर्यादित आहेत आणि रोजगार हमीची कामं हीदेखील आपण समजतो तितकी दीर्घ काळ चालणार नाहीच आहेत.

हे सर्व संपल्यानंतर लोकांचे प्रश्न कसे सोडविणार असा विचार सतत माझ्या मनात येत असे. हा विचार जेव्हा फारच गंभीर स्वरूप धारण करू लागला तेव्हा माझ्या काही मित्रांसमोर तो मांडला आणि कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम सक्तीचा करावा का ह्याबद्दल त्यांचं मत विचारलं. त्यांची प्रतिक्रिया अजमावण्याचा प्रयत्न केला. काही मंडळींना हे सक्तीचं झालं पाहिजे हे पटलं, तर काही जण म्हणाले, राजकारणाच्या दृष्टीनं हे फायद्याचं होणार नाही. तेव्हा मी त्यांना म्हणालो – लोकांच्या कल्याणाच्या दृष्टीनं, भावी पिढीच्या फायद्याच्या दृष्टीनं हे करणं जरूर आहे हे जर आपल्याला पटलं असेल आणि त्यासाठी आपल्याला थोडा फार जाच सहन करावा लागत असेल, थोडा जनमानसाचा रोष ओढवून घ्यावा लागणार असेल तरी ते सगळं सहन करण्याच्या तयारीनं हा कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीनं आपण खटपट करावी. मला स्वतःला हे माझं नैतिक कर्तव्य आहे असं वाटतं. ही गोष्ट केली पाहिजे.

माझ्या मित्रांबरोबर विचारविनिमय केल्यावर मी अधिकारी मंडळींशी चर्चा केली. काही आमदारमंडळींच्याबरोबर चर्चा केली. त्या सर्वांना हा कार्यक्रम राबविणे अगत्याचे आहे हे पटले.

'केले पाहिजे' एवढ्या हद्दीपर्यंत सर्वांचे एकमत होते. प्रश्न आला 'सक्ती'चा आणि त्याएवजी पुन्हा प्रलोभने (इन्सेंटिव्हज् आणि डिस्इन्सेंटिव्हज वगैरे) द्यावीत आणि त्यातून हे साध्य होत असेल तर मग विनाकारण 'सक्तीच्या' मार्गानं जाण्याची जरूर काय ? असे काही जण म्हणू लागले.

सक्तीच्या कुटुंबनियोजनाच्या प्रस्तावावर विचारविनिमय करण्यापूर्वी हौसिंगबोर्डाची घरे मिळत असताना, काही डिसइन्सेंटिव्हज ठेवले होते. पगारदार माणसांच्या बाबतीतदेखील काही नकारात्मक सूचना दिलेल्या होत्या. एका ठराविक मर्यादेपलीकडे तुम्हाला मुले झाली तर काही ठराविक सवलती मिळणार नाहीत अशा प्रकारच्या सूचना अस्तित्वात होत्या; पण ह्या सर्वांचा काहीही परिणाम झाल्याचे आम्हाला पहायला मिळाले नाही. उलट सूट देण्याची, क्षमा करण्याचीच वृत्ती खूप मोठ्या प्रमाणात दृष्टोत्पत्तीस आली. अशा सवलती रोखणे मानवतावादाच्या दृष्टिकोनातून योग्य नव्हे, माणुसकीच्या दृष्टीने हे गैर आहे वगैरे त्याबद्दल लोक म्हणू लागले. थोडक्यात सांगायचे म्हणजे डिस्इन्सेंटिव्हज् दिल्यानंतर लोकसंख्येची वाढ थांबविण्याच्या दृष्टीने त्याचा काही फार मोठ्या प्रमाणावर परिणाम होत असल्याचे दिसले नाही.

आता अशा परिस्थितीत दुसरा मार्ग तरी कुठला ? लोकसंख्येची भरमसाठ वाढ नियंत्रित केलीच पाहिजे. डिसइन्सेंटिव्हज वगैरेंनी फारसा काहीही फरक पडत नाही हे लक्षात आले. मग आम्ही सर्व ह्या निर्णयाशी आलो की, सक्तीच्या कुटुंबनियोजनाचा विषय नॉन ऑफिशियल रेझोल्युशन् म्हणून असेंब्लीसमोर मांडावा आणि सगळ्या पक्षांच्या मंडळींना सांगावे की ह्यासंबंधी तुमची जी काही मते असतील ती त्या ठिकाणी व्यक्त करा.

सर्व मंडळींच्याबरोबर मी चर्चा केली. काही वेगवेगळ्या धार्मिक गटाच्या मंडळींना मी बोलाविले. मुसलमान, हिंदू, ख्रिश्चन...त्याचप्रमाणे वेगवेगळ्या जातीजमातींच्या मंडळींना बोलावून त्यांच्याशी सांगोपांग चर्चा केली आणि मगच हे बिल असेंब्लीमध्ये मांडले. कम्युनिस्टांचा थोडासा विरोध असला तरी असेंब्लीमध्ये त्यांनी विरोध केला नाही. फक्त एक मुस्लिमलीगचा अपवाद वगळता बाकी सर्व मंडळींनी ह्याला एकमताने तेव्हा पाठिंबा दिला. त्यानंतर मग हे बिल सभागृहापुढे मांडण्यात आले आणि दोन्हीही सभागृहांतून अतिशय चांगल्या वातावरणात सक्तीच्या कुटुंबनियोजनाचा हा प्रस्ताव संमत झाला.

त्यानंतर मध्यवर्ती शासनाकडे आम्ही हा प्रस्ताव पाठविला आणि तिथे मात्र अडचणी निर्माण झाल्या.

महाराष्ट्रात जर हे केले तर मग प्रत्येक राज्यामध्येदेखील करण्याचा प्रसंग येईल वगैरे कारणे दाखवून मला विचारण्यात आले की, हे सर्व करण्याइतकी यंत्रणा महाराष्ट्राकडे आहे का ? मी त्यांना सरळ मोजूनच दाखवले. नियोजनपात्र जोडप्यांची संख्या, डॉक्टरांची संख्या ही सर्व आकडेवारी दाखवून मी त्यांना आश्वासन दिले की, फक्त चार वर्षांमध्ये आम्ही तुम्हाला हा कार्यक्रम यशस्वी रीतीने पार पाडून दाखवू.

मध्यवर्ती सरकारने आम्हाला चार लाख नसबंदीचे टारगेट दिले होते. आम्ही त्या वर्षी बारा लाखाच्या आसपास नसबंदी–शस्त्रक्रिया केल्या. फार चांगल्या रीतीनें ह्या कार्यक्रमाला चालना मिळाली होती. त्याच गतीने हा कार्यक्रम चालू राहिला असता तर तीन-साडेतीन वर्षांत सर्व नियोजनपात्र (एलिजिबल्) जोडप्यांची नसबंदीशस्त्रक्रिया पार पडली असती. मग नंतर केवळ रूटीन स्वरूपातच हा कार्यक्रम राहिला असता.

दरवर्षी जी जोडपी नियोजनाच्या शस्त्रक्रियेच्या दृष्टीने योग्य होतात त्यांचीच फक्त नसबंदी करण्याचे काम शिल्लक राहिले असते; पण निवडणुका झाल्या आणि ह्या सर्वच कार्यक्रमाला फारच प्रचंड सेटबॅक मिळाला. बारा लाखांच्या मुकाबल्यात बाराशेवर कार्यक्रम येऊन ठेपला. देशाच्या दृष्टीने ही फार दुर्दैवी घटना आहे–

चर्चा संपली. मन सुन्न झाले. ह्या स्फोटक विषयावर इतक्या मनमोकळेपणाने दुसरे कुणा बोलेल असे मला वाटत नाही. त्यासाठी धाडस लागते. प्रामाणिकपणा लागतो. कर्तव्यनिष्ठा लागते.

माननीय शंकररावजींची ही मुलाखत घेतली तेव्हा श्री. शरदराव पवारांनी अजून मंत्रिमंडळ जाहीर केले नव्हते.

महाराष्ट्रात शंकररावजींच्यासारखा गरिबांसाठी मनापासून झटणारा एक प्रामाणिक माणूस काही काळ गमावला होता. सुदैवाने हा नेता आज पुन्हा मंत्रिमंडळात आहे.

शंकररावजींना अभिवादन करून मी उठलो. फोटो काढण्यासाठी बरोबर आलेल्या माझ्या बायकोने न रहावून एक प्रश्न केला–

'आपण आमचे माजी मुख्यमंत्री– आज आमदारनिवासात ह्या लहानशा खोलीत आपण इतक्या साधेपणाने राहता ह्याचे थोडे आश्चर्य, पण अभिमानदेखील वाटतो...'

मनमोकळे हसत शंकररावजी म्हणाले,

'अहो, माझा जन्म ह्यापेक्षाही अगदी लहान खोलीत झाला आहे. त्या लहानशा खोलीत मी सुखाने, आनंदाने लहानाचा मोठा झालो आहे.'

□

# पूर्वीची वार्षिक सरासरी ४ ते ५ लाख
# गेल्या वर्षी महाराष्ट्रात फक्त नव्वद हजार शस्त्रक्रिया झाल्या

डॉ. अरविंद पटवर्धन

७–८ वर्षांपूर्वीचा एक प्रसंग मला आठवतो. एके दिवशी सकाळीच दवाखान्यात एक आजीबाई आपल्या गर्भार-सुनेसोबतच तीन नातवंडांना घेऊन प्रवेशती झाली. सर्वांत छोटा नातू एक वर्षाचा, न्युमोनियाने आजारी होता. त्याच्या औषधाकरिता ती आली होती. औषध-पाणी झाल्यानंतर नुकताच वेग घेत असणाऱ्या कुटुंब-नियोजन कार्यक्रमाची म्हातारीस कल्पना देण्याचा विचार माझ्या मनात आला. मी तिला म्हटले, ' आजीबाई, तीन नातू आहेत. चौथा लवकरच येईल. या खेपेस सुनेचं ऑपरेशन करून टाका ! '

यानंतर ऑपरेशनचे तिला व देशालाही होणारे निरनिराळे फायदे मी सांगितले; पण तिचं उत्तर एकच होतं. ती म्हणत होती, ' डॉक्टरसाहेब, पोरं नेहमीच आजारी पडतात. आता पैसा आहे म्हणून त्यांना औषध तरी देता येतं. औषधाला पैसे नसतील तर पोर मरेल. समजा, आज ऑपरेशन केलं अन् उद्या-परवा मुलं मेली तर दुसरं मूल कोण देईल ? सरकारकरिता मी ऑपरेशनलाही तयार होईल; पण सरकार मला नातू द्यावयाची हमी देणार काय ? आहे त्याचा सांभाळ करणार काय ?' तिचा सवाल मलाही निरुत्तर करणारा होता. कारण गरीब समाजात असणारं बालमृत्यूंचं प्रमाण भेडसावणारं होतं. त्याच प्रसंगातून विचारचक्र सुरू झालं.

१९५३–५४ साली आपल्या देशात कुटुंब-नियोजनाला राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून मान्यता मिळाली. तरीही १९५४–६० पर्यंत या कार्यक्रमाचा फारसा गाजावाजा झाला नव्हता. कारण एक तर राजकीय पक्षांना या समस्येचे गांभीर्य कळले नव्हते आणि दुसरे म्हणजे, प्लॅनिंग कमिशननेसुद्धा त्याचा नीटसा विचार केला नव्हता. १९६४ पासून लोकसंख्यावाढीमुळे नियोजन फसू लागले व मग कुटुंब नियोजन कार्यक्रमाला गती मिळाली आणि मग एकदम ' लाल त्रिकोण ' अस्तित्वात आला. त्याबरोबरच ' लूप ' बसविणे, कॅम्प बेसिसवर–ऑपरेशन्स इ. कार्यक्रमावर भर देण्यात आला, तो आजतागायत वाढत्या गतीने उपयोगात आला. कुटुंब नियोजन म्हणजे ऑपरेशन्स हेच सूत्र सुरू राहिले. १९७०–७५ च्या दरम्यान एकट्या महाराष्ट्रात दरवर्षी सुमारे चार लाखांच्या आसपास शस्त्रक्रिया झाल्या. १९७५ साली महाराष्ट्रात शस्त्रक्रियांचा उच्चांक गाठण्यात आला. सुमारे ८॥ लाखांच्या वर शस्त्रक्रिया त्या वेळेस झाल्या; पण त्यानंतरच्या निवडणूक निकालामुळे राजकीय पक्षांनी कुटुंब-नियोजन कार्यक्रमाचा धसकाच घेतला. त्याचा परिणाम म्हणूनच की काय, गेल्या वर्षी महाराष्ट्रात फक्त ९०,००० शस्त्रक्रिया झाल्या; त्यातील निम्म्याच्यावर शस्त्रक्रिया पुणे, मुंबई यांसारख्या मोठ्या शहरातून झाल्या. सुशिक्षित व उच्चवर्गीय कुटुंबात कुटुंब नियोजन स्वयंस्फूर्तीने राबविले जात आहे, तर ९० टक्के अशिक्षित समाज–ज्या समाजाला कुटुंबनियोजनाची खरी गरज आहे तो समाज – याबाबतीत उदासीन राहिला. परिणामी लोकसंख्या वाढीवर नियंत्रण येऊ शकले नाही. लोकसंख्या नियंत्रण ही एक अत्यावश्यक बाब आहे हे सर्वजण मान्य करतात; पण प्रत्यक्ष ते कसे करावे याबाबत कोणाजवळही स्वच्छ व स्पष्टपणे सांगण्यासारखे काही नाही. किंबहुना ते धीटपणे मांडण्याचे धैर्य नाही. राजकीय पक्षातील तरुण कार्यकर्ते असोत किंवा वयोवृद्ध नेते असोत, सर्व मंडळी याबाबत मौन पाळतात.

## महसुली खाक्या

कुटुंब नियोजन हा कार्यक्रम सर्वस्वी सरकारी पातळीवर राबविला गेल्यामुळे त्यात काही चुका अंतर्भूत धरल्या तरी एकंदर कार्यक्रम राबविण्याचे तंत्रच हुकूमशाही स्वरूपाचे होते. कुटुंब नियोजनासारखा लोकोपयोगी कार्यक्रम महसूल खात्याच्या तंत्राप्रमाणे राबविला गेल्याने लोकांची सोय, गैरसोय, भावना यांचा विचार झाला नाही आणि ' राजाज्ञा ' आहे म्हणूनच केवळ तो राबविण्यात आला. कँप बेसिसवर लोकांचे होणारे हाल, उदा. ऑपरेशननंतर जखमांमध्ये ' पू ' होणे, ऑपरेशनच्या जागा सुजणे यांची दखल घेतली गेली नाही. कॅम्पमध्ये ऑपरेशन्स कशी झाली यापेक्षा किती झाली यालाच अवास्तव महत्त्व मिळाले. शस्त्रक्रिया माणसावर केली जाते आहे की जनावरावर, याचेही भान कॅम्पमध्ये राखले गेले नाही. साहजिकच लोकांच्या मनात शस्त्रक्रियांबाबत एक भीती बसली व याच भीतीपोटी लोक शस्त्रक्रिया करण्यास नाराज झाले.

आणीबाणीच्या काळात कुटुंब नियोजनाच्या सक्तीची परिसीमा झाली असली तरी त्याआधीसुद्धा सक्ती थोड्या-फार प्रमाणात होतीच. उदा. एखाद्या शिक्षकाने तीन केसेस आणल्या नाहीत तर त्याची बढती व पगारवाढ रद्द होणे, एखाद्या स्त्रीस ' लूप ' बसविल्यानंतर त्याचा त्रास झाला तरी काढावयाचे म्हटल्यावर डॉक्टरला त्याचा लेखी

जाब द्यावा लागत असे.

मी स्वत: अनेक उपेक्षित समाजातील व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या असता कुटुंब लहान असावे या विचाराशी सहमत होणारे बरेच जण भेटले. ऑपरेशन्स यासारख्या गोष्टींनाही त्यांचा विरोध नाही; पण शस्त्रक्रियेस लागणाऱ्या गोष्टींची उदा. सर्वसोयींनी युक्त थिएटर, निर्जंतुक उपकरणे, योग्य औषधोपचार याची योग्यता काळजी घेतली न गेल्याने शस्त्रक्रिया म्हणजे एक दिव्यच वाटल्यास नवल नाही. त्यामुळे शस्त्रक्रिया म्हणजे आपल्यावर नाहक अत्याचार अशी भावना लोकांच्या मनात निर्माण झाली. तसेच मुलं कमी असली, तर जीवन असुरक्षित आहे, अशी भावना गरीब थरातील लोकांत पसरलेली आहे. अर्थात तशी त्यांची भावना असणे यात गैर काहीच नाही. कारण होणाऱ्या मुलांतील बरीच मुले जुलाब, न्यूमोनिया अशा आजारांनी दगावतात. साहजिकच त्यांना कुटुंब नियोजन भीतीदायक वाटते. या सर्व समस्यांवर एकच उपाय आणि तो म्हणजे, आतापावेतो झालेल्या चुकांपासून योग्य तो बोध घेऊन सर्वच कार्यक्रमाची विचारपूर्वक पुनर्रचना करणे व त्याच्या अंमलबजावणीत घिसाडघाई न करणे.

## लोकशिक्षणाला पर्याय नाही

लोकांनी स्वयंस्फूर्तीने कार्यक्रमात सहभागी व्हावे असे वाटत असेल तर 'हम दो हमारे दो' असल्या पोकळ घोषणा न करता कुटुंब नियोजनाचा सविस्तर विषय शैक्षणिक स्वरूपात लोकांसमोर मांडला पाहिजे. कुटुंब नियोजन हे त्यांच्या स्वत:साठी, त्यांच्या मुलांसाठी फायदेशीर आहे याची त्यांना जाणीव करून देणे आवश्यक आहे. कुटुंबनियोजनाची गरज समाजातील गरीब वर्गाला पटवून देणे हे महत्त्वाचे आहे. या समाजातील परंपरागत रूढी, गैरसमजुती यांचे निराकरण त्याच समाजातील योग्य त्या व्यक्तींकडून व्हावयास हवे. लोकशिक्षणाने समाजात परिवर्तन घडवून आणणे ही एक अवघड बाब आहे. त्याउलट महसुली खाक्याने किंवा हुकूमशाही तंत्रांनी कार्यक्रम राबविणे अत्यंत सोपे परंतु निरुपयोगी आहे. कारण केवळ सरकारी नोकरवर्ग प्रचंड प्रमाणात असला तरी प्रत्यक्ष हे काम करण्याची कुवत त्याच्या अंगी नाही. एक तर हे काम करण्याची त्याची वैचारिक तयारी नाही व तो जेथे हे लोकशिक्षण करावयास जाणार त्या भागाशी तो अपरिचित असल्याने त्याचा योग्य प्रभाव पडू शकत नाही. म्हणूनच स्वयंसेवी संस्थांनी या कामी पुढाकार घेतला पाहिजे. स्वयंसेवी संस्था, मग त्या कुठल्याही असोत, त्यांनी या कामाला प्राधान्य दिले पाहिजे.

लोकशिक्षणाचाच एक भाग म्हणून 'कुटुंबरक्षण' कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. यात माता-बालसंगोपन, बालमृत्यूचे प्रमाण टाळणे, वृद्धापकाळाची काळजी इ. बाबींचा सांगोपांग विचार व्हावयास हवा. यासाठी रोगप्रतिबंधक उपायांची व्याप्ती १०० टक्के होण्यासाठी 'मास्टर प्लॅन' आखणे आवश्यक आहे.

सध्या महाराष्ट्रातील श्रीमंत वर्गातील मुलांना जवळ जवळ १०० टक्के सुरक्षितता अनुभवता येते; पण गरीब व दलित समाजातील मुले ५ टक्के सुद्धा सुरक्षितता अनुभवू शकत नाहीत. ५ टक्क्यांपासून १०० टक्के सुरक्षिततेची हमी देणे हे एक अत्यंत अवघड पण तितकेच महत्त्वाचे काम आहे.

लोकशिक्षण माध्यमातून जर 'कुटुंब-नियोजन,' 'कुटुंबरक्षण' कार्यक्रम राबविला गेला तर लवकरच लोकसंख्येला आळा बसून सुबत्ता व सुव्यवस्थेच्या दिशेने आपल्या देशाची प्रगती होणे अवघड नाही.

लोकशिक्षण-माध्यमाच्या संदर्भात माझा एक अनुभव मला नमूद करावासा वाटतो. माझ्या दवाखान्यात येणाऱ्या एका अशिक्षित बाईला मी कुटुंब नियोजन-गोळ्यांचा उपयोग सांगितला. तिला त्या गोळ्या मिळवून द्यायचीही व्यवस्था केली. ठरलेल्या दिवशी ती बाईही गोळ्या घेऊ लागली. २ वर्षांत त्या बाईला दिवस न गेल्याचे पाहून आजूबाजूच्या स्त्रियांनी तिला ऑपरेशन वगैरे केले किंवा काय, म्हणून विचारले असता तिने त्यांना त्या गोळ्या कशा, केव्हा घ्यायच्या याची माहिती दिली. त्या बायाही गोळ्यांचा वापर करू लागल्या. पुन्हा काही दिवसांनंतर ती बाई दवाखान्यात आली तेव्हा तिला दिवस गेले होते. मला आश्चर्य वाटले. मी विचारले, 'काय बाई, गोळ्या घ्यायचे विसरलात की काय ?' तिचे उत्तर खरोखरच कौतुकास्पद होते. म्हणाली, 'डॉक्टर मुलगा आता तीन-साडेतीन वर्षांचा झाला. आता दुसरे मूल व्हावे असे वाटते म्हणून गोळ्या बंद केल्या !' नियोजनाबरोबरच दोन मुलांतल्या अंतराचे महत्त्व तिला कळले होते. अशीच माणसे प्रचारमाध्यम म्हणून वापरली तर कुटुंब नियोजनाचा जो अपप्रचार होतो आहे त्याला आळा बसेल. गरीब, अशिक्षित माणसेही शहाणी, समंजस असतात; पण वाण असते त्यांना योग्य रीतीने समजावून सांगणाऱ्यांची !

□



: लेखक :



# नसबंदी
# काही समज–गैरसमज

डॉ. अ. गो. साठे

भारताच्या 'कुटुंब नियोजनाचा' कार्यक्रम अत्यंत धडाडीने चालू झाला होता. जगातील इतर राष्ट्रांमध्ये आपण आघाडीवर येऊ पहात होतो. विशेषत: चीन सोडला तर आपल्याकडे 'नस बंदीचे' प्रमाण खूपच जास्त होते. तो मार्ग मान्यवर होत चालला होता नि त्याचे इष्ट फळही दृष्टिपथात येत होते.

तोच काळ सोकावला नि आणीबाणीच्या काळातील अन्यायी व अतिरेकी प्रकारामुळे ह्या कार्यक्रमास जबर धक्का बसला. पुढे उलथापालथीच्या राजकारणात तो जवळ जवळ लुप्तच होणार अशी भीती वाटू लागली होती.

आणीबाणीच्या काळात सबंध देशभर, विशेषत्वाने उत्तर हिंदुस्थानात फार मोठ्या प्रमाणात नसबंदीच्या कार्यक्रमाला उधाण आले. आत्यंतिक उत्साहाचे भरात जाणूनबुजून, पद्धतशीरपणे तर काही ठिकाणी परिस्थितीला अनिष्ट वळण मिळाल्यामुळे मोठ्या प्रमाणात अन्याय व अतिरेकही झाला.

आणीबाणी उठविण्याच्या नादात अन्यायाचे, अतिरेकाचे प्रभावी, प्रचारी भांडवल केले गेले. कुटुंब नियोजनाच्या एकंदरच कार्यक्रमाबद्दल जनमानसात घृणा, भीती निर्माण झाली. त्याचबरोबर पौराणिक व धार्मिक दाखले देऊन संयमासारख्या तथाकथित कथांचा आधार घेऊन कुटुंब नियोजन कार्यक्रमाच्या शिडातील वारेच काढून घेतले गेले. सरकारी व बिनसरकारी यंत्रणेचासुद्धा धीर खचला. वर्तमानपत्रकारांनी दूरगामी परिणामाचा विचार न करता, सत्यासत्याची पारख न करता विपर्यस्त व अतिशयोक्तिपूर्ण अशा बातम्या आदेशाने व भडकपणे पसरविल्या व आत्यंतिक वेगाने परिणामकारक ठरणाऱ्या मार्गाबद्दल नागरिकांच्या मनात धास्ती उत्पन्न केली.

'आपलेच अस्त्र' आपणावर उलटेल ह्या भीतीने नवीन सरकारकडून कुटुंब नियोजन विभागातील यंत्रणेला धोक्याचा कंदीलही दाखविला गेला. कुणी बोलेनासे झाले. कार्यक्रम थंडावले. त्यामुळे जबाबदारी टाळण्याच्या भूमिकेतून 'ब्याद नको' अशी वृत्तीने कामे सुरू झाली.

'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय ?' असे आणीबाणीच्या काळात कुणी विचारू शकला नाही हे समजू शकते; पण लोकशाहीचा गाजावाजा करण्याऱ्यांपुढेही ही आरोळी कुणी ठोकली नाही !

आता वेळ आली आहे वेळीच जागृत होण्याची, बोलण्याची व त्वरित कार्याला लागण्याची. उशीरा का होईना, पंतप्रधानांनी जाणीवपूर्वक ह्या प्रश्नाला व्यावहारीक तोंड फोडले आहे. यापुढे तत्त्वे निरखून ठरविली पाहिजेत, कार्यक्रम पारखून घेतला पाहिजे. मुख्यत: ह्या संदर्भात मानवी मनाला संभाळणारी पथ्ये पाळली पाहिजेत. व्यक्तीची प्रकृती नि प्रवृत्ती ओळखून, पूर्वापार रूढीचा पगडा, संस्कृतीचे लेणे नि धर्माचे देणे ही पार्श्वभूमी लक्षात ठेवून, सर्व थरांतील लोकांना कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमात स्वेच्छेने यशस्वीरीत्या गुंतविण्यासाठी राष्ट्रीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रभावी लोकशिक्षण दिलेपाहिजे.

लोकशिक्षण, कुटुंबजीवन शिक्षण देण्यास सरकारी यंत्रणा सध्या फार अपुरी पडते. सामाजिक संस्थांनी, क्लबांनी ह्या कामासाठी मुख्यत्वेकरून पुढे आले पाहिजे. सरकारी योजनेला हातभार लावला पाहिजे. एफ. पी. ए. आय. सारख्या संस्था हे काम मोठ्या प्रमाणावर करून सरकारी कार्यक्रमांना हातभार लावीत आहेत. अशा सहकार्याची अत्यंत निकड आहे.

लोकशिक्षण देण्यास गेले असताना आम जनता कार्यकर्त्यांना जवळ उभेच करीत नाही, बोलू देत नाही असा अनुभव आहे त्यांच्या दैनंदिन जीवनावश्यक गरजा भागविण्याचे कार्य सुरू झाल्याशिवाय ते आपले म्हणणे ऐकण्याच्या मन:स्थितीतच नसतात. जीवनमूल्ये, राष्ट्रीय कर्तव्ये, त्यासाठी छोट्या कुटुंबाची कल्पना

एकण्यास, पाळण्यास नि हातभार लावण्यास स्वखुशीने राजी होत नाहीत.

ह्यासाठी दोन्ही आघाडयांवर एकाच वेळी ( म्हणजे त्याची परिस्थिती सर्वांगीण सुधारण्यासाठी व लोकशिक्षणाद्वारे कुटुंबनियोजन पचनी पाडण्यासाठी ) काम सुरू व्हावयास हवे.

लवकरात लवकर नि जास्तीत जास्त प्रमाणात लोकसंख्या नियंत्रणाची उद्दिष्टे साध्य करण्याचा एक मार्ग म्हणजे ज्यांची प्रजोत्पानाची उद्दिष्टे सफल झाली आहेत ( राष्ट्रीय दृष्टिकोनातून २ ते ४ मुले ) अशा जोडप्यातील स्त्री किंवा पुरुषांची नसबंदी शस्त्रक्रिया, विशेषेकरून पुरुषांवरील.

नेमका हाच कार्यक्रम सध्या खोल चिखलात रुतून बसला आहे. त्यावर धोंडे मारून चिखल उडवायला काही रूढीप्रिय व स्वार्थी समाजकंटक बाजूला खंदक खणून बसले आहेत, संधीची वाट पहात.

## प्रमोटर–एक दलाल

कुटुंब नियोजनाची सर्व साधने व औषधी आहेत ती काही तात्कालिक स्वरूपाची नि मर्यादित कालावधीसाठी आहेत. एखाद्या दांपत्याला प्रजोत्पादनार्थ कार्य सफल झाल्यानंतर जर संतती नको असेल तर त्याच्यासाठी मात्र, त्याच्या उर्वरित दीर्घ काळासाठी वरील साधने, औषधे देणे हिताचे नाही. दीर्घ मुदतीसाठी नि पुढील वयात ती हानिकारक ठरू शकतील. तशी ती वापरणे कंटाळवाणे व गैरसोईचेच होईल. त्यातून वापरण्यात घेण्यात चूक झाली तर अवांच्छित गर्भधारणेची भीती असते. अशा दांपत्यांना सोपा, सोयीचा, कायम स्वरूपाचा, दगा न देणारा व शरिराला हानी पोचू न देणारा कार्यक्रम म्हणज स्त्री किंवा पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया.

काही अपरिहार्य कारणाने किंवा दुर्दैवाने मूले दगावली तर अशांवर पुन्हा शस्त्रक्रिया करून कापलेल्या नसा परत यशस्वीरित्या जोडण्याचे तंत्र आता पुष्कळच सुधारले आहे. स्त्रियांत १० ते १५ टक्के व पुरुषात ८० ते ९० टक्के हे तंत्र यशस्वी होते. त्यातून कुठल्या टक्केवारीत आपला भाग आहे हे शेवटी वैयक्तिकच असते.

खेडोपाडी, गावोगावी व शहरातसुद्धा जिथे कार्यकर्ते पोहचू शकत नाहीत किंवा तेथल्या नागरिकाशी अडचणीमुळे संपर्क साधू शकत नाहीत, त्यांना शोधणेही दुरापास्त असते. अशा परिस्थितीला तोंड देण्यासाठी हा वर्ग निर्माण झाला असावा. तसेच कमिशनपद्धतीमुळे काम जास्ती निर्माण व्हावे ही मूळ कल्पना. नसबंदी शस्त्रक्रियेस योग्य अशांना सविस्तर माहिती देऊन शंका निरसन करणे, पटविणे त्यांना नसबंदीसाठी उद्युक्त करून मार्गदर्शन करावयाचे, तज्ज्ञांकडून शस्त्रक्रिया करवून घ्यावयाची व त्याबद्दल सरकारी ठरीव आर्थिक-कमिशन मिळवावयाचे हे त्याचे कार्य. अत्यंत आशेने जोपासलेला नि पैशाच्या लोभाने बांधलेला हा 'प्रमोटर'च नेमका धोकादायक ठरला. पूर्वी नि आताही. तो पटविण्याऐवजी 'पकडू' लागला, पडगिरी करू लागला, गिऱ्हाईक शोधू लागला. त्याने कमिशनसाठी दलाली पद्धतीचा अनिर्बंध वापर केला. पुष्कळ वेळा या मंडळींनी दोन्ही बाजूंनी कमिशन उकळणे आणि काही वेळा गिऱ्हाइकास खोटेनाटे पटवून दोन तीन वेळा त्याच त्याच माणसास निरनिराळ्या केंद्रावर नेऊन शस्त्रक्रियेसाठी 'टेबलावर' चढविले ! अशा केसेस पुष्कळच आहेत. आता ह्या फसवणुकीस डॉक्टरवर्ग जागृत आहे म्हणून बरे !

हा 'प्रमोटर' परत भेटत नाही, त्याच्या घराचा ठावठिकाणा माहीत नसतो म्हणून त्याचा मागोवा घेता येत नाही. कोण कुठला कुणास ठाऊक, अशी परिस्थिती. त्याने पैशासाठी क्रूर दलाली केली आहे, तो करीत आहे. त्यात त्याला सोयर-सुतक नसते, खऱ्या-खोट्याची चाड नसते नि माणुसकीची जाण नसतेच नसते.

प्रमोटरची खरोखरीच जरूरी आहे, पण ती सध्याच्या आयुर्विमा-एजंटच्या भूमिकेतून. तो खालीलप्रमाणे असावा.

१) त्याचे नाव, गाव, वय पूर्ण पत्ता, ओळखपत्र, फोटो ह्यासकट त्याची सेंटरवर नोंद व्हावी.

२) तो ज्या परिसरात काम करणार त्यातील सेंटरवरच त्याने काम आणावे.

३) तो संयमी, हुशार, जबाबदारीची जाणीव असणारा, संसारी असा असणेच योग्य ठरेल.

४) त्याला सोप्या भाषेत, त्याला समजेल ह्या पद्धतीने शिक्षण देण्याची जरुरी आहे. तरच तो योग्य त्या व्यक्तीस माहिती पुरवून, पटवून नसबंदीस उद्युक्त करू शकेल.

५) त्याने नसबंदीस अशा प्रकारे उद्युक्त करावे की, ती व्यक्ती स्वखुशीने तयार व्हावयास हवी. दडपणाखाली, जुलूम-जबरदस्तीने नव्हे. नसबंदीचे गुण-दोष समजल्यामुळे, पटल्यामुळे.

त्याने, शस्त्रक्रिया झालेल्या व्यक्तीस योग्य तो मोबदला मिळाला आहे, त्याला सर्व सूचना मिळाल्या आहेत, त्याचे ड्रेसिंग व तक्रारीकडे लक्ष पुरविले जात आहे, योग्य वेळी उपचार केला जात आहे, फेरतपासणीसाठी वेळोवेळी तो येत आहे, ही सर्व जबाबदारी घेतली पाहिजे. ह्या कामांचे वाटले तर पुढे त्याला नवीन कमिशन द्यावे किंवा त्याच्यावर बंधन ठेवावयाचे असेल तर कमिशनचा काही वाटा पुढे तीन महिन्यांनी द्यावा. इतकेच नव्हे तर केसचे कमिशन दर वेळी घ्यावयाचे ऐवजी दर महिन्यास किंवा १०–१५ केसेस आणल्यावर एकदम द्यावे.

## नसबंदी शिबिरे

खेडोपाड्यांत शस्त्रक्रियांची सोय अजूनही उपलब्ध नसल्यामुळे व तेथे तज्ज्ञही नसल्यामुळे अशा नागरिकांना आपले खेडेगाव सोडून दूर जावे लागते. अशासाठी त्यांच्या जवळच्या वातावरणात, एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर शस्त्रक्रिया करता याव्यात. म्हणून निरनिराळ्या ठिकाणी तात्पुरती सोय म्हणून शिबीरे भरविली गेली. त्याचा उद्दिष्टे गाठण्याच्या दृष्टीने खूपच उपयोग झाला व गोरगरिबांची सोयही झाली.

शिबिरांच्या कार्यक्रमात खूप उणीवा आहेत, दोष आहेत. सरकारी यंत्रणा त्या सुधारण्याचा प्रयत्नही करीत आहे; पण त्यास वेग येत नाही. अशा शिबिरांचे यश हे संख्येच्या प्रमाणात न मोजता ते थोड्या काळानंतर गुणवत्तेवर ठरविले तरच कार्यक्रमात सुधारणा होईल, हे तत्त्व अतिशय महत्त्वाचे आहे.

शिबीर उभारण्याचे पूर्वी भाषणे, जाहिराती-पत्रके नि प्रमो-

टर्स ह्यांचेमार्फत जत्रा जमविली जाते; पण वैयक्तिक; कौटुंबिक पातळीवरचा प्रचार नि शिक्षण नसते. ज्यांनी नसबंदीची तयारी दर्शविली आहे, निदान त्यांना तरी शस्त्रक्रियेची जुजबी कल्पना, त्याचे परिणाम नि घ्यावयाची काळजी ही अगोदर गटागटाने समजावून सांगितली तर पुढील अनेक समस्या उद्‌भवणार नाहीत. गैरसमज पसरणार नाहीत. घे अंगठा, नाव नि घाल टेबलावर. त्यांना बावरलेल्या अवस्थेत दंडाला धरूनच हिंडविले जाते.

शस्त्रकर्म मंदिरे सुधारित केली पाहिजेत, अजूनही सुरक्षिततेकडे जास्त लक्ष पुरविणे जरूर आहे. म्हणजे अजूनही धोके कमी करता येतील.

शस्त्रक्रिया किती छोटया छेदातून उरकल्या जातात नि किती वेळात उरकल्या जातात, दर ताशी किती वेग असतो यावरील शस्त्रक्रिया करणाऱ्या तज्ज्ञांचं 'लक्ष' व स्पर्धा बंद व्हावयास हवी. शस्त्रक्रिया 'उरकल्या' जाऊ नयेत. ह्या सर्व शस्त्रक्रियांवर तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टरची नजर असावी.

नवीन गरजेनुसार शस्त्रक्रिया करते वेळी, त्या नसा पुन्हा जोडाव्या लागल्या तर अडचण येऊ नये असे तंत्र वापरावे.

शिबीर संपले, गाशा गुंडाळला गेला की, उत्साह मावळलेला असतो. मग पाठीमागे रेंगाळतात ते रुग्ण खेडुत. एखादी नर्स सर्वांची चौकशी करणार. मलमपट्टया करणार. अडचणी-तक्रारींना तोंड देणार. फारच अपुरी पडते ही योजना. जेवढी शस्त्रक्रिया महत्त्वाची तितकीच महत्त्वाची नंतरची देखभाल नि फेरतपासणी; काळजी, नि योग्य उपचार. ते होत नाहीत. दुखण कळत नाही, बोलायची चोरी, ऐकायला आहे कोण? जे आहेत ते चिडचिड करणारे, तुटकपणे वागणारे कर्मचारी—सहानुभूतिशून्य—मग दाद कुणाकडे मागायची, व्यथा कोण समजून घेणार?

शिबीर भरविण्याचे अगोदर जशी शिक्षणाची व्यवस्था सुचविली तशीच गोष्ट नंतरची. त्याच भागातील समंजस नि सेवाभावाने भारलेल्या नागरिकांची एक स्वतंत्र समिती नेमली जावी. त्यात सरकारी अधिकारी असू नयेत. ह्या समितीने रुग्णांची देखभाल करवून घेण्याची नि एक निर्भीड रिपोर्ट पाठविण्याची जबाबदारी घ्यावी. ह्या रिपोर्टची प्रत्यक्षात काय दखल घेतली जाते, व्यावहारिक सोय केली जाते हे पहावे. समितीला जाब विचारण्याचा अधिकार असावा, म्हणजे तेथे विश्वासाचे व सहकार्याचे वातावरण लाभेल. नाही तर गरज सरो नि वैद्य मरो! पुढे तेथे शिबीरच होऊ शकणार नाही असे होऊ नये. उत्तेजनार्थ कार्यकर्त्यांना जी बक्षिसे वाटावयाची ती पुढे तीन महिन्यांनी गुणवत्तेवर अवलंबून, रिपोर्ट आल्यानंतरच वाटावीत.

### खाजगी संस्था—क्लब वगैरे

नसबंदीच्या उत्तेजनार्थ वाढता दर—भाव किती? ह्या सार्वजनिक, खाजगी संस्था व अनेक क्लबज् अत्यंत उत्साहाने, सामाजिककार्याच्या इर्षेने 'काही तरी' करू इच्छितात. आर्थिक झळही सोसतात त्यासाठी. कुटुंब नियोजनाचा सप्ताह किंवा शिबीर निघाले की तेथील कार्यकर्ते ह्या संस्थांकडे पैशाची विनंती करतात की, अशा राष्ट्रीय कार्याला आपण मदत करावी. त्यासाठी एक समारंभही आयोजित करू. ह्या संस्थांना मोठेपणा मिळतो. त्यात ह्यांच्या नावाची पत्रके, जाहिराती, पाटया, फोटो, वगैरे नेहमीच्या पद्धतीने होते. सरकारने उत्तेजनार्थ अधिकृतपणे दिलेल्या पैशाच्या वाटपात ह्यांचे नावे भर पडते आणि सहाजिक भाव—दर वाढतो. उत्तेजनार्थ जिथे जास्तीत जास्त भाव आहे, पैसा मिळतो तिकडे जास्त गिऱ्हाईक धावते. ही एक अनुचित प्रथा आहे, अनिष्ट स्पर्धा आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. ह्यात सेवाभावापेक्षा उपकाराची भावना दिसते. ह्यात माणसाला पैशाच्या मोहाने भुलविले आहे. तो माणूस ह्या शस्त्रक्रियेचे फायदे-तोटे समजून, छोटया कुटुंबाची कल्पना पटून त्यास उद्युक्त झाला तरच ते खरे कार्य. त्याला पैसा मागण्याची सवय झाली की, पुढील अडचणीसाठीही तो आपल्याकडे तशीच मागणी करीत रहातो. त्याला वाटते तो त्याचा हक्कच आहे. शस्त्रक्रिया करून घेतली ही त्याच्याच स्वार्थासाठी, कुटुंबकल्याणासाठी आणि कर्तव्य म्हणून. उपकार म्हणून नव्हे. हे त्याला कधी समजणार?

ह्या संस्थांचे सभासद समंजस आहेत, सेवावृत्तीने भारलेले आहेत. त्यांना ह्या कार्यात काम करता येईल ह्याची अजून कल्पनाच नाही. नुसते पैसे वाटून नाव होईल वर्तमानपत्रात, पण ते खरे कार्य नाही. त्यांना योग्य मार्गदर्शनच मिळत नाही. पैशाची खरी नड नाही. किंवा तंत्रज्ञही कमी पडत नाहीत, साधनांची कमतरता नाही, सरकारजवळ हे सर्व आहे. येवढेच नव्हे तर ही मदत सर्वच संस्थांना सर्व बाबतीत आहे. खरी अडचण आहे ती शिक्षकांची, चांगल्या, सद्हेतूने भारलेल्या, समाजसेवेची हौस असलेल्या, कमिशन न


## विनामूल्य सेवा

स्त्री-पुरुष नसबंदीच्या शस्त्रक्रियेनंतर किंवा त्यामुळे, काहींना अनेक प्रकारचे शारीरिक व मानसिक त्रास होत आहेत, त्याकडे दुर्लक्ष केले जाते. अशा नागरिकांना तपासण्याची व उपचार करण्याची सोय आमचे संस्थेतर्फे केली जाईल. ही सर्व सोय विनामूल्य आहे. कुठल्याही संस्थेमार्फत, सरकारतर्फे किंवा कुठल्याही शिबिरात वा केंद्रात अशी शस्त्रक्रिया झाली असली तरी त्यांचेसाठी सुद्धा आमचे संस्थेत तपासण्यास वा उपाययोजनेस येण्यास त्यांना बंधन नाही.

—अ. गो. साठे
माननीय सचिव,
एफ्. पी. ए. आय्., पुणे

वेळ : सोम. ते शुक्र. सकाळी १० ते दुपारी ४.
शनि. स. १० ते दु. १. रविवार बंद.

घेणाऱ्या 'प्रमोटरची.'

अशा सेवा संस्थांचे सभासद सुशिक्षित, सुसंस्कृत, प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे आहेत, त्यांना सारासारबुद्धी आहे. शास्त्रीय वृत्तीने व कौशल्याने आपले मत गळी उतरविण्याचे त्यांना सामर्थ्य आहे. माणसाच्या शारीरिक, मानसिक नि भावनिक गरजा ओळखून परिस्थितीचा योग्य अंदाज ते घेऊ शकतात. लोकशिक्षणाचे, कुटुंब-जीवन शिक्षणाचे कार्य ते उत्तम करू शकतील.

आठवड्यातून २-४ तास जरी त्यांनी काढले तरी पुरतील; छोटया कुटुंबाचे महत्व, नियोजनाची साधने नि शस्त्रक्रिया याबद्दल शास्त्रशुद्ध माहिती देऊन ते लोकांना ह्या कार्यात स्वेच्छेने भाग घेण्यास उद्युक्त करू शकतील. हा मार्ग खऱ्या अर्थाने प्रभावी ठरेल. त्यांनी असे कार्यकर्ते तयार करावेत किंवा नेमावेत. अशांच्या शिक्षणाची सोय करता येण्याजोगी आहे. आमची संस्था ( FPAI ) अशी शिक्षणाची चर्चासत्रे नि प्रात्यक्षिके घेतच आहे.

## शस्त्रक्रियेला पर्याय नाही

कुठेही गेलात तरी मनुष्यधर्म एकच. औषधाने बरे करा पण शस्त्रक्रिया सांगू नका. प्रकृतीत बिघाड झाला तर घरीच अंगावर काढणें, जुजबी औषधे घेणे, जरूर पडल्यास डॉक्टरकडे जाणे, ते सुद्धा रजेच्या सर्टिफिकेटसाठी; निभत नसेल तर औषधे डॉक्टरकडून घ्यावी, बरे वाटले नाही तर डॉक्टर बदलावा. शस्त्रक्रिया सुचविली तर वैद्यक पद्धती बदलली. एकूण काय जर जिवावरच बेतले तर शस्त्रक्रियेला संमती ही पार्श्वभूमी प्रत्येक कार्यकर्त्याने, प्रमोटरने लक्षात ठेवली पाहिजे. सुखासुखी कोण तयार होणार शस्त्रक्रियेला! ह्यासाठी मानसिक भूमिका तयार करावी लागते. भेडसावणारे; अतिशयोक्तिपूर्ण विकृत कथा सांगणारे अवतीभोवती असतातच. अजूनही दीर्घकाळ वापरता येईल, संपूर्ण विसंबनीय, वापरण्यास सोयीची नि सोपी अशी औषधे आणि साधने अजून तरी उपलब्ध नाहीत. मुले होण्याचे कर्तव्य संपल्यानंतर पुढे दीर्घकाळ, निदान २० ते ३० वर्षे, लैंगिक क्षमता राहिलेली असते. अशा वेळी 'नसबंदी' हाच पर्यायी उत्तम उपाय हे नीट पटविले पाहिजे नि शस्त्रक्रियेची भीती घालविली पाहिजे, शंका कुशंकांचे समाधान केले पाहिजे. ज्याचेवर नसबंदीच्या शस्त्रक्रिया झाल्या आहेत अशांचेकडून पटविले पाहिजे. 'आधी केले मग सांगितले' अशा व्यक्ती जास्त चांगले पटवून देतील.

## काही शंकानिरसन

| | |
|---|---|
| १. शरिराला, प्रकृतीला धोका किती ? | नाही. |
| २. पौरुषत्व टिकते काय ? | नक्कीच. |
| ३. ही शस्त्रकिया फेल झाली तर ? | असे क्वचितच होते; फेरतपासणीत खात्री करून घेता येते. |
| ४. नसा ( टयुब्स् ) परत यशस्वी जोडता येतात का ? | होय. पुरुषांत जास्त यशस्वी होतात. |

५. शारीरिक कष्ट पूर्वीसारखे करता येतील का ? होय.

६. व्रणाचा त्रास किती होतो ?—जवळ जवळ नाही. त्रास झालाच नि वेळीच योग्य इलाज केला तर काहीच वैगुण्य किंवा त्रास नाही.

७. मी कायमचा अशक्त किंवा दुखणाईत होईन का ? नाही; ह्याचा संबंध नाही.

८. स्त्रीवर शस्त्रक्रिया केल्यावर
ती निकामी, अधू होईल ?

बिलकुल नाही. सर्व कामे करू शकेल. संसाराचा भार घेता येईल. उलट प्रकृती सुधारेल.

## काही समज

पुरुष हा नपुंसक किंवा षंढ नसल्याचे, तो लैंगिक क्षमता असलेला आहे, हे त्याला किती मुले आहेत नि किती वयापर्यंत होत आहेत ह्या 'बाह्यलक्षणावरून' ठरविले जाते. तसा एक समज आहे. ही कल्पना मुळातच चुकीची कशी हे उदाहरण देऊन पटविले पाहिजे. लैंगिकक्षमत्व असलेला निपुत्रिक असू शकतो. ज्याला भरपूर मुले होत आहेत त्याचे लैंगिक क्षमत्व अपुरे, स्त्रीचे समाधान न करणारे असू शकते. ह्याची पूर्ण कल्पना दिली गेली पाहिजे.

स्त्रीवर नसबंदी केली तर ती वाईट वागण्याची शक्यता आहे. कारण ती बंधमुक्त होईल अशी काही पुरुष शंका विचारतात. खरे म्हणजे पुरुष वा स्त्री ह्या दोघांबद्दलही असेच म्हणता येईल. हा वैयक्तिक प्रकृतीचा धर्म आहे. चोरी दार उघडे असतानाही होते नि कुलूप तोडूनही होते. जरा अवघड जाईल येवढेच. ज्या स्त्रीला किंवा पुरुषाला विवाहबाह्य संबंध करावयाचा आहे त्याला स्वतःवर शस्त्रक्रिया केल्याशिवायही ते कृत्य करता येईल. दुसरी स्त्री किंवा पुरुष साधने वापरील किंवा शस्त्रक्रिया करून घेतलेली असेल. हा वैयक्तिक विश्वासाचा प्रश्न आहे. शस्त्रक्रियेशिवायसुद्धा असे बिनधोक व्यवहार चालत असतात नि चालतीलही. तर ही शंका, शस्त्रक्रिया टाळण्यासाठी एक पळवाट असते. शस्त्रक्रिया झालेली एकमेकांपासून लपवून ठेवू नये.

### स्त्री आणि शस्त्रक्रिया

स्त्रियांवरील शस्त्रक्रिया जास्त का केल्या जातात ?

१) एक तर बाळंतपणानंतर तिला आपोआप विश्रांती मिळते. (हे सर्वसाधारण उच्च व मध्यम वर्गीयांतच खरे आहे) २) ती रुग्णालयातच असते. ३) छोटया छेदातून ते होते. (हे कारण आता सयुक्तिक नाही.) ४) तिची मानसिक बैठक तयार असते. (हे सुद्धा अनेक मुलाखतींनंतर खरे वाटत नाही. कारण तिला खात्री असते, नवरा करून घेणार नाही म्हणून.) ५) खरे म्हणजे आपली रूढीप्रिय समजूत नवरा म्हणजे घरधनी, देव, मिळवता. त्यामुळे त्याला धोका नको. आपण मेलो तर तो काय, दुसरे लग्न सहज करील नि त्याचा संसार चालू राहील. अशा समजुती इतक्या खोल रुजल्या आहेत की, स्त्री स्वतःवर खुषीने शस्त्रक्रिया करवून घेते. कारण नाही तर तिचाच शेवटी ऱ्हास नि छळवाद अखंडित मातृत्वामुळे.

अनेक वर्षे स्वयंपाक करीत असलेल्या स्त्रीच्या हातून एखाद्या दिवशी चुकून, स्वयंपाक बिघडला किंवा चवीत फरक झाला तर सुधारून घ्या, बिघडल्याचे चिडचिड न करता सांगा, आरडाओरड कशाला? ह्याच उक्तीप्रमाणे कुठल्याही कार्यात, क्रियेत प्रत्येकाकडून कधीच थोडी-फार चूक होणार नाही हे म्हणणे जसे अव्यहार्य आहे तसेच ते शस्त्रक्रियेत. हा जिवाशी खेळ आहे हे मान्य. कुठल्याही गोष्टीचे 'फल' हे अनेक गोष्टीवर अवलंबून असते. ज्याच्यावर शस्त्रक्रिया केली जाते त्याच्याही प्रकृतीचा धर्म हाही कारणीभूत होऊ शकतो. सर्व प्रकारची काळजी घेऊन मनोभावाने कार्य करणे हेच हातात असते. ते होते की नाही हें मात्र पाहिलेच पाहिजे. एवढेच नव्हे तर शस्त्रक्रियांबाबत कुठल्याही तयारीत उणेपणा न ठेवता 'घरून चालतो' ही वृत्ती उपयोगी नाही हे मात्र खरे.

## आवाहन

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, पुणे ब्रँच यांच्यातर्फे पुणे आणि जवळपासच्या परिसरात कौटुंबिक जीवन शिक्षण आणि कुटुंब कल्याण शिक्षण या विषयांवर शाळा आणि कॉलेजांतून माहिती देण्याचा कार्यक्रम आखण्यात येत आहे. हा कार्यक्रम प्रामुख्याने स्वेच्छापूर्वक समाजकार्य करण्याच्या भूमिकेवर आधारित आहे. या विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन तरुण-तरुणींनी यात सहभागी होणे आवश्यक आहे. ज्या तरुणांनी समाजविद्याशाखेतील विषयांचे शिक्षण घेतलेले आहे आणि ज्यांना असे कार्य करण्याची हौस आणि वेळ आहे अशांनी खालील पत्त्यावर अथवा फोनवर संपर्क साधावा अशी विनंती आहे.

—डॉ. अ. गो. साठे
मानद सचिव, एफ्. पी. ए. आय्, पुणे

पत्ता : फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, पुणे शाखा १०८२१, गणेशखिंड रोड, इंडीऑईल पेट्रोल पंपापाठीमागे, रेंज हिल बस स्टॉप जवळ, पुणे १. दूरध्वनी : ५२४१४.

प्रसिद्धीच्या नादात, सनसनाटी, खळबळजनक बातम्या देण्याचा जो एक वर्तमानपत्रीय मान्यवर धर्म आहे त्याचा निदान लोकसंख्या नियंत्रणेशी निगडित असलेल्या कार्यावर तरी प्रचार होऊ नये. वृत्तपत्रव्यवसायिकांनी मनात योजले तर ते मोठे विधायक कार्य करू शकतात ह्याची उदाहरणे पुष्कळच आहेत. कुठे चुकले, कुठे खुपले किंवा अन्याय झाला तर त्यांना तो चटकन कळतो. त्याची त्यांनी प्रथम शहानिशा करावी व योग्य त्या व्यक्तीकडे ती तक्रार नोंदवून त्यांना न्याय मिळवून द्यावा. इकडे यंत्रणेचे दुर्लक्ष झाले तर यंत्रणेच्या निष्काळजीपणाकडे जनतेचे लक्ष वेधावे. ह्यात त्यांचा मोठेपणा आहेच; पण एक राष्ट्रीय कर्तव्य केल्याचे समाधानही आहे.

स्त्रियांवरील शस्त्रक्रियेचे अनेक मार्ग आहेत. पोटावरून छोटा छेद घेऊनच योनीमार्गे किंवा पोटावर अगदी छोटच्या छिद्रातून एका नवीन यंत्राच्या सहाय्याने शस्त्रक्रिया करता येते. कुठलाही मार्ग अवलंबिला तरी टयूब किंवा बीजवाहिनी पोटातच असते. त्यावर बंध घातला जातो. पोटातील आतील अवयवाचे भागावर काम करावे लागते. स्त्रीवरील शस्त्रक्रिया म्हणजे पोटामध्ये असलेल्या टयूबवरचे काम, त्यामुळे तिला विश्रांतीची अधिक गरज. दैनंदिन कामाला ती लगेच लागू शकत नाही.

पुरुषाची शस्त्रक्रिया ही शरिराच्या बाह्य भागावरच असते. ती जास्त सोपी, सरळ, कमी वेळाची, कमी खर्चाची. एकंदर शरिरावर; पोटावर, कंबरेवर किंवा कुठल्याही ताकदीवर त्याचा अनिष्ट परिणाम घडण्याचे कारणच नाही. पुरुषावरील 'नसा' परत जोडण्याची शस्त्रक्रिया तांत्रिकतेने सोपी, सुटसुटीत, बिनधोक. येवढेच नव्हे तर ती जास्त प्रमाणात यशस्वीही ठरते.

स्त्रीवर जर 'टयूब' जुळविण्याचे शस्त्रकर्म करावे लागले तर ते पोटावर छेद घेऊन करावे लागते. ते गुंतागुंतीचे, कमी यशस्वी ठरणारे असते. म्हणून सर्वांगीण दृष्टीने पुरुषांवरील नसबंदी शस्त्रक्रिया करणेच जास्त प्रमाणात पसंत करावयास हवे.

कौटुंबिक जीवनाची घडी बदलेली आहे. त्यातील स्त्रीचे स्थान नि जबाबदारीचा वाटा हाही बरोबरीचा किंवा महत्त्वाचा ठरू पहात आहे. त्याचबरोबर शस्त्रक्रियेबद्दलची माहिती नीट समजून घेतली, उमगली नि पौरुषत्वाच्या खोटच्या कल्पना जर सुटल्या तर पुरुषांनी अशा शस्त्रक्रियेपासून काही तरी आता न पटणारी कारणे सांगून पळवाट काढू नये. कारण पुढील काळात तेच हास्यास्पद नि नामर्द ठरतील.

□



डॉ. उल्हास लुकतुके

# प्रश्न फक्त संख्येचा आहे. मनाचा नाही ?

'तुमच्या कथानकाचे सूत्र मला मान्य नाही; पण कथा लिहिली आहे सुंदर, म्हणून मी ती प्रसिद्ध करणारे आहे' संपादक म्हणाले. कुटुंब नियोजनाच्या प्रचाराचा धडाका चालू होता. त्यासाठी निरनिराळी आर्थिक आमिषे दाखविली जात होती. याचा गैरफायदा घेऊन पैसा मंजूर करणारे स्थानिक पुढारी व प्रत्यक्षतः हातावर ठेवणारे दादा एका सालस कुटुंबाची दाणादाण उडवितात. नवरा वेडा होतो व बायको असहाय्यपणे गावातल्या गुंडांच्या वासनांची शिकार होते, अशी काहीशी ती कथा होती. प्रचाराच्या वेड्यापिशा वेगापुढे माणसाचे मन कःपदार्थ लेखले जात आहे व ठरविलेल्या आकड्यांचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या झंझावातामध्ये जोडप्यांच्या भावनांचा चुराडा होत आहे, असे त्या कथेचे सूत्र होते. संपादकांची ही प्रतिक्रिया ऐकल्यावर लेखकाने हे सूत्र परत उच्चारले. त्यावर लेखकाचे बोलणे मध्येच तोडीत संपादक म्हणाले. 'अहो, मनाचा विचार करायला कुठे जागा आहे? आपल्यापुढे प्रश्न आहे संख्येचा. अवर्स ईज द प्रॉब्लेम ऑफ नंबर!'

या घटनेला साधारण बारा वर्षे झाली. जवळ जवळ एक तप उलटले. कुटुंब कल्याणाचा कार्यक्रम एक संपूर्ण फेरी घेऊन परत पहिल्या जागी येऊन थांबला आहे आणि आता तर असा चिखलात रुतला आहे की, भलेभले किंकर्तव्यमूढ होऊन बसले आहेत. देशाचा सर्वांत निकडीचा व महान प्रयोग दयनीयरीत्या फसला आहे. आता-आता मंत्री व योजनाकारांना जाणीव होऊ लागली आहे की, आपण सर्व पैलूंचा विचार केला; केला नाही तो फक्त कुटुंब नियोजन प्रत्यक्ष करणाऱ्या माणसाच्या मनाचा. ग्यानबाची मेख तिथेच आहे!

कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम प्रयोग जगात दुसऱ्या कुठल्याही राष्ट्राने केला नसेल इतक्या मोठ्या प्रमाणावर आपण केला. या प्रयोगाची मूलभूत साधने म्हणजे निरोध, लूप, संततिप्रतिबंधक औषधे व शस्त्रक्रिया. यांचा शोध निःसंशयपणे परकीय देशांत लागला असला तरी राष्ट्रीय प्रमाणावर योजनाबद्धरीत्या हा कार्यक्रम राबविण्याचा फार प्रयत्न भारताने केला यात शंका नाही. किंबहुना व्यापारी कंपन्यांकडून निरोधनाची विक्री या प्रयोगाकडे सगळे जग कुतूहलाने बघत होते, इतका तो नावीन्यपूर्ण व महत्त्वाकांक्षी होता. जनजागृती; लोकशिक्षण, प्रचार, आमिषपूर्ण शिबिरे, निरामिष प्रकल्प, संख्याशास्त्रीय अभ्यास, वैद्यकीय मोहिमा, समाजशास्त्रीय व जनसंख्याशास्त्रीय अहवाल, चित्रपट—आकाशवाणी इत्यादी लोकमाध्यमे कुठे म्हणाल तिथे, म्हणाल त्या दृष्टिकोनातून, जिथे जाल तिथे कुटुंब नियोजनाचा एकच गदारोळ उडाला होता. शेवटी शेवटी तर कळस झाला! एखाद्या युद्धभूमीवर तुंबळ युद्ध व्हावे तशी तुफान रणधुमाळी माजली. मोटारी, पोलीस, बंदुका इत्यादींनिशी सरकारी कर्मचाऱ्यांच्या फौजाच्या फौजा जनतेवर तुटून पडू लागल्या. चांगल्या भरल्या बाजाराची युद्धभूमी होऊ लागली. 'पकडो और काटो' या एकच एक आरोळीचा कल्लोळ सर्वत्र एकू येऊ लागला. सरकारी फौजा निघून गेल्यावर रणमैदानावर रक्तमासांचा एकच खच पडू लागला. नसा तोडलेल्या जायबंदींच्या विव्हळण्याने व आर्त किंकाळ्यांनी मतदार जागा झाला. आणीबाणीचे एक अतिशय भयाण पर्व त्याने एका रात्रीत संपविले; पण गोष्टी इतक्या साध्या नव्हत्या. जनता पक्षाच्या जमेच्या बाजू काहीही असोत, आणीबाणीतील नसबंदीच्या अत्याचारांचे प्रमाणाबाहेर राजकीय भांडवल त्यांनी केले, हे खरे. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ या न्यायाने स्वतः केलेला आरडाओरडा त्यांना स्वतःलाच भोवला व कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम परत जवळ जवळ होता तिथेच जाऊन ठेपला. अनुशासन पर्वाने हा कार्यक्रम ठार केला असे म्हटले तर नंतरच्या आरोग्यमंत्र्यांनी त्यावर माती लोटली एवढे तरी म्हणावेच लागेल!

## विचार फक्त 'समूहांचा,' व्यक्तीचा नाही

भारतासारख्या विकसनशील देशाला प्रथम प्रमाणावर महत्त्वाचा असलेला हा कार्यक्रम, सर्व जग ज्याच्याकडे आशेने बघत होते असा हा प्रयोग का फसला ? निरनिराळ्या विषयांचे अभ्यासक अर्थातच निरनिराळी कारणे देतील. लोकमाध्यमतज्ज्ञ म्हणतील की, हा कार्यक्रम कधीच लोकांशी संवाद साधू शकला नाही. वैद्यकशास्त्रज्ञ म्हणतील, भारतीय जनतेला सोयीची कुटुंब नियोजनाची पद्धत सापडली नाही. राजकारणतज्ज्ञ म्हणतील, निरनिराळ्या पक्षांच्या सुंदोपसुंदीमध्ये त्याचा बळी गेला, अर्थतज्ज्ञ लगेच पैसा चुकीच्या ठिकाणी वाहात गेला तिकडे बोट दाखवितील. संख्याशास्त्रज्ञ असे दाखवून देतील की, जनतेच्या ज्या थरात हा कार्यक्रम एकजीव होऊन जायला पाहिजे होता, तिथपर्यंत तो धड पोहोचलाच नव्हता. एक ना दोन, हजार कारणे सांगता येतील. ती आपापल्या परींनी बरोबर व योग्यही असतील; पण तरीसुद्धा ही कारणे पूर्ण समाधानकारक ठरत नाहीत. याचे कारण असे दिसत की, ही सर्व शास्त्रे संख्यात्मक आहेत. ती जनसमूहाचा विचार करतात. त्या व्यक्तीचा करीत नाहीत व व्यक्तीचा जरी विचार केला तरी तिचा एक द्विपाद सजीव प्राणी म्हणून करतात, तिच्या मनाचा करीत नाहीत. या कार्यक्रमात व्यक्तीशी संबंधित असलेले शास्त्र म्हणजे वैद्यक शास्त्र; पण तेसुद्धा व्यक्तीचा माणूस म्हणून, शरीर व मन असलेला मानव असा विचार करीत नाही, तर फक्त शरीराचा विचार करते. या सर्व कार्यक्रमात संकल्पनेपासून कार्यवाहीपर्यंत समूहाचा विचार केला गेला. संवेदनाशील मन व जिवंत शरीर असलेल्या मनुष्याचा केला गेला नाही, हे या महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय कार्यक्रमाच्या अपयशाचे एक मूलभूत व महत्त्वाचे कारण आहे. दुर्दैव असे की, आजपर्यंत हे कोणाला पटण्याची तर राहू द्या, पण लक्षात घेण्याचीही आवश्यकता वाटत नव्हती व सुदैव हे की, आता तरी का होईना, कुटुंब कल्याण कार्यक्रमात व्यक्तीला, विशेषतः कुटुंबाला व तिच्या मनोव्यापाराला काही स्थान मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

खूप वर्षांपूर्वी एक फार गाजलेला इंग्रजी युद्ध चित्रपट पाहिला होता. त्यात एक असे पात्र दाखविले होते की, युद्धाचे सर्व निर्णय व घटना घडतात तेव्हा ते दृश्यात कोठे तरी असतेच. दर वेळेस आपली नाराजी शक्य होईल तशी ते व्यक्त करते; पण युद्धाच्या एकंदर जल्लोष, कल्लोळ, नशा, मदांधता इत्यादीच्या वातावरणात त्याच्याकडे कोणीच लक्ष देत नाही. सर्व जण अर्थातच कृतीच्या, अॅक्शनच्या मागे धावतात. शेवटी अटळ ते घडते. सर्वनाश होतो. पडदाभर छिन्नविछिन्न शरीरांचे अवशेष दिसतात. विनाशाचे सर्व चित्रण करून दृश्य संपत येते तसा कॅमेरा त्या पात्राचे चेहऱ्यावर स्थिरावतो व ते पात्र म्हणते, 'इट्स् मॅडनेस' (युद्ध म्हणजे वेडेपणा आहे) व चित्रपट संपतो.

आपला कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम व मनोविकारशास्त्र यांचे नाते काहीसे असेच आहे. सबंध भारतात आजमितीलासुद्धा मनोविकार तज्ज्ञ फारतर एक हजार आहेत. कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम सुरू झाला तेव्हा शे-दोनशे असतील, नसतील त्यांचा आवाज तो केवढा असणार ? तो ऐकण्याची गरज अर्थात कोणाला वाटली नाही, पण या कार्यक्रमात संख्येचे प्राबल्य सुरू झाले तेव्हापासून ही मंडळी आपल्या मूठभर शक्तीनिशी सरकारला सांगत होती की, कुटुंब नियोजन हे मूलतः व्यक्तीशी संबंधित आहे तेव्हा अधिक मानुषदृष्टिकोन घ्या. माणसाच्या मनाचा विचार करा; पण कोणी लक्ष दिले नाही. मनोविकारतज्ज्ञांच्या एका गटाने सरकारकडे प्रतिनिधित्व केले तेव्हा त्यांना उत्तर मिळाले, 'आपण म्हणता त्याप्रमाणे कुटुंब नियोजनात मानसिक भाग असू शकेल. तो तसा आहे किंवा नाही यांच्याबद्दल सरकारला सध्या दखल घ्यावीशी वाटत नाही. कारण सध्याची समस्या व्यक्तीचे मन ही नसून राष्ट्राची लोकसंख्या ही आहे. प्रश्न एका व्यक्तीचा नसून मोठ्या समूह संख्येचा आहे.' बिचारे मनोविकारतज्ज्ञ हिरमुसल्या चेहऱ्याने परत आले. त्यानंतर कार्यक्रमाचा जो फज्जा उडला तो पाहून त्या शिष्टमंडळाचे सभासद नक्कीच म्हणाले असतील, 'इट्स् मॅडनेस !' नंतर कालचक्र फिरले ! सध्या भारताचा एक डेप्युटी डायरेक्टर ऑफ हेल्थ सर्व्हिसेस मनोविकारतज्ज्ञ आहे व 'मनोविकारशास्त्राच्या दृष्टिकोनातून कुटुंब कल्याण' या विषयाच्या संशोधनावर बऱ्याच मोठ्या प्रमाणावर अनुदान उपलब्ध होत आहे.

लेखाचा हेतु कुटुंब कल्याण कार्यक्रमात मनोविकारशास्त्र किती महत्त्वाचे आहे, हे सांगणे हा नसून मनुष्याचा मनोव्यापार कुटुंब नियोजनाशी किती घट्ट निगडित आहे हे सांगण्याचा असल्याने तिकडे वळू.

साधे उदाहरण घेऊ. प्रथम एक कुटुंब असते. त्यात आई-वडील, इतर काही नातेवाईक व मुले असतात व ती परस्पर क्रियांनी एकमेकांशी संबंधित असतात. नवीन मूल जन्माला येते. ते जन्माला येण्याच्या आधीपासून घरातील निरनिराळे ताण व घटक ते गर्भावस्थेत यावे की नाही इथपासून परिणाम करीत असतात. वरच्या पिढीच्या नवविवाहित जोडप्याचे एकमेकांशी किती पटते, त्यांची सांपत्तिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती इत्यादी किती तरी घटक स्त्री गर्भवती व्हावी की नाही हे ठरवीत असतात. या सर्वांचा परिणाम गर्भावर व त्या होऊ घातलेल्या पालकांवर होत असतो. मूल जन्माला येते व वाढू लागते. ते काही काचेच्या मिनारात वाढत नाही. तेसुद्धा या सर्व परिस्थितीशी कधी मैत्री, कधी मुकाबला करीत वाढत असते व त्यातून त्याचे व्यक्तिमत्त्व सिद्ध होत असते. त्याचा स्वभाव ठरत असतो. आवडी-निवडी बनत असतात. स्वतःबद्दलच्या कल्पना तयार होत असतात. लैंगिकता, विवाह, जन्माचा जोडीदार याबद्दल वृत्ती-प्रवृत्ती बनत असतात. यातून पुढे विवाह होतो व एक नवीन जोडपे अस्तित्वात येते. आता त्यांनी मूल जन्माला घालावे की नाही याचा निर्णय अर्थातच ते स्वतः घेणार-ते स्वतः म्हणजे, त्यांची व्यक्तिमत्त्वे, जी वर सांगितल्याप्रमाणे जवळच्या परिस्थितीने घडविलेली आहेत. मुलाची आनुवंशिक देणगीही जर दगड मानली तर परिस्थिती ही पाथरवट आहे. टाकीचे घाव घालून त्यातून ती एक व्यक्तिमत्त्वाची मूर्ती घडविते. भले ती वेडीविद्री, सुंदर, कुरूप कशी का असेना. आनुवंशिक देणगी व परिस्थिती यांच्या सतत परस्पर क्रियेतून व्यक्तिमत्त्व निर्माण होते. ही परस्पर क्रिया सतत चालू असते व ती संपूर्णतः व्यक्तिगत आहे, हे जर आतापर्यंतच्या विवेचनावरून लक्षात आले असेल तर ज्या कार्यक्रमाला व्यक्तिगत अपील नाही किंवा जो कार्यक्रम ठोकळेबाज

आहे, तो यशस्वी होणं शक्य नाही हे ओघानेच आले. आकडयाचे जडजंबाल व बटबटीत प्रचाराचा गदारोळ उडवून कार्यक्रम कसा यशस्वी होईल ?

## सोपी पद्धती, स्थानिक मेळ

या विवेचनातच, कुटुंब नियोजनाच्या मार्गात एक मोठी धोंड मानली जाते त्या समस्येचे उत्तर आहे. ती समस्या म्हणजे समाजाच्या स्पंदनशील जीवनापासून तुटलेले, निरनिराळ्या विषयांचे तज्ज्ञ नेहमी सांगतात की, सामान्य भारतीय माणसाला राष्ट्रीय दृष्टिकोन नाही. दरवर्षी हिंदुस्थानात एक नवीन ऑस्ट्रेलिया जन्माला येत आहे व इ. स. २००० मध्ये भारतात माणसाला रहायला जागा व खायला अन्न मिळणार नाही, हे आम्ही एवढे कानीकपाळी ओरडून सांगत आहोत तरी अजिबात कोणी ऐकत नाही. लोकसंख्या आपली वाढतेच आहे. या तज्ज्ञ मंडळींनी असा कितीही आरडाओरडा केला तरी सामान्य भारतीय माणूस त्यांचे कधीच ऐकणार नाही. आपल्याला राष्ट्रीय जाणीव कमी आहे किंवा आपल्याला राष्ट्राभिमान नाही किंवा सबंध राष्ट्राच्या हितात आपण आपले हित पाहू शकत नाही, अशांपैकी हा भाग नाही. तर खरी गोष्ट अशी आहे की, आपला देश मागासलेला आहे. देश खंडप्राय असला तरी प्राचीन काळी आपल्याकडे दळणवळण अथवा विचारविमर्श करण्याची साधने नव्हती व आधुनिक इतिहासात शास्त्राचा अभ्यास कधी झाला नाही. त्यामुळे आपल्या सामान्य माणसाचे व्यक्तिमत्त्व शतकानुशतके फक्त अगदी जवळ असलेला परिसर घडवीत आलेला आहे. त्या अर्थाने आपले व्यक्तिमत्त्व ऱ्हस्व आहे, हे लक्षात घेतले म्हणजे आकडेशास्त्रीय सत्य हे कितीही भयाण असले तरी त्याचे सामान्य माणसाला अजिबात अपील का नाही, हे सहज लक्षात येईल. असा ऱ्हस्व व्यक्तिमत्त्वाचा माणूस व त्यातून त्याला मुले कधी, का, केव्हा, कधी व्हावीत किंवा होऊच नयेत असा एकदम व्यक्तिगत विषय. आता या विषयाची विचार सरणी त्याच्या भाषेत व त्याच्या परिसराच्या संदर्भात नाही मांडली तर कुठलाच कार्यक्रम म्हणावा तसा यशस्वी होणार नाही हे उघड आहे.

थोडसे विषयांतर झाले. मुद्दा चालला होता की व्यक्ती, तिचे व्यक्तिमत्त्व, तिची आनुवंशिक देणगी, तिचे कुटुंब व सभोवतीचा परिसर यांची सतत परस्पर क्रिया चालू असते. त्यामुळे साधारणपणे त्या परिसरात नेहमी घडणाऱ्या क्रियेपेक्षा वेगळी कृती माणूस करीत नाही व रूढ पद्धतीने लैंगिक व्यवहार तो करीत राहतो. कुटुंब नियोजन ही या संदर्भात अपरिचित व नवी कल्पना आहे. ती कल्पना व्यक्तिने स्वीकारावी किंवा आचरणात आणावी, असे जर वाटत असेल तर ती एकट्या व्यक्तीवर लादून चालणार नाही. तिचा व व्यक्तिमत्त्वाचा संबंध, कुटुंब नियोजन व कुटुंब संस्थेचा संबंध, कुटुंब नियोजनाचा परिसरावर होणारा परिणाम इत्यादी सर्वांचा अभ्यास करून ती अशा सोप्या रीतीने व स्थानिक पद्धतीने मांडावी लागेल की, ती या सर्व गटात आपोआप शोषिली जाईल. वर लिहिलेल्या सर्व बाबींचा विचार न करता आज ती फक्त कुटुंब नियोजनयोग्य जोडप्यांच्या माथ्यावर मारली जात आहे, हे चूक आहे. अशा रीतीने ती कधीच समाज व व्यक्तीशी एकरूप होणार नाही, तर उलट कुरूपातील काट्यासारखी बाहेर फेकली जाईल. खरे तर ती अशी बाहेर फेकली जाते असा रोज अनुभव येतो. त्यासाठी या योजनेचे रूप स्थानिक स्वरूपात, स्थानिक भाषेत, स्थानिक उदाहरणे घेऊन मांडावे लागेल. ज्या उदाहरणात लोकांना आपले प्रतिबिंब चटकन दिसते अशा उदाहरणांनी पटवावी लागेल व मग हळू हळू ती कल्पना व्यक्तिमत्त्व, कुटुंब व्यवस्था व सभोवतीचा परिसर याचा एक आपोआपचा भाग होऊन जाईल. हे करणे आवश्यक आहे.

आतापर्यंतच्या एकंदर प्रयत्नात हे भान राहिलेच होते, असे म्हणवत नाही. एकंदर कुटुंब नियोजन मोहिमेत माणूस, माणूस म्हणून वागविला गेला नाही तर वस्तू म्हणून वागविला गेला. द्विपादांच्या कळपातील एक प्राणी, असा वागविला गेला. योजनेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे दोन वर्ग होते. कचेरीत बसून नियंत्रण करणारे व प्रत्यक्षतः बाह्य क्षेत्रात काम करणारे. पहिल्या गटाला या त्रुटीची सरळ झळ कधी लागली नाही; पण दुसऱ्या गटाला पहिल्यापासून लागत होती. हा गट समाजाच्या उपेक्षेचा, विनोदाचा, कधी तिरस्काराचा व बहुतेक वेळा असहकाराचा विषय का ठरला, हे आता लक्षात येईल. हे सर्व लोक आपली शिकार करायला आले आहेत, अशी भावना वाढीस लागली. पुढे पुढे तर खरोखरीच रान उठवून हाका घालून जनावर कोंडीत धरून मारण्याची जी शिकारीची पद्धत होती त्याचे स्वरूप या मोहिमेला आले. आर्थिक आमिषे जेव्हा दाखविली जाऊ लागली तेव्हा या मोहिमेत विकृती शिरली. त्यामुळे शस्त्रक्रियांची संख्या वाढली हे निःसंशय. ज्या वेगाने हा कार्यक्रम पुढे नेण्याची आवश्यकता होती त्याचा विचार करता आर्थिक आमिषांची पायरी टाळता आली असती किंवा नुसत्या मनपरिवर्तनाच्या तंत्राने भागले असते असे वाटत नाही; पण त्यामुळे कार्यक्रमाला बाजारी रूप आले हे निश्चित. मूलतः समाजाला बाह्य रूप असलेली योजना शेवटपर्यंत अशी बाह्यरूपच राहिली. शेवटी बाजारी झाली, पण आत्मसात कधी झाली नाही. तिचा व व्यक्तीचा किंवा व्यक्तीभोवतीच्या परिसराचा सांधा कधी जुळला नाही आणि त्यामुळे ती सतत लादावी लागली. असुरक्षितता वाटणारे समाजातील अल्पसंख्यांक या मोहिमेबद्दल उघड विरोध व एकत्रित राजकीय भांडवल करू लागले, त्याचे हे एक कारण आहे.

माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची वाढ ही एक सदैव सचल प्रक्रिया आहे व त्यातून माणसाच्या भावना व वृत्ती ठरत असतात, हे वर आलेच आहे. कुटुंब नियोजन यशस्वी करावयाचे असेल तर माणूस व त्याचे कुटुंब, त्याचा सभोवतालचा परिसर व नंतर राष्ट्र वगैरे अशा क्रमाने विचार केला पाहिजे. एका व्यक्तीचा विचार करताना त्याची शरीरसुखाची, लैंगिकतेची, पुरुषत्व-स्त्रीत्वाची कल्पना, विवाह, नवराबायकोंचे परस्परसंबंध, पती-पत्नीमध्ये कोणाचे वर्चस्व किती असावे याची कल्पना इत्यादी अनेक गोष्टी कुटुंब नियोजनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत.

**या मोहिमेत माणूस माणूस म्हणवून वागवला गेला नाही तर वस्तु म्हणून वागवला गेला.**

कुटुंबनियोजनाची साधने किंवा शस्त्रक्रिया शरीरसुखाच्या आड येत नाहीत असा बटबटीत प्रचार आपण वेळोवेळी ऐकतो, पाहतो, वाचतो. शरीरसुख कमी होईल ही भीती खरोखरच लोकांच्या मनात असते. असे असताना हा प्रचार हास्यास्पद का ठरतो? किंवा औचित्यभंग करणारा का ठरतो? तर मुळात आपण आपल्या समाजात लिंगविचार हा अतिशय खाजगी, बाहेर अजिबात कधी न बोलण्याचा विषय मानतो. शरीरसुख सर्वांनाच हवे असते; पण ते हवे आहे किंवा हवे असण्याजोगे त्यात काही आहे, असे उघडपणे कबूल करण्याची आपल्या समाजाची व पर्यायाने व्यक्तीची पद्धत किंवा खरे तर हिंमत नाही. शरीरसुख हवे आहे हे जोपर्यंत स्वच्छपणे सांगता येत नाही तोपर्यंत निरोध वापरून ते अनिर्बंध मिळेल हे सांगण्यात हास्यास्पदता येणार. शरीरसुख घेणे हे व्यक्तिगत निर्णयावर अवलंबून असले तरी ते घ्यावे की नाही, कितपत, कुठे, कसे घ्यावे हे अशा रीतीने समाज अप्रत्यक्षतः रूढी, चाली-रीती, वृत्ती इत्यादींद्वारे ठरवीत असतो. तेव्हा निरोध वापरून वैवाहिक जीवनाचा आनंद कमी होत नाही असे रात्री साडेदहा वाजता आपण ऐकतो तेव्हा काही वैयक्तिक दिलासा मिळत असेल; पण सामाजिक औचित्यभंग होतो. तेव्हा कुटुंब नियोजनासाठी माणसाचे व समाजाचे मन तयार करायचे असेल तर नुसते आर्थिक लाभ देऊन भागणार नाही, लैंगिक क्रिया, गर्भधारणा इत्यादींची बटबटीत माहिती देऊन भागणार नाही तर मुळात समाज व व्यक्तीची लैंगिकतेबद्दलची वृत्ती बदलावी लागेल. त्याचे शिक्षण सुरू करावे लागेल. ज्या देशात वात्स्यायन एके काळी कामसूत्र सांगू शकला, खजुराहोसारखी अद्वितीय शिल्पे निर्माण झाली, लैंगिक क्रियांची सर्व वर्णने स्पष्टपणे स्त्रियांनासुद्धा संस्कृतमध्ये बोलता येत होती त्या देशात नंतर इतके अंधःकाराचे साम्राज्य पसरावे हे खेदकारक असले तरी सत्य आहे. आज आपल्याकडची लैंगिक क्रिया ही जैविक (बायॉलॉजिकल, व्हेजिटेटिव्ह) आहे. त्यातील कामक्रीडा व जननक्षमता हे दोन भाग वेगळे करता येतात. एवढेच नव्हे तर वेगळे केले पाहिजेत याचे शिक्षण स्वच्छ व स्पष्ट स्वरूपात आधी दिले पाहिजे. आपले मन या चिकटघातून आधी सोडविले पाहिजे तरच आपल्याला कुटुंब नियोजनाचे महत्त्व आपोआप पटू लागेल. खरे म्हटले तर हा भाग शिक्षणाचा आहे; पण या ओढाताणीत फाटलेली मने येऊन उभी राहतात ती मात्र मनोविकारक्षेत्रात. म्हणून मनोविकारशास्त्राला यात अधिक रस घ्यावा लागतो.

## एकांगी स्त्री-पुरुषत्व कल्पना

पुरुषत्व, स्त्रीत्व याबाबतच्या आपल्या कल्पना अशाच जननक्षमतेशी निगडित आहेत. पुरुषव्यक्तिमत्त्व हे अधिक धडाडीचे, अधिक आधार देऊ शकणारे, अधिक संकटे सहन करू शकणारे, अधिक कणखर असते ही कल्पना आधी रुजविली पाहिजे. अधिक मुले जन्माला आणण्यासाठी अधिक पुंबीजे स्त्रीच्या शरीरात टाकण्याची क्षमता हीच काही पुरुषत्वाची एकमेव कसोटी नाही. किंबहुना ती कसोटी एवढी महत्त्वाची नाही हा विचार समाजात वाढीस लावणे, त्या दृष्टीने माणसाचे मन तयार करणे हा कुटुंब कल्याण कार्यक्रमाचा एक भाग व्हावयास पाहिजे. नाही तर एका बाजूने निरोधला विरोध व दुसऱ्या बाजूने नसबंदी केल्यानंतर येणाऱ्या मानसिक प्रश्नांचा इलाज या चक्रातून हा कार्यक्रम बाहेर येणार नाही.

आपल्याकडची स्त्रीत्वाची कल्पना अशीच एकांगी आहे. मुले धारण करण्याची क्षमता म्हणजे स्त्रीत्व असे स्त्रियांना मनापासून वाटते. तशात आपली स्त्री पुरुषापुढे नमते घेणारी आहे. त्यामुळे कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रियेची वेळ आली की, पुरुष बाजूला राहतो व स्त्रीची शस्त्रक्रिया केली जाते. मुले धारण करण्याची शक्ती गेली की तिला आपल्या स्त्रीत्वात कमीपणा वाटू लागतो. त्यातून येणारे औदासिन्य, चिडचिडेपणा, अपूर्णतेची जाणीव याचा इलाज करीत बसावा लागतो. तेव्हा स्त्रीत्व हे नुसते शारीरिक नाही व ते गर्भधारणक्षमतेवर अवलंबून नसून स्त्रीत्व हा व्यक्तिमत्त्वाचा एक गुण आहे. अधिक प्रेम, अधिक क्षमाशीलता, अधिक माया, अधिक स्वीकृती, अधिक चेतना देण्याची क्षमता हे स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचे घटक आहेत ही जाणीव प्रयत्नपूर्वक वाढवायला पाहिजे. म्हणजे मग कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रियेनंतर स्त्रीला कमीपणा वाटणार नाही. पुरुषत्व व स्त्रीत्वाच्या या कल्पना लोकांच्या मनात पक्क्या झाल्या की मग पुरुषांनी टाळाटाळ करण्याचे प्रमाणही कमी होईल व कुटुंब नियोजन अधिक स्वेच्छेने केले जाईल.

स्त्रीत्वाची किंवा पुरुषत्वाची कल्पना जोपर्यंत जननक्षमतेशी निगडित आहे तोपर्यंत आपली एक विचित्र समस्या उभी राहते. अर्थात प्रमाण फार कमी असले तरी तिचे अस्तित्व नाकारून चालणार नाही व ती म्हणजे अधिक मुले जन्माला घालीत राहून स्त्रीला लग्नाच्या बेडीत जखडून ठेवणे. अधिक मुले जन्माला आणण्याची क्षमता म्हणजे आपल्या पुरुषत्वाचे मुख्य लक्षण आहे, असा वृथा अभिमान हे पुरुष बाळगतात व त्यामुळे ही क्षमता गेल्यास आपण नपुंसक झालो, असा कमीपणा त्यांना वाटतो. म्हणून ते स्वतःच्या शस्त्रक्रियेलाच काय पण निरोध वापरण्यासही तयार होत नाहीत. अशा पुरुषांची स्त्रीबद्दलची भावना ही स्वामित्वाची व कधी कधी संशयाची असते. व स्त्रीत्व म्हणजे गर्भधारणाक्षमता असे त्यांना वाटते. यामुळे आपल्या मनात असेल तेवढ्या मुलांना स्त्रीने जन्म दिलाच पाहिजे, असे त्यांना वाटते. यापुढे जाऊन त्यांना असेही वाटते की, स्त्रीने शस्त्रक्रिया करून घेतली की, वाटेल तसे वागायला ती मोकळी झाली. यात त्यांच्या वर्चस्वाच्या भावनेला धक्का बसतो व या सर्व मनोव्यापारांमुळे ते स्वतः तर कुटुंब नियोजनाच्या पद्धती पाळीत तर नाहीतच; पण पत्नीलाही पाळू देत नाहीत. हे उदाहरण थोडेसे टोकाचे असले तरी यावरून नुसता पुरुषत्व-स्त्रीत्वाच्या चुकीच्या कल्पनांवर प्रकाश पडतो असे नाही तर, अशा व्यक्तींचा विवाह डोळ्यांसमोर आणल्यास विवाहाबद्दलही किती विचित्र कल्पना आपल्या डोक्यात आहेत, हेही लक्षात येईल.

विवाह या संकल्पनेबद्दल सामान्य माणूस फारसा विचार करीत नाही. विवाहित हा सामाजिक दर्जा प्राप्त करून घेणे, नवीन कुटुंब सुरू करणे, जीवनाचा वेगळा मार्ग आक्रमण करण्यास सुरुवात करणे याखेरीज एका व्यक्तीला जीवनातील प्रमुख, महत्त्वाचे स्थान स्वतःहून देण्याची तयारी करणे व एकमेकांना प्रेम देणे-घेणे, एकमेकांचा मान स्वेच्छेने देण्यास शिकणे व एकमेकांच्या व्यक्तिमत्त्वाच्या वाढीसाठी प्रयत्नशील राहणे अशी अनेक कार्ये विवाह या संकल्पनेत

अंतर्भूत आहेत. ही जर माहित व मान्य असतील तर लोक आपोआप कुटुंबाचा आकार मर्यादित राखतील; पण याबाबत बहुतांशी अज्ञान असते त्यामुळे सध्या तरी एका बाजूला कुटुंबाची विचारहीन वाढ व त्यातून निर्माण होणारे प्रश्न व दुसऱ्या बाजूला वैवाहिक बेबनावापासून लैंगिक अकार्यक्षमतेपर्यंचे मानसिक रोग व त्यातून निर्माण होणारे प्रश्न या सर्वांना कुटुंब कल्याणाशी संबंधित असलेल्या कार्यकर्त्यांना तोंड द्यावे लागते. विवाहाची प्रगल्भ कल्पना जर आपण मनात रुजवू शकलो तर कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम किती तरी सोपा होईल.

नवरा-बायकोंचे परस्पर संबंध व वर्चस्वाच्या कल्पना हा एक आणखी वेगळा मानसिक अडथळा आहे. बायको ही अडचणीत मित्र; सल्ला देताना सचिव व रात्री रति असावी असे कालिदास म्हणून गेला खरा; पण बायको अशी अपेक्षिताना नवरा कसा असावा याबद्दल तो काहीच बोलला नाही. बायको अशी वागावी ही अपेक्षा असेल तर नवरा सुद्धा, प्रथम म्हणजे अडचणीत न येणारा, आला तर शौर्याने वागणारा, सल्ला घेताना सुज्ञ व रात्री कामक्रीडाचतुर असावा असे म्हणता येईल व हे सर्व घडवायचे असेल तर परस्परांची मने मोकळी हवीत, परस्परांच्यामध्ये संवाद हवा, सामंजस्य हवे, एकमेकांच्या भूमिका समजून घेण्याचे अगत्य हवे व मतभेद झाले तर ते सहन करण्याची प्रौढता हवी. असे जर घडू लागले तर नवराबायकोमधील केवळ लिंगावर आधारलेल्या वर्चस्वाच्या कल्पना नाहीशा होतील. दोघांतील अधिक चांगले व्यक्तिमत्त्व व्यवहार करील. चांगले कुटुंब वाढीस लागेल व आपल्याला किती मुले हवीत याचा सुज्ञ निर्णय ती घेतील. गर्भपाताचा कायदा नुकताच मंजूर झाला तेव्हाचे उदाहरण सांगतो. एक स्त्री गर्भपातासाठी आली. नवीन कायदा तिने तावडतोब समजावून घेतला होता व तो तिला मोठा आधार वाटत होता. तिचा नवरा तिरकस स्वभावाचा होता. त्यामुळे तो सर्वांशी भांडत असे. अविचारीपणाने खर्च करीत असे. अडचणीत आल्यावर बायकोला मारून दागिने विकीत असे. बायकोने व्यसने कमी करण्याचा दिलेला सल्ला मानीत नसे आणि रात्री जनावरासारखा वागत असे. तीन मुले झाली, त्यांच्या पोषणाचा गंभीर प्रश्न बाजूलाच राहिला व बाईला चौथ्या वेळेस दिवस गेले. नवऱ्याशी बोलताना त्याला गंभीर स्वरूपाचा मानसिक रोग असल्याचे आढळून आले; पण तरीही त्याने व त्याच्या आईने गर्भपातासाठी आलेल्या या स्त्रीला अक्षरक्षः हॉस्पिटलमधून पिटाळून नेले. नवीन मूल जन्माला आल्यावर आनंद होण्याऐवेजी ती बिचारी अक्षरशः ढसाढसा रडली! नवरा-बायकोमधील नाते समजुतीचे नसले की काय होते, याचे हे उत्तम उदाहरण आहे.

## कुटुंबजीवन शिक्षण हवे

व्यक्ती एकटी कधीच रहात नाही. ती कुटुंबाशी संबंधित असते. कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम हा कुटुंब कल्याणाचा कार्यक्रम व्हायला पाहिजे. कुटुंबातील सर्व व्यक्ती एकमेकांशी क्रिया-प्रतिक्रिया व्यक्त करीत असतात. ही सर्व जिवंत व्यक्तिमत्त्वे असतात. त्या सर्वांना मन असते. त्यामुळे नवीन मूल जन्माला येण्याचा निर्णय सर्व कुटुंबाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे, ही जाणीव वाढीस लागली पाहिजे. एका कुटुंबात नवरा काही विशेष काम करीत नव्हता. भाऊ सर्व व्यवहार पहात. सर्व अडचणींवर लग्न हे उत्तर आहे, अशी एक समजूत रूढ आहे. हा माणूस काम करीत नाही तर त्याचे लग्न करून द्या म्हणजे सर्व ठीक होईल, असा सर्वांनी निर्णय घेतला व त्याचे लग्न करून दिले. हे नवरोजी म्हणजे बाहेर तोंडपाटील व घरचे शेर! बायकोची विचित्र स्थिती होऊ लागली. अशात एकापाठोपाठ तीन मुले जन्माला आली. त्याचा जाच भावांना होऊ लागला. चौथ्या मुलाच्या वेळी भावांनी या जोडप्याला घर सोडण्यास सांगितले. कुटुंबात काय घडते आहे याबाबत आडमुठेपणाने वागले की दुसरे काय होणार? या कुटुंबात कुटुंब नियोजनाचा सल्ला पोहोचला नव्हता असे थोडेच आहे? पण कुटुंब नियोजन म्हणजे कापाकापी नव्हे तर अधिक चांगल्या कौटुंबिक आयुष्याची वाट आहे, हे त्यांना कोणी पटवून सांगितले नाही. हॉस्पिटल्स तयार आहेत, डॉक्टर्स शस्त्रे परजून उभे आहेत, हॉस्पिटलच्या बाहेर वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न थैमान घालतो आहे. नियोजनयोग्य जोडपी हजारांच्या संख्येने आहेत. मग नाही ते काय? फक्त या जोडप्यांच्या मनाची तयारी कोणी केली नाही. मनाला उभारी नाही तर कार्यक्रम कसा उभा राहील?

शिक्षणाचा प्रसार, वाहतुकीची व प्रचारमाध्यमांची सोय व वेगाने होणारे खच्चीकरण यामुळे आणखी एक मानसिक प्रश्न कुटुंब नियोजनासमोर येऊन उभा रहात आहे. अनेक वेळा असे आढळते की अर्धशिक्षित जोडपी स्वेच्छेने हा उपचार करून घेतात; पण नंतर काही ना काही तक्रारी काढीत बसतात. खुलासेवार चौकशी केली तर असे आढळते की, निरनिराळ्या, गोळ्या, निरोध, विशेषतः शस्त्रक्रिया यांची साधारण माहिती त्यांना असते. त्यामुळे सरकारी पद्धतीत ते १००% स्वेच्छेने आले असे ठरते; पण शहरीकरणामुळे होणारा जीवनपद्धतीमधील बदल, मोठ्या कुटुंबाकडून स्वकेंद्रित कुटुंबाकडे वाटचाल, याचे फायदे-तोटे, ताण याची त्यांना कल्पना नसते. त्यांचे मन खेड्यात व मोठ्या कुटुंबात रमत असते व यामुळे येणारी मानसिक अशांतता ते कुटुंब नियोजनावर आरोपीत असतात. त्यामुळे कुटुंब नियोजनाच्या पद्धती व मोहीम कुप्रसिद्ध होते.

कुटुंबजीवन शिक्षण सर्वांना दिले पाहिजे. लैंगिक शिक्षण व कुटुंब नियोजनाचा हेतू व पद्धती यांचा त्या शिक्षणात अंतर्भाव हवा. नवरा बायको व इतर कुटुंबीय यांचे संबंध जेवढे अधिक मोकळे व निरोगी होतील तेवढी कुटुंब कल्याण योजनेची प्रगती स्वेच्छेने व वेगाने होत राहील.

निरोगी मनोव्यापार, व्यक्तींमधील निरोगी परस्पर संबंध व प्रतिक्रिया, भरीव व्यक्तिमत्त्व बनविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न, लैंगिकता, स्त्रीत्व-पुरुषत्वाच्या सघन कल्पना, विवाह, कुटुंबव्यवस्था याबाबतच्या प्रौढ कल्पना या सर्वांचा मनाशी संबंध, मनाचा कुटुंब नियोजनाशी संबंध व अशी निरोगी मने निर्माण केल्यास कुटुंब कल्याण योजना स्वेच्छेने पुढे जाण्यास होणारी भरीव मदत व त्यासाठी मानसिक तयारीची आवश्यकता, कुटुंबजीवन शिक्षण व लैंगिक शिक्षणाची आवश्यकता असे मुद्दे आपण आतापर्यंत पाहिले. आता, विवाह आणि कुटुंबनियोजन यातील मानसिक भागाकडे दुर्लक्ष केल्याने जे प्रश्न उपचारार्थ येऊन उभे राहतात त्यांची काही उदाहरणे पाहू.

आपल्याकडची लग्ने बहुश: ठरवून होतात. विवाहपूर्व परिचय आपल्याकडे अजून सामान्य झाला नाही. त्यामुळे आर्थिक स्थैर्याच्या कसोटीवर विवाह जुळविले जातात. व्यक्तिमत्त्वाचा विचार केला जात नाही. न जुळणारी किंवा परस्परविरोधी व्यक्तिमत्त्वे एकत्र आली की कौटुंबिक बेबनाव होऊ लागतो. परिणामत: जोडपे दु:खी राहते, कौटुंबिक बेबनावाबरोबर लैंगिक बेबनाव आल्यास मुले जन्माला न येणे, इच्छेपेक्षा कमी संख्येत जन्माला येणे, कौटुंबिक तक्रारींबरोबर चीड किंवा संशय असल्यास शिक्षा किंवा बेमुर्वतपणा म्हणून खूप मुले जन्माला घालणे असे परिणाम होतात व नको असलेली मुले, मग ती एक असोत किंवा अनेक, जन्माला आली की त्यांचेही व्यक्तिमत्व विकृत बनते. तेव्हा कुटुंब नियोजन यशस्वी करायचे असेल तर नुसता मुलांच्या संख्येवर किंवा कुटुंबाच्या आकारावर भर देऊन चालणार नाही, तर आहे ते कुटुंब सुखी कसे होईल ते पाहिले पाहिजे; म्हणजे विवाहपूर्व व्यक्तिमत्त्वपरीक्षा व विवाहोत्तर मानसोपचार हा कुटुंब कल्याण कार्यक्रमाचा एक भाग बनला पाहिज.

## त्रिकोणाबाहेर

याची पुढची पायरी म्हणजे गंभीर मानसिक रोगाने आजारी असलेल्या व्यक्तींचा विवाह टाळला पाहिजे. केला तर उपचाराची सोय पाहिजे. घटस्फोटाचा कायदा अधिक सोपा केला पाहिजे व अशा व्यक्तींना आपले स्वत:चे हित न कळण्याइतपत गंभीर मानसिक आजार झाला असेल तर सर्व संबंधितांचा सल्ला व परवानगी, निरनिराळ्या वैद्यक तज्ज्ञांची तसेच कुटुंबजीवन तज्ज्ञांची मते घेऊन, त्यांचे कुटुंबनियोजन करण्याचा कायदेशीर अधिकार शासनाला मिळायला पाहिजे. मोठ्या प्रमाणावरचे व जुनाट वेड, आनुवंशिक गंभीर बुद्धिमंदता इत्यादी रोगांच्या संदर्भात याचा विचार जरूर करायला हवा.

लग्नाआधीपासून असलेला मानसिक आजार बुद्धिपुरस्सर लपवून ठेवणे किंवा 'लग्न केल्यावर सर्व सुधारेल' अशी भाबडी समजूत खरोखर असणे यापायी कित्येक नवीन जोडप्यांचे संसार दु:खी होतात, मुले अकारण जन्माला येतात, येणारी वेडेपणाच्या छायेत वाढतात; पण या व्यक्तींना धड कुटुंब नियोजनाचे महत्त्व पटवूनही सांगता येत नाही, धड सक्तीही करता येत नाही. विवाह ही घटना जास्त सूज्ञतेने हाताळण्याची मनाची तयारी करणे, त्या पद्धतीचे समाजशिक्षण देणे व विवाह सल्लागार मंडळाकडून, ज्यात सर्व शाखांचे तज्ज्ञ असतात, विवाहपूर्व परीक्षा व सल्ला घेणे हा एकच मार्ग या समस्येवर दिसतो. सांगण्याचा मुद्दा असा की, कुटुंब कल्याण-कार्यक्रमाच्या कक्षा गोळ्या, निरोध, शस्त्रक्रिया या त्रिकोणाबाहेर रुंदावल्या पाहिजेत.

पाळणा लांबविणे की थांबविणे याचा सल्ला देताना नुसती मुलामुलींची संख्या व वये याचा विचार करून थांबता कामा नये, तर मुले असणे व नसणे याबाबत त्या जोडप्याच्या भावना व वृत्ती काय आहेत याचा विचार केला पाहिजे. विशेषत: ऑपरेशनचा सल्ला देण्यापूर्वी जोडप्याचे लैंगिकतेबद्दलचे विचार लक्षात घेतलेच पाहिजेत. जननक्षमता व शरीरसुख हे ज्या देशात एकच समजले जातात, पुरुष हे पुल्लिंगी असल्याने श्रेष्ठ ठरतात, कामजीवनामध्ये विचार व जाणीवपूर्वक अनुभवाऐवजी अज्ञान व पशुवत उपभोग हे जिथे साधारण समजले जाते तिथे जननक्षमता थांबविण्याच्या शस्त्रक्रियेचे महत्त्व व्यक्तिगणिक बदलणार, एवढेच नव्हे तर चुकीच्या वृत्तींपायी जोडण्याच्या दु:खास कारणीभूत होणार हे उघड आहे. कुठल्याही डॉक्टरच्या दवाखान्यात, विशेषत: फॅमिली डॉक्टर, स्त्री-रोगतज्ज्ञ व मनोविकारतज्ज्ञ यांच्या दवाखान्यात असे रुग्ण सहजासहजी भेटतात. त्यांना अनेक बारीक-सारीक शारीरिक तक्रारी उद्भवत असतात व त्या सर्वांचे मूळ ते नसबंदीपर्यंत नेत असतात. सर्व शारीरिक तपासण्या होतात. कुठलाच शारीरिक रोग नसल्याचे सिद्ध होते. या पेशंट्सच्या मानसोपचाराची सुघटित सोय अजून तरी कुटुंब कल्याण-कार्यक्रमात केलेली नाही. ती केली पाहिजे. कारण हे रुग्ण आपल्या तक्रारी सांगत फिरतात व इतर अनेकांना कुटुंब नियोजनापासून परावृत्त करतात. याशिवाय 'छोटे कुटुंब सुखी कुटुंब' याचा संख्यात्मक अर्थ लावण्याच्या नादात हा कार्यक्रम गाळात गेला, हे अधिकारी व मंत्री यांनी लक्षात घेतले पाहिजे. सुखी कुटुंब खरेच करायचे असेल तर त्याचा आकार व आर्थिक बाजू एवढेच महत्त्वाचे नसून सुख हे मानण्यावर आहे, बरेचसे सुख मानसिक आहे हे आपल्याला कळायला पाहिजे. आधी असलेल्या मानसिक तक्रारी कुटुंब नियोजनामुळे वाढू शकतात किंवा कधी कधी नवीन उद्भवू शकतात. त्यांच्या उपचाराची व्यवस्था व्हावयाला पाहिजे.

आणीबाणी संपून नवी विटी नवीन राज्य सुरू झाले. आणीबाणीतील अत्याचारांवर जादूची फुंकर घालणाऱ्या देवदूताची भूमिका शासनाने घेतली व अत्याचारित व्यक्तींच्या तोडलेल्या नसा अथवा नलिका विनामूल्य परत दुरुस्त करून दिल्या जातील, अशी घोषणा केली आणि नसबंदी, नलिकाबंदी केलेल्या पुरुष-स्त्रियांच्या रांगाच्या रांगा केंद्रांपुढे लागू लागल्या. झालेला अन्याय दूर करण्याची शासनाची भूमिका काही अंशी बरोबर होती; पण ही घोषणा व नंतरच्या रांगा यांनी काही मूलभूत मानसिक प्रश्नांना हात घातला आहे. दुरुस्तीच्या शस्त्रक्रिया करता येतात हे खरे असले तरी त्याचे फलित अजून नक्की झालेले नाही व त्या शस्त्रक्रियेचे स्वत:चे दुष्परिणाम आहेत, हे लक्षात न घेता अशी सवंग घोषणा करून शासनाने डळमळित भूमिका जाहीर केली. त्यामुळे लोकांचा कुटुंब कल्याण कार्यक्रमावरचा विश्वास उडाला व या क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांची मानसिक नसबंदीच काय, पण खच्चीकरण झाले व नियोजनयोग्य जनतेचा बुद्धिभेद झाला. दुरुस्तीची शस्त्रक्रिया करता येत असली तरी व्यवहारत: नसबंदी अथवा नलिकाबंदी या शस्त्रक्रिया कायम स्वरूपाच्या मानल्या पाहिजेत व जोडप्यांना त्यासाठी उद्युक्त करताना त्याच पद्धतीने पटवून सांगितले पाहिजे. सल्ला देताना, आता तुमचे कुटुंब कायमचे याच आकाराचे राहणार, असे गृहीत धरून पुढच्या आयुष्याचे चित्र रंगविणे हे सल्लागार व

**विवाहोत्तर मानसोपचार हा कुटुंबकल्याण कार्यक्रमाचा एक भाग बनला पाहिजे.**

नियोजनयोग्य जोडपे या दोघांच्या दृष्टीने सोपेच नाही तर अधिक श्रेयस्कर आहे. 'बघा बुवा, ही शस्त्रक्रिया करून घ्या म्हणजे बहुतेक तुम्ही तुमचे कुटुंब आहे त्या आकाराचे ठेवू शकाल. नाही तर हरकत नाही, परत या, सर्व दुरुस्त करून देऊ !' ही भूमिका वाचतानासुद्धा हास्यास्पद वाटते. ते जोडपे सरळ म्हणेल 'पण एवढा उद्योग करण्यापेक्षा आताच आम्ही तुमच्या केंद्रातून सरळ बाहेर पडणे अधिक सोपे नाही का ?' नियोजनयोग्य जनतेची योग्य ती मानसिक तयारी करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ती मानसिक तयारी करवून घेण्यासाठी शासनाने अचल व खंबीर धोरण स्वीकारणे हेही आवश्यक आहे. शासनाने स्वतःची मानसिक तयारी याबाबत केली पाहिजे.

दुरुस्तीच्या शस्त्रक्रियांच्या संदर्भात आणखी एक अनुभव व्यावसायिक क्षेत्रात आला. मघाशी उल्लेख केलेला रुग्णांचा एक वर्ग, ज्यात अधिक मानसिक आजार नसबंदी अथवा नलिकाबंदीने बळावतो किंवा नवीन आजार चालू होतो, या वर्गातील अनेक रुग्ण दुरुस्तीच्या शस्त्रक्रियेने त्यांचा रोग जाईल का, असे विचारू लागले. नक्की निष्कर्ष माहीत नसलेल्या या शस्त्रक्रियेबद्दल व्यावसायिक सल्ला देताना मनोविकार तज्ज्ञांची काहीशी पंचाईत झाली; पण या पंचायतीपेक्षा महत्त्वाचा मुद्दा हा की, मुळात या रुग्णांची कायमच्या कुटुंब नियोजनपद्धतीसाठी अपुरी मानसिक तयारी करून घेतली होती, हे उघडकीस आले. तेव्हा ज्या पद्धतीचा सल्ला कुटुंब कल्याण तज्ज्ञ देतील ती पद्धत त्या कुटुंबाला योग्य आहे की नाही याचा सर्व बाजूंनी, मानसिक धरून, विचार करून तो सल्ला दिला पाहिजे. एवढेच नव्हे तर तो सल्ला प्रत्यक्षात आणण्यासाठी पक्की मानसिक तयारी करण्याचे कामही त्या तज्ज्ञाबरोबर असलेल्या इतर कर्मचारी सचाला करावे लागेल, हे लक्षात घेतले पाहिजे.

## शासन–कर्मचारी यांची मानसिक तयारी !

आतापर्यंत सर्व भर जनतेच्या मानसिक तयारीवर दिला. आता शासन–कार्यकर्ते यांच्या मानसिक तयारीचा भाग थोडक्यात बघू. शासनाने खंबीर व अचल, जास्त व्यापक, सर्वसमावेशक भूमिका घेणे आवश्यक आहे. नाही तर नोकरयंत्रणा, कार्यकर्ते व जनता या सर्वांचाच बुद्धिभेद होतो हे वर आलेच आहे. नोकरयंत्रणा व कार्यकर्ते यांचा बुद्धिभेद झाला की, या कार्यक्रमाच्या हातातील हत्यारच गळून पडते. मग तो कार्यक्रम पडेल नाही तर काय होईल ? सरकारी नोकरयंत्रणेचा गलथानपणा व कार्यकर्त्यांच्या मनातील निरनिराळे हेतू हे सर्व लक्षात घेऊनसुद्धा सामान्य जनतेची अजिबात सहानुभूती नसताना, सुरुवातीला तर विरोध असताना हा कार्यक्रम इथपर्यंत रेटीत आणण्याचे श्रेय या दोन वर्गांना द्यायलाच पाहिजे. जरा ढिलेपणाने चालणारी का होईना, पण एवढा मोठा वजनदार गाडा खेचणारी एक यंत्रणा गेल्या पंचवीस वर्षांत निर्माण झाली होती ती आज पार पेकाट मोडून पडली आहे. अशी महागडी चूक राज्यकर्त्यांनी पुन्हा करता कामा नये.

राज्यकर्त्यांच्या मनोधैर्यावरून आता या कार्यक्रमातील कर्मचारी व कार्यकर्ते यांच्या मानसिक तयारीकडे जाऊ. या वर्गातून पाट्या टाकणे व आर्थिक वा इतर लाभ याची भावना अजिबात काढून टाकली पाहिजे. 'एका राष्ट्रीय महत्त्वाच्या पण सरळ माझ्याशी संबंधित असलेल्या कार्यक्रमाचे काम मी करीत आहे,' ही भावना वाढविली पाहिजे. काही सन्माननीय अपवाद वगळता, सामान्य चित्र असे आहे; ते बदलले पाहिजे.

जनतेचा प्रत्यक्ष संबंध येतो त्या कर्मचाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी तर याबाबत आपली मानसिक भूमिका नुसती पक्की करूनच भागणार नाही, तर ती आचरणात आणली पाहिजे. कारण हा वर्ग जनतेत वावरत असतो व कुटुंब कल्याण कार्यक्रमाची प्रतिमा काही अंशी समाज यांच्या वर्तनावरून बनवीत असतो. त्यांना हा कार्यक्रम मनोमन पूर्ण पटला पाहिजे व व्यक्तिगत आचरणातसुद्धा या कार्यक्रमाला कुठे धक्का लागेल असे त्यांनी वागता कामा नये. उदा. कुटुंब नियोजनात काम करणारी परिचारिका कामाच्या वेळेव्यतिरिक्त, समाजाच्या लक्षात येईल असा स्वैराचार करीत असेल तर लोकांचा या कार्यक्रमावरचा विश्वास उडेल. या कार्यक्रमावर पैसा मिळविणारा प्रमोटर स्वतः माजलेला, व्यसनी, समाजाच्या दृष्टीने 'लोकांना खच्ची करणारा बडव्या' असेल तर ते योग्य नाही. शस्त्रक्रिया करताना डॉक्टर आवश्यक ते शल्यशास्त्रीय नियम पाळीत नसेल किंवा योग्य त्या गंभीरतेने वागत नसेल तर कार्यक्रम मार खाईल. सामाजिक कार्यकर्ता इतरत्र बोलताना कार्यक्रमावर, लोकांच्या माठपणावर, सरकारी यंत्रणेवर किंवा कार्यकर्त्यांवर विनोद करीत असेल, तोंडसुख घेत असेल किंवा टीका करीत असेल तर त्या प्रमाणात लोकांचा विश्वास ढळू लागेल वैयक्तिक आचरणाखेरीज, या क्षेत्रकर्मचाऱ्यांकडून जनतेच्या अपेक्षा वाढत चालल्या आहेत असे आता लक्षात येऊ लागले आहे. कामगारांच्या निरनिराळ्या गटांशी बोलत असताना ते स्वच्छपणे म्हणाले आहेत, 'हे सर्व सांगायला तुम्ही परिचारिका, हेल्थ व्हिजिटर, सामाजिक कार्यकर्ते यांना का नाही प्रशिक्षण देत ? हा विषय अमुक एका पद्धतीने सांगितला तर पटतो; पण कर्मचाऱ्यांना तशा पद्धतीने सांगता येत नाही किंवा आजच्या सभेत हा एक नवा पैलू अथवा विचार कळला. क्षेत्रकर्मचारी हा विचार बोलून दाखवीत नाहीत.' कुटुंब कल्याणाचा कार्यक्रम यशस्वी व्हावयाचा असेल तर नुसत्या जनतेचीच नाही तर शासन व कर्मचारी–कार्यकर्ता–वर्ग यांचीही मानसिक तयारी करावी लागेल. त्यांच्याही मनाचा विचार करावा लागेल,

लोकसंख्यावाढीचा राक्षस जर शत्रू मानला, शासन सेनापती, कर्मचारी–कार्यकर्ते, यंत्रणा हे शस्त्र व जनतासेवा मानली तर अखेरीस हे म्हणता येईल की, नुसत्या सेनापती, शस्त्रे व सेना यावर युद्ध जिंकता येत नाही. त्यांचा दर्जा उत्तम आणि सामंजस्य श्रेष्ठ पाहिजे आणि त्यांची नुसती शरीरेच धडधाकट असून भागणार नाही तर मनही विजिगीषु बनवावे लागेल.

□

# जनाब-ए-अली वजीर निहाल अहमद इनके साथ गुफ्तगु

फार्सीमिश्रित उर्दू मथळचाने दचकण्याची गरज नाही. उर्दू एक रुबाबदार जबान आहे. फार्सी आणि उर्दू ह्या दोन्ही भाषांचा मराठीवर थोडा–फार असरदेखील पडलेला आहे.

आपले रोजगार-विकास आणि तंत्रशिक्षण-मंत्री श्री. निहाल अहमद मालेगावचे आहेत आणि मराठी उत्तम बोलतात. सायकलवरून अविरत फिरत समाजात सर्वत्र काम करणारा, लोकांविषयी अंतःकरणात खरी कळकळ असणारा, गरिबांसाठी झटणारा एक प्रामाणिक कार्यकर्ता अशी त्यांची ख्याती आहे.

तन्‌जीम–ए–खानबादगी, म्हणजेच कुटुंब नियोजन ह्या विषयावर मी त्यांची मुलाखत घेतली तेव्हा श्री. शरदराव पवार ह्यांचे संपूर्ण मंत्रिमंडळ ठरण्याच्याही अगोदर श्री. निहाल अहमद ह्यांचे मंत्रिपद जाहीर झाले होते– खाते तेव्हा ठरले नव्हते.

सर्वसाधारणपणे मंत्री म्हटले की, थाटमाट, भपका, रुबाब, वागण्यात एक वेगळीच ऐट अशी माझी पूर्वानुभवावरून झालेली समजूत श्री. निहाल अहमद ह्यांची भेट झाल्यावर बदलली. आपले हे नवीन मंत्री अगदी साधे आहेत. आपल्या गरीब देशाला शोभतील असे. त्यांच्या बोलण्यात अरेरावी नाही, भीती घालणारी जरब नाही. वागण्यात कुठल्याही प्रकारचा कृत्रिम बडेजाव नाही. नजर मात्र विलक्षण तीक्ष्ण आहे. विचारांना धार आहे; पण ती जहरी नाही.

अशी माणसे मंत्रिमंडळात येत आहेत ही गोष्ट भाग्यसूचक आहे. ऐंशी टक्के लोकसंख्या गरिबीतून बाहेर पडण्याची धडपड करीत असलेल्या भारत देशाचा विकास जनतेच्या कल्याणासाठी योग्य दिशेने वाटचाल करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे हे एक आशादायक शुभचिन्ह आहे.

श्री. निहाल अहमद मराठी भाषेतून मुलाखत देण्यास तयार होते; पण मला स्वतःलाच उर्दू आणि हिंदी बोलण्याची हौस भागवून घ्यावयाची होती. आपणासमोर मात्र त्या सवाल–जवाबांचा मराठी तर्जुमा पेश करतो– बा आदब.

सवाल : मुसलमान धर्माचे एक भारतीय नागरिक आणि महाराष्ट्र सरकारचे मंत्री ह्या दोन्ही भूमिकांतून कुटुंब नियोजन ह्या विषयीची आपली राय वाचकांसमोर मांडण्याचा इरादा आहे. कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाला आज पुन्हा नव्याने गती देण्यासाठी काय केले पाहिजे ?

जबाब : लोकशिक्षण ! त्याची फार मोठी गरज आहे. सरकारी, निमसरकारी आणि स्वयंप्रेरणेने कार्य करणाऱ्या संस्था ह्या सर्वांनी ह्याबाबत पुढाकार घेतला पाहिजे. जुलूम, जबरदस्ती, सक्ती वगैरे प्रकाराने हे करायचे नसेल तर लोकांना ह्याचे महत्त्व पटवून देण्याखेरीज दुसरा मार्गच नाही.

मुसलमानांच्या बाबतीत बोलायचे झाले तर मला वाटते, त्यांच्या मनात अजूनही कुटुंब नियोजनाबद्दल थोडा संदेह आहे. अशा काही मुसलमानांच्या धार्मिक गैरसमजुती दूर करण्यासाठी, इतर इस्लामधर्मी राष्ट्रे कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम कशा प्रकारे अंमलात आणीत आहेत, हे आपल्याकडच्या मुसलमानांना समजावून दिले पाहिजे.

मला तर असे वाटते की, ज्या ज्या इस्लामिक देशांमध्ये कुटुंब नियोजन कार्यक्रम प्रचारात आहे त्या सर्व देशांतील कार्यकर्त्यांना, अधिकाऱ्यांना आपल्या इथे बोलावून त्यांच्याद्वारे त्यांच्या त्यांच्या देशातील कुटुंब नियोजन कार्यक्रम खास आपल्या मुसलमान समाजाला समजावून सांगावा. ह्या लोकांच्या मुलाखती, त्यांचे विचार, त्यांच्याकडील कार्यक्रमांची रूपरेषा, ह्याचा आपल्या मुसलमानांत प्रचार करावा.

इस्लामिक राष्ट्रे कुटुंब नियोजनाचा प्रचार कसा करतात, ह्याचादेखील आपण अभ्यास करणे अगत्याचे आहे. त्या क्षेत्रातील त्या त्या देशामधील तज्ज्ञांनी इथे भेटी देऊन आपल्या मुसलमान समाजासाठी थोडा प्रचार केला, तर निश्चितच फायद्याचे होईल.

सवाल : मी जेव्हा इराणमध्ये होतो तेव्हा कुटुंब नियोजनाच्या प्रचारासाठी 'खाने-ए-शुमा–बाग-ए शुमा' ह्या नावाची पहिली फिल्म इराणी सरकारसाठी युनोतर्फे बनवली होती. त्या वेळी मी इस्लामिक धर्माच्या देशांमधून ह्या कार्यक्रम कसा चालू आहे, ह्याचा थोडा अभ्यास केला.

त्या वेळेस, मला आठवतंय इंदिराजींचे सरकार असताना, आपण म्हणता त्याप्रमाणे माहिती गोळा करण्याचा प्रयत्न चालू होता. ह्या इस्लामिक देशांमध्ये कुटुंब नियोजनाबद्दल दाखवल्या जाणाऱ्या फिल्मस् जमा करून त्या भारतामध्ये दाखवाव्यात अशा कल्पनेचादेखील विचार चालू होता; पण निवडणुकीनंतर, जनता पार्टीचे नवीन सरकार स्थापन झाल्यावर हा विचार मध्येच कुठे तरी गहाळ झाला असावा.

आपण आता जी सूचना केली, जे विचार मांडलेत ते अतिशय महत्त्वाचे आहेत. मध्यवर्ती सरकारने मनात आणले तर हे होणे सहज शक्य आहे. सध्याच्या ह्या राजकीय अस्थिरतेच्या वातावरणात कुटुंब नियोजन हा विषय असा किती दिवस नुसताच पडून राहणार ?

जबाब : हा विषय केवळ राजकारणाचाच आहे, असे नव्हे. अजूनही तो थोडा फार 'धार्मिक'देखील आहे. निदान काही मुसलमानांच्या मते तरी.

राजकारणापासून हा विषय अलग करण्याची जबाबदारी मध्यवर्ती सरकार, राज्य सरकारे, वेगवेगळ्या पॉलिटिकल पार्टीज्… म्हणजेच आम्हा मंडळींची आहे, हे मी नाकारत नाही. हे करण्यासाठी भारतामधील सर्व मुख्यमंत्र्यांना, त्या त्या राज्यसरकारच्या काही निवडक मंत्र्यांना एकत्र बोलावून मध्यवर्ती सरकारने त्यावर मनमोकळी चर्चा आयोजित केली पाहिजे. अशा कॉन्फरन्समध्ये विचारविनिमयाने, समझोत्याने ह्या विषयावर प्रस्ताव मांडला गेला पाहिजे. ह्या कार्यक्रमांनी कुठली दिशा घेतली पाहिजे, हे ठरवून त्या विषयीच्या मार्गदर्शक सूचना राज्यसरकारला मिळणे आवश्यक आहे.

आता राजनारायण ह्यांनी त्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्या जागी येणाऱ्या नव्या मंत्र्यांकडूनदेखील ह्या कार्यक्रमाला चालना मिळण्याची शक्यता आहे.

अलीकडेच स्वतः पंतप्रधान मोरारजी देसाई देखील कुटुंब नियोजनाबद्दल काही निश्चित स्वरूपाची स्पष्ट मते प्रदर्शित करत आहेत– काही धोरणे ठरवीत आहेत. ह्या सर्वांतून लवकरच काही तरी सुरू होईल, अशी अपेक्षा बाळगण्यास हरकत नाही.

सवाल : आताच आपण म्हणालात की, हा प्रश्न थोडा–फार 'धार्मिक' देखील आहे. हा कार्यक्रम जर पुन्हा गतीने अंमलात आणावयाचा प्रयत्न झाला–टारगेटस् ठरविली गेली, नसबंदी शस्त्रक्रियेचे कँपस् सुरू झाले तर मुसलमान समाजातून–विशिष्ट गोटातून काही प्रतिक्रिया येईल असे आपल्याला वाटते का ? ही प्रतिक्रिया पॉलिटिकल् स्वरूपाची असेल का 'धार्मिक' स्वरूपाची ?

जबाब : काही विशिष्ट गटाकडून प्रतिक्रिया जरूर येईल आणि पॉलिटिकलपेक्षा ती 'धार्मिक' असेल. सुदैवाने अशा मंडळींचा मुसलमान समाजावर फारच कमी प्रमाणात प्रभाव आहे.

कुटुंब नियोजनाबद्दल धार्मिक स्वरूपाची प्रतिक्रिया फक्त मुसलमान समाजातूनच येईल असे समजू नका. आपल्या भारत देशात सर्वत्र सर्वसामान्य जनतेच्या मनात ह्याबद्दल थोडचा–फार 'धार्मिक' गैरसमजुती आहेतच.

सवाल : आपण कुटुंब नियोजनाचे महत्त्व पटवून देण्यासाठी मुसलमान समाजात स्वतः प्रचार करता का ? कशा प्रकारे ?

जबाब : मी पहिल्यापासूनच ह्याविषयी प्रचार करीत असे आणि करीत रहाणार; पण आणीबाणीच्या काळात ज्या प्रकारे ह्याचा प्रचार होत होता त्या प्रकारे नाही. ते प्रचार देखील जुलुम–जबरदस्तीने करीत. त्यांची बोलायची पद्धत वेगळी होती. ढंग वेगळा होता.

मुसलमानांमध्ये काही थोडे असे आहेत की, सत्तेवर असलेल्या सरकारची खुषामत करण्यासाठी, त्यांची मर्जी संपादन करण्यासाठी हे लोक 'मीठी जबान' वापरतात. त्यांना तशी सवयच आहे. स्वतःला काही पटलंय म्हणून किंवा स्वतःची एखाद्या कार्यक्रमावर निष्ठा आहे म्हणून कार्य करण्यासाठी हे पुढे येत नाहीत. फक्त सत्तेवर असलेल्या मंडळींना खूप करण्यासाठी कार्य करीत असल्यासारखं ते भासवतात.

मला असलं जमत नाही. तुम्हाला एक उदाहरण सांगतो मी जेव्हा जेलमध्ये होतो तेव्हा महाराष्ट्राच्या जमाइत–ए–इस्लामचे चेअरमन आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मंडळींचा जेलमध्ये रोज एकत्र कार्यक्रम चालायचा.

एकमेकांची, एकमेकांच्या चाली–रीतींची आचार–विचारांची, धर्मकल्पनांची एकमेकास माहिती करून देण्यासाठी त्यांच्यात रोज चर्चा चालत असे. तेव्हा, जेलमध्ये त्यांचा, आर. एस्. एस्. आणि जनसंघ ह्यांचा निकटचा संबंध आला होता.

प्रथम मी त्यांच्या चर्चेमध्ये सामील होत नसे; पण त्यांना अकारण दुखवू नये म्हणून मग मी भाग घेऊ लागलो. त्या वेळी मी एक मुद्दा उपस्थित केला. भारतामध्ये स्त्रियांची संख्या पुरुषांच्या संख्येपेक्षा कमी आहे. महाराष्ट्रात तर पुरुषांपेक्षा तीस लाख स्त्रिया कमी आहेत. ही परिस्थिती असताना आपण धर्माच्या नावाखाली आजही चार चार बायका करू लागलो तर ते योग्य आहे का ? इतर अनेक बाबतीतदेखील देशाची परिस्थिती लक्षात घेऊनच आचरण केले पाहिजे. धर्माच्या नावाखाली वाटेल ते करून कसे चालेल ?

पण मुसलमानांमध्ये मी मघा सांगितले त्याप्रमाणे सरकारची खुषामत करणारी काही माणसे आहेत, तसाच दुसराही, एकदम टोकाचाच विचार करणारा ग्रुपदेखील– हा ग्रुप हमीद दलवाईंना मानतो.

हमीद दलवाई जेव्हा मालेगावला आले तेव्हा माझ्या पार्टीच्या वतीने हार–तुऱ्यांनी मी त्यांचे स्वागत केले. मालेगावच्या काही मुसलमान मंडळींनी त्यांच्या सभेला जाण्याचा, काळे झेंडे दाखविण्याचा विचार केला होता. मी त्यांना म्हणालो, 'काळे झेंडे दाखवून तुम्ही काय मिळविणार ? सभेला न येण्यामध्ये तुमचा काय फायदा किंवा नुकसान होणार ? त्या ऐवजी सभेला या, हमीद दलवाई काय म्हणतात ते ऐकून घ्या. पटले तर बरेच आहे. नाही पटले तर सोडून द्या ! विनाकारणनिदर्शने कशाला करता ?'

मी हमीद दलवाईंचे भाषण ऐकले. त्यांचा मार्ग अगदीच वेगळा. त्यांचे म्हणणे इथला धर्म मानणारा मुसलमान जे काही करतो ते सर्व पाकिस्तानशी संगनमत करण्याच्या हेतूने. मला हे म्हणणे अजिबात पटले नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिले काही दिवस तशी परिस्थिती निश्चितच होती, हे मान्य.

सवाल : आणि तेव्हा तो असणे साहजिक देखील होते. फाळणीनंतर देश तुटला तशीच कुटुंबे देखील तुटली. रिश्तेदारांची ताटातूट झाली. पण आज...

जबाब : आजच्या मुसलमानांचा ओढा पाकिस्तानकडे आहे, असे म्हणणे सर्वस्वी चुकीचेच नव्हे तर अन्यायाचे आहे. हमीद दलवाईंचा वरील प्रकारचा प्रचार नुकसानकारक ठरत असे.

सवाल : आज आपण कुटुंबनियोजनाच्या महत्त्वाविषयी सार्वजनिक सभांतून बोलाल ?

जबाब : आधीच सांगितले, मी हे पहिल्यापासूनच करतो आहे. मजुरांची सभा असली तर मी त्यांना सांगतो, 'तुम्ही किती पैसे मिळविता, तुमच्या घरात किती अन्न आहे ह्याचा विचार करून त्या प्रमाणात, तुम्हाला वाढविता येतील तेवढीच मुले जन्माला घाला. अन्न आणि पैसा ह्या दोन्हीही गोष्टी आपल्या देशात मर्यादित आहेत, तर माणसांची संख्या देखील मर्यादित असणे आवश्यक नाही का ? '

आणीबाणीच्या वेळची एक आठवण सांगतो. तेव्हा मी पॅरोलवर जेलमधून सुटलो होतो. त्या वेळेस मालेगावच्या कलेक्टरनी एक कार्यक्रम आयोजित केला होता कुटुंब नियोजनाविषयीचा. त्या कार्यक्रमात भाषण देण्यास त्यांनी सांगितले. मी म्हणालो, 'शक्य नाही' माझ्या नकाराचे त्यांनी कारण विचारले. तेव्हा मी उत्तर दिले, 'एक तर मी पॅरोलवर असल्यामुळे भाषण करणे योग्य नाही आणि दुसरे म्हणजे, अशा परिस्थितीत मी बोलणे, माझे मत सांगणे म्हणजे ते मी तुमच्या दबावामुळे बोलतो आहे असा लोक त्यातून अर्थ काढतील. म्हणून मी हे करणार नाही.

'पण आणीबाणीआधी, नंतर आणि आज मी कुटुंब नियोजनावर त्याचे महत्त्व लोकांना पटवून देण्याचा माझ्या परीने नेहमी प्रयत्न करतो. समाजाला हे चांगल्या पद्धतीने समजावून दिले पाहिजे, असे माझे स्वतःचे मत आहे.'

□

श्री. निहाल अहमद ह्यांना आदाब–अर्ज करून मी त्यांचे आभार मानले आणि रजा घेतली. त्यांनी काही महत्त्वपूर्ण आणि लक्षवेधी सूचना ह्या मुलाखतीद्वारे केलेल्या आहेत.

श्री. निहाल अहमद ह्यांच्या मुलाखतीतून धर्माच्या नावाखाली विध्वंसक कार्य करणाऱ्या, विकासात अडथळा आणणाऱ्या, प्रगतीच्या मार्गात धोंडा घालणाऱ्या सर्वच जातीधर्मांच्या भारतीय नागरिकांनी आणि त्यांच्या तथाकथित नेत्यांनी शिकण्यासारखे बरेच आहे.

बा इजाजत ! □

[ मुलाखत : विजय परुळकर ]

# सह्याद्री को-ऑप. फर्टीलायझर्स ॲन्ड केमिकल्स् लिमिटेड

ऑफिस

**युकॅरिस्टिक कॉंग्रेस बिल्डिंग नं. ३, ३ रा मजला,**
**५ कॉन्व्हेन्ट स्ट्रीट, मुंबई नं. ४०० ०३९.**
ट. नं. (१) २११०६५ (२) २१५६८६ (३) २१४६९०

फॅक्टरी

**भारत फर्टीलायझर्स इंडस्ट्रीज, इस्टेट, कपूर बावडीजवळ,**
**माजीवाडा, ठाणा.**
टे. नं. (१) ५९२२३९ (२) ५९२२३०

उत्कृष्ट व भरघोस सर्व प्रकारच्या पिकांसाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली
तयार केलेले ' कृषिधन छाप ' दाणेदार मिश्रखत.
उसाच्या एकरी जास्त उत्पादनासाठी
' कृषिधन छाप ' १५ : ५ : ५
स्पेशल दाणेदार मिश्रखत.

**एस्. एन्. सप्रे**
आय्. ए. एस्. ( निवृत्त )
व्हाइस चेअरमन

**मुळचंद गोठी**
एम्. एल्. सी.
चेअरमन



# ही मॅच जिंकलीच पाहिजे

## —माधवराव आपटे

ब्रेबॉर्न स्टेडियमची हिरवळ. भारताचा एक नावाजलेला खेळाडू मैदानात येत आहे. जनसमुदायाची त्याच्याकडून मोठी अपेक्षा आहे.

अंपायरनं गार्ड दिला. चौफेर नजर फिरवून बॅट्समन क्षेत्ररक्षणाच्या रचनेचा अंदाज घेत आहे. चार स्लीपस्, एक गली, पॉइन्ट, सिली मिडऑफ हे ऑफ साइडचे फील्ड, एक सिली मिडऑन्, शॉर्ट फाइन लेग् बॅटस्मनला अगदी चिकटलेला. विकेटकीपर जवळ जवळ बाउंडरीच्या आणि स्टंप्सच्या मध्यावर. ॲटॅकिंग फील्ड.

जगद्विख्यात द्रुतगती गोलंदाज, चेंडू तुमानीच्या पार्श्वभागावर घासत आपल्याच नादात धिम्या गतीने स्टार्ट मार्ककडे चालला आहे. बॅटसमन्ने स्टान्स घेतला आहे. त्याला गोलंदाजाची पाठ दिसते आहे आणि निर्णय देणाऱ्या अंपायरचा निर्विकार भावनाशून्य चेहरा!

'स्टार्टमार्कला पोचताच गोलंदाज वळतो. क्षणभर थांबतो. बॅटस्मनची आणि त्याची नजरानजर होते आणि गोलंदाज गती घेतो. पावलागणिक त्याचा वेग वाढतो.

बॅट्समन पवित्रा घेऊन सज्ज! मनात हजारो प्रश्न, बंपर असेल? इन्स्विंगर, आउट स्विंगर, ओव्हरपिचड् असेल? अप्रतिम लेंगथ्चा पडला तर?

प्रत्येक प्रकारच्या वेगवान चेंडूचा मुकाबला करण्याचे विशिष्ट शास्त्र आहे. बंपर आटोक्यातला असला तर हुक करायचा. अंगावर आला तर क्षणार्धात डोके झुकवायचे. मिडल स्टंपवरून ऑफला झुकणाऱ्या चेंडूला स्पर्श करायचा नाही. हे सर्व करीत असताना आपल्याला टारगेट गाठायचे आहे, त्यासाठी रन्स काढायच्या आहेत हे देखील ध्यानात ठेवायचे!

पण एखाद्या उत्तम खेळाडूकडूनही कधी कधी चुका होतात. जिंकण्याची खात्री असते तेव्हा धाडसी प्रयत्नाने तो चौफेर चेंडू फटकावतो आणि वेगाने टारगेट गाठतो. तोच खेळाडू प्रतिपक्षाच्या प्रचंड धावसंख्येचा डोंगर फलकावर झळकत असताना दबावाखाली खेळून मॅच ड्रॉ करण्यासाठी धडपडतो.

कधी कधी टॉस् जिंकून फलंदाजी पत्करल्यावर आपले खेळाडू अतिउत्साहाच्या भरात वेडेवाकडे फटके मारून भराभर आउट होतात. प्रतिपक्ष आरामशीरपणे खेळून धावसंख्येचा डोंगर रचतो! त्याला कारण आपले क्षेत्ररक्षण असते. साधे झेल आपण सोडतो. जिथे एकच रन् मिळाली असती तिथे आपण चार चार देतो! ज्याला आउट करता आला असता तो षटकारावर षटकार मारीत रहातो.

हे सर्व का घडते तर आपल्या टीममध्ये एकी नसते. खेळाडूंचा कॅप्टनवर पूर्ण विश्वास नसतो. 'बोर्डा'च्या धोरणाबद्दल नाराजी असते. पहिल्या इनिंग्जला आघाडीचे फलंदाज अनेक वेळा चांगले खेळून गेल्यानंतर, मिडल ऑर्डर आणि टेलएंडर्स ह्यांच्याकडून गलथानपणा, हलगर्जीपणा झाल्यामुळे पहिली इनिंग्ज एकाएकी कोसळते. 'फॉलो ऑन' मिळाल्यावर सर्वच खेळाडू दबावाखाली येतात.

Cricket is a game of luck अशी म्हण आहे; पण इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडीज देखील सदैव जिंकतात; पण आपण मात्र हरतो हे कसले विचित्र लक्? आपलेच काही तरी चुकत असले पाहिजे.

सर्व मॅचिस हरवून रबर गमवल्यावर मग त्याबद्दल सगळे एकमेकांवर यथेच्छ टीका करतात! लाथाळ्या झाडतात. सार्वजनिक व्यासपीठावरून एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढतात. इतर शौकिन मंडळी काय चुकले, कुठे चुकले, कुणाचे चुकले ह्यावर रकाने भरून लिहितात. मग वेळ येते दुसऱ्या सिरीजची!

ती वेळ आता आली आहे. ही मॅच आपण जिंकलीच पाहिजे. ह्या खेपेस रबर गमावले तर नामुष्की होईल!

ह्याचा ज्यांना प्रत्यक्ष अनुभव आहे असे महाराष्ट्राचे प्रसिद्ध क्रिकेटर आणि उद्योगपती माधवराव आपटे! त्यांच्याबरोबर कुटुंबनियोजनाविषयी झालेली चर्चा—

मी : कुटुंबनियोजन...

माधवराव : ... कंपलसरी असावे का व्हॉलंटरी, असाच तुमचा प्रश्न असणार ना ?

मी : तुम्ही तर 'फ्रंटफूटवर' हाफ व्हॉली घेऊन सरळ 'ड्राइव्ह' मारलात... 'सक्ती' त्याचबद्दल प्रश्न विचारायचं माझ्या मनात होतं.

माधवराव : 'सक्ती' मला पटत नाही. लोकसंख्येची वाढ नियंत्रित करण्याचे अनेक मार्ग असू शकतात. पूर्वी हिटलरने एक मार्ग सुचविला होता. त्याच्या मते साठ वर्षावरील व्यक्तीचा समाजाला काही उपयोग होत नाही. तेव्हा अशा 'निरुपयोगी' परान्नभोजी परजीवी (Parasites) लोकांना सरळ नाहीसे करणे, म्हणजे मग लोकसंख्यावाढीचा प्रश्नच उद्‌भवणार नाही, असे हिटलरचे म्हणणे होते.

हिटलरच्या मनात असलेल्या लोकसंख्या-नियंत्रणाच्या कल्पनेशी तुम्ही सहमत व्हाल? मान्य आहे, हिटलरचे हे उदाहरण अगदी टोकाचे आहे... पण एकदा 'कंपल्शन'चा कायदा केला की, त्यानंतर थांबावे कुठे, ह्याचे भान न रहाण्याची शक्यता असते. म्हणून मी स्वतः 'कंपल्शनच्या' अगदी विरुद्ध आहे.

त्याऐवजी 'बंधने' घालावीत. Restrictions.

सिंगापूर घ्या, आपल्या शेजारी देशाचे उदाहरण घ्या. ज्यांचे केस 'हिप्पी' प्रमाणे लांब आहेत त्यांना सरकारी नोकऱ्या, इतर सवलती वगैरेमध्ये प्राधान्य मिळत नसे. आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रांतून त्यावर टीका झाली. मानवाला आपल्या केसांची लांबी किती असावी हे ठरविण्याचा देखील अधिकार नाही काय ? वगैरे प्रतिक्रिया त्याबद्दल झाली. मला वाटते सिंगापूर सरकारने हा निर्णय 'लांब' केसांबरोबर येणाऱ्या वृत्तीचे निर्मूलन करण्यासाठी घेतला असावा. 'हिप्पी' म्हणजे सर्वप्राप्त झालेल्या राष्ट्रांचा ऐहिक सुखाने तृप्त झालेला, असंतुष्ट आणि मानसिकदृष्ट्या अतृप्त असा निष्क्रिय तरुण; अशी काहीशी व्याख्या त्या सरकारच्या मनामध्ये असावी.

औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या आणि तथाकथित प्रगत झालेल्या राष्ट्रांमधील ह्या निष्क्रिय तरुणांच्या उदासीन वृत्तीची लागण, औद्योगिक प्रगतीसाठी धडपडणाऱ्या देशांतील तरुणांत होऊ नये, असा त्यांचा हेतू असावा. म्हणूनच लांब केसांमुळे 'हिप्पी'सारखा दिसणारा म्हणजे देशाच्या प्रगतीबद्दल उदासीन असणारा तरुण, असं गणित मांडून त्याला सरकारी सवलती न मिळण्याची व्यवस्था सिंगापूर सरकारने केली असावी.

मी : लांब केसांचा प्रश्न फक्त सिंगापूरच्या नागरिकांच्या बाबतीत होता असं नव्हे, तर परदेशी माणसाला, मग तो टुरिस्ट असो, व्यापारी असो, डिप्लोमॅटिक पासपोर्टवाला असो, त्याचे केस 'हिप्पी'सारखे असले तर सिंगापूरमध्ये प्रवेश बंद होता. एअर पोर्टवरूनच अशांना परत पाठवल्याची उदाहरणं माझ्या वाचनात आहेत.

असा एखादा लांब केसवाला एअरपोर्टवर उतरला आणि त्याला सिंगापूरमध्ये प्रवेश करण्याची इच्छा असली तर 'सरकारमान्य' लांबीइतके केस एअर पोर्टवर कापून घ्यावे लागत. त्यासाठी स्वतंत्र, वातानुकूलित खोली, खुर्ची, एप्रन आणि कारागीर ह्या सर्वांची उत्तम मोफत सोय, सिंगापूरचे पंतप्रधान ली क्वान् यू यांनी विमानतळाच्या प्रतीक्षागृहात केली होती.

माधवराव : पंतप्रधान ली क्वान् यू ह्यांनी ज्याप्रमाणे सिंगापूरमध्ये 'निराशावाद' फैलावणाऱ्या मनोवृत्तींवर यशस्वीपणे नियंत्रण केले त्याचप्रमाणे 'सिंगापूर स्वच्छ राखा' ही मोहीमदेखील त्यांनी अतिशय यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

बारा-पंधरा वर्षांपूर्वी सिंगापूर हे एक गचाळ शहर होतं. अतिशय अस्वच्छ.आपल्या मुंबई किनाऱ्यावरच्या एखाद्या अस्वच्छ 'सबर्ब'सारखं दिसणारं हे एक छोटंसं बंदर.

मलेशियापासून तुटून सिंगापूर स्वतंत्र झालं आणि उत्पन्नासाठी आपल्याला फार मोठ्या प्रमाणावर 'टुरिझम'वर अवलंबून रहावं लागणार आहे, ह्याची तात्काळ जाणीव होऊन सिंगापूरच्या नैसर्गिकदृष्ट्या अत्युत्तम असलेल्या बंदराची सुधारणा, विमानतळाची अत्याधुनिक व्यवस्था हे सर्व चालू असतानाच 'स्वच्छ आणि सुंदर सिंगापूर' ही मोहीम त्यांनी हाती घेतली.

एशिया खंडातील एक अतिशय सुव्यवस्थित बंदर, एशिया खंडातील एक अतिशय कर्तव्यदक्ष आणि संपूर्ण सोयींनी युक्त असा विमानतळ आणि जगातील एक स्वच्छ आणि सुंदर शहर अशी सिंगापूरची आज ख्याती आहे.

मी : तुम्ही म्हणता ते शंभर टक्के खरं आहे. मला सिंगापूरला वारंवार जाव लागत असे तेव्हा मी सिंगापूरमधला हा फरक प्रत्यक्ष अनुभविला आहे.

'स्वच्छ व सुंदर सिंगापूर' ह्याबद्दल एक छोटीशी फिल्मदेखील मी केली आहे. आज सिंगापूरमध्ये जागोजागी सूचना मिळतात आणि त्या सिंगापूर-नागरिकांसाठी नसून, सिंगापूरला भेट देण्याच्या निमित्तानं आलेल्या परदेशी लोकांसाठी असाव्यात, असा माझा अंदाज आहे. ह्या सूचनाफलकांवर 'सिगरेटचे थोटुक जरी रस्त्यात टाकले तरी पाचशे डॉलर दंड किंवा शिक्षा' असं लिहिलेलं असायचं.

सिंगापूरमध्ये स्वच्छता-मोहीम सुरू झाली, ती यशस्वी झाली आणि या मोहिमेनंतर मिळालेली 'स्वच्छता' कायम ठेवण्यासाठी त्यांनी कायदा केला, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. प्रथम कायदा आणि नंतर मोहीम असं जरी त्यांनी केलं नाही तरी नंतर कायदा हा करावाच लागला—निदान लोकांच्या मनात दबाव कायम रहावा ह्यासाठी.

'स्वच्छ आणि सुंदर सिंगापूर' ही मोहीम त्यांनी ज्या प्रकारे सुरू केली तोदेखील महत्त्वाचा आहे.

त्यांनी शाळेतील मुलांपासून सुरुवात केली. आपलं शहर स्वच्छ पाहिजे ह्याबद्दल स्वतः पंतप्रधान ली क्वान् यू शाळेतील मुलांसाठी खास संदेश दिवसाआड देत. दुसरी-तिसरीच्या वर्गातील ह्या आठ-नऊ वर्षांच्या मुलांनाच त्यांनी 'स्वच्छता सैनिक' बनविलं. ते मुलांना सांगत, 'तुम्हाला कुणी रस्त्यामध्ये घाण करताना दिसला, अगदी बसचं छोटंसं तिकिटदेखील रस्त्यामध्ये चुरगळून टाकताना दिसला, तर त्याला तुम्ही धरा, केलेली घाण त्याला साफ करायला सांगा. त्यानं ऐकलं नाही तर त्याच्यावर हल्ला करा, ओचकारा—बोचकारा; पण सोडू नका!'

अशा रितीने ह्या कार्यक्रमाची सुरुवात झाली. परिणामअंती गचाळ सिंगापूर पहाता पहाता स्वच्छ आणि सुंदर झालं !

सिंगापूरची लोकसंख्या मुख्यत्वे चायनीज, भारतीय आणि मलेशियन संस्कृतीच्या लोकांची आहे. थोडे-बहुत युरेशियनसुद्धा आहेत.

तीन वेगवेगळ्या संस्कृतींच्या लोकांनी

मळून सिंगापूर वसले आहे. त्यामधील अल्पसंख्यांक युरेशियन सोडून इतर सर्व मंडळींना, आपल्याकडच्या मंडळींप्रमाणेच रस्त्यात थुंकणे, घसा खाकरून बेडके टाकणे, नाक शिंकरणे, कचरा टाकणे वगैरे रक्तात भिनलेल्या सवयी होत्या. असे सांस्कृतिक गुणधर्म असणाऱ्या लोकसंख्येला शिस्त लावणे महाकठीण; पण पंतप्रधान ली क्वान यूने ते करून दाखविले.

ज्या पद्धतीने त्यांनी ही मोहीम सुरू केली त्यातून अनेक हेतू साध्य झाले. सार्वजनिक ठिकाणी घाण करणाऱ्याला ह्या 'चिमुकल्या' स्वच्छता. सेनेची धास्ती बसली, सिंगापूर स्वच्छ झाले आणि मोहीम सुरू करणारे 'चिमुकले सैनिक' स्वच्छतेचे बाळकडू घेऊन आजचे कर्तव्यदक्ष जबाबदार नागरिक झाले. सिंगापूर हा आपल्यासारखाच ब्रिटिश साम्राज्याचा भाग. त्यानंतर मलेशियाचा आणि एक तपापूर्वी स्वतंत्र देश म्हणून अस्तित्वात आलेला. त्यांनी नागरिकांना शिस्त लावली एवढेच नव्हे तर, एका तपात पुढची पिढी देखील तयार केली.

सिंगापूर छोटा देश आहे. 'एक गाव एक देश' म्हणावा असा; सर्व धर्मांचे, जातींचे लोक तिथे देखील आहेत. अर्थात वेगवेगळ्या संस्कृतींतून जन्माला आलेली विचारसरणीही आहे.

घरोघरी टेलिव्हिजन आहे. त्यावरून मनोरंजनाचे उत्कृष्ट कार्यक्रम तर होतातच पण ज्याला 'सोशल ॲडव्हरटायझिंग' म्हणतात, –समाजाला उपयोगी पडणाऱ्या गोष्टींची जाहिरातबाजी– ते देखील अप्रतिमपणे केले जाते.

टेलिव्हिजनचे कार्यक्रम मलेशियन, चायनीज, तामीळ आणि इंग्रजी ह्या सर्व भाषांतून 'एकाच 'वेळी प्रसारित होतात. ज्याला जी भाषा समजते त्या भाषेतून तो प्रोग्रॅम ऐकू शकतो. आपण सर्वांनीच ह्यावरून शिकण्यासारखं खूप आहे.

माफ करा, विषय आहे कुटुंब नियोजनाचा आणि मी भलतीच बडबड लावली आहे. वास्तविक, सिंगापूरचे पोलिसदेखील कर्तव्यदक्ष आणि लाच न खाणारे का आहेत हे सांगण्याचा मला मोह होतोय– नंतर कधी तरी...

बॅक टू कुटुंब नियोजन. आपल्या इथे ह्याबद्दलचे शिक्षण केव्हा आणि कुठल्या वयोगटापासून सुरू केले पाहिजे, असे आपल्याला वाटते ?

माधवराव : मला वाटते शाळेतील मुलांना शरीरशास्त्र शिकवतात तेव्हापासून पायरी-पायरीने हा विषय समजावून द्यावा, कौटुंबिक जीवनाबद्दल माहिती द्यावी, आटोपशीर कुटुंबाचे फायदे त्यांच्या मनावर ठसवावेत. सिंगापूरचा भावी नागरिक जर एका पिढीत तयार होतो, तर आपण आपल्या मुलांना शाळेतूनच शिक्षण दिल्यास आपला भावी तरुणदेखील नियोजनदक्ष बनेल !

मी काही अर्थशास्त्रज्ञ नाही. आज आपली लोकसंख्या साठ–सत्तर कोटींच्या आसपास आहे आणि ती वाढते आहे.

ह्या लोकसंख्येसाठी आपण साधारणपणे बारा कोटी टनांच्या आसपास अन्नपुरवठ्याची तरतूद करू शकतो नि सहा ते सात लाख टन कमी पडणारे अन्नधान्य म्हणजे जरुरीपेक्षा पाच टक्के कमी, हे विकत घेतो. त्यासाठी भरमसाठ किंमत मोजतो. ही किंमत दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. १९८० सालची लोकसंख्या, सध्या ज्या प्रमाणात ती वाढत आहे ते लक्षात घेता, आपल्या मर्यादित जमिनीवर तांत्रिकदृष्ट्या कितीही प्रगती करून आपण अन्न उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला तरी ते सगळे कमी पडणार आहे.

मी : मघाशी आपण छोट्याशा, मर्यादित लोकसंख्या असलेल्या सिंगापूरचे उदाहरण घेतले. आता आपल्याप्रमाणेच प्रचंड लोकसंख्या असलेल्या आपल्या शेजारच्या दुसऱ्या एका राष्ट्राचे उदाहरण घेऊ या.

चीन– आपल्यापेक्षा त्याची लोकसंख्या जास्त; पण आज चीनने लोकसंख्येची वाढ १·६ इथपर्यंत नियंत्रित करण्यात यश मिळविले आहे.

चीनमध्ये कंपल्शन असणारे – निदान तसे बोलले तरी जाते; पण त्याचबरोबर शिस्तबद्ध लोकशिक्षण देखील आहे. चीनकडे बघण्याचा जगाचा दृष्टिकोन आता बदलत चाललाय.

पंधरा वर्षांपूर्वी, पंजाबच्या आसपास, जेथील शेतकरी मुळातच प्रगत आहे अशा भागात, FAO ह्या संस्थेमार्फत आणि इतर देशांतील शेतकीविषयाच्या तज्ज्ञांच्या साहाय्याने 'हरितक्रांति'चा आरंभ केला. पाचदहा वर्षांनंतर त्या 'हरितक्रांतीचा' गौरवदेखील झाला.

चीन काही वर्षांपूर्वीच युनायटेड नेशन्सचा सभासद झाला आहे. चिनी तज्ज्ञांची इतर देशांतील तज्ज्ञांशी गाठभेट पडू लागली तेव्हा जगाला समजले की, चीनने हरित क्रांतीचा उपक्रम पंचवीस वर्षांपूर्वीच यशस्वी करून साजरा देखील केलेला आहे.

हा कार्यक्रम चीनने कुठल्याही परकीय मदतीशिवाय केला असल्यामुळे त्याला आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी तेव्हा आणि आतादेखील फारशी मिळत नाही.

कम्युनिस्ट चीनच्या सर्व नियंत्रित, एकाधिकारी हुकूमशाहीत हरित क्रांती होऊ शकते, लोकशिक्षण होऊ शकते, लोकसंख्या नियंत्रणदेखील होऊ शकते आणि त्यातून प्रगती होते.

आपल्यासारख्या तांत्रिकदृष्ट्या पुढारलेल्या लोकनियंत्रित राज्यपद्धतीत मात्र लोकशिक्षण, लोकसंख्यानियंत्रण, जरूर असलेले अन्नउत्पादन ह्यांचा मेळ न बसता प्रगती खुंटते.

एक प्रकारे हा लोकसत्ताक राज्यपद्धतीचा पराभवच नाही का ?

आपल्याइकडच्या लेबर युनियन्सचे उदाहरण घेऊ. कामगारांच्या 'कायदेशीर' हक्कांसाठी लढा करीत असताना, त्या कामगारांना कुटुंब नियोजनासारखा विषय समजावून देण्याची जबाबदारी युनियन् लीडर्सनी स्वीकारली तर त्यातून कामगारांचे आणि त्यांच्या कुटुंबांचे कल्याणच होणार आहे ना?

माधवराव : अगदी बरोबर. मी स्वतः ह्याबद्दल नेहमी प्रयत्न करतो.

चीननं लोकसंख्या-नियंत्रणाच्या बाबतीत जे साध्य केलं ते निश्चितच स्पृहणीय आहे.

आपल्या इथं 'डेमॉक्रसी' असली तरी

## शाळेतूनच शिक्षण दिल्यास भावी तरुण नियोजनदक्ष बनेल !

अजूनही अधिकारावर असलेली एखादी व्यक्ती आपल्या मताप्रमाणे एखादा निर्णय घेते आणि मग खालचे सर्वजण आंधळेपणाने कामास लागतात. त्या निर्णयाची अंमलबजावणी करतात, हेच आपल्या अनुभवास वारंवार येते.

आपल्या ग्रामीण भागातून काम करणारे समाज कार्यकर्ते, शिक्षक, ग्रामसेवक, ग्रामपंचायतीचे सभासद ह्या सर्वांकडून आपण नेहमी विधायक कार्याची अपेक्षा करतो; पण त्या लोकांच्या अनुभवांवर आधारित सूचनांचा विचार करण्याची मात्र आपल्याला सवय नाही.

त्यामुळेच Grass root level वर कार्य करणाऱ्या, विचार करणाऱ्या कार्यकर्त्याला म्हणजेच मातृभूमीशी ज्याची मुळे पक्की रुजलेली आहेत आणि त्या अनुभवावर उत्तम कार्य करणाऱ्या व्यक्तीलादेखील आज आपले विचार प्रकट करण्यास स्वारस्य वाटत नाही.

मातीशी निगडित असलेल्या ह्या कार्यकर्त्यांचे विचार आपणा सर्वांना मार्गदर्शक ठरतील.

आज अशा प्रकारचे कार्यकर्ते अस्तित्वात आहेत का नाहीत, हे मला माहीत नाही. असले पाहिजेत, असं माझं स्वतःचं मन मला ग्वाही देतं.

कामगारांबद्दल मनापासून कणव असलेला, एखादा युनियन लीडर फक्त पगारवाढ, हक्काची रजा, कामाचे कमी तास, आजारपणाची सुट्टी एवढ्यावरच न थांबता, कामगारांचे आरोग्य, शिक्षण, त्यांच्या कौटुंबिक जीवनाचे जिव्हाळ्याचे प्रश्न, त्यांच्या मुलांच्या संगोपनाची, शिक्षणाची सोय हेदेखील करण्यास प्रवृत्त झाला तर कामगारांचा आणि देशाचादेखील मोठा फायदा होईल.

कामगार-नेते, कामगार आणि कारखानदार ह्यांच्यामध्ये सुसंवाद घडवून आणू शकणाऱ्या, कामगारांना कुटुंब कल्याणाचं शिक्षण देणाऱ्या कार्यकर्त्यांची आज फार मोठी गरज आहे. स्वयंस्फूर्तीने, स्वयंसेवक वृत्तीने काम करणारे कार्यकर्ते पुढे आले तर सर्व कारखानदार, उद्योगपती अशा कार्यकर्त्यांचे स्वागतच करतील.

आज अडचण आहे असे कार्यकर्ते मिळण्याची. आपल्याकडच्या सर्वसाधारण दर्जाच्या कार्यकर्त्यांनी एक वाईट प्रथा पाडली आहे. बहुतांशी असे हे लोक निरुपयोगी असतात आणि मग मुळात समाजकार्याच्या 'भानगडी'त पडतात.

हे लोक मोका मिळताच समाजकार्य सोडून 'स्थानिक' राजकारणात सहभागी होतात आणि अखेरीस समाजाचे कल्याण करण्याऐवजी नुकसान करण्यासच निमित्तमात्र होतात. लोककल्याण आणि समाजकार्य रहाते बाजूला आणि सुरू होतं राजकारण आणि चळवळ.

मला उद्योगपती ही उपाधी लाभली आहे. उद्योग आणि निर्मिती ह्यादेखील किंवा ह्याच प्रगतीचा एक मार्ग आहे ना?

कुटुंब कल्याण, आरोग्यशिक्षण हे कामगारांना समजावून सांगण्यासाठी मला स्वतःला आज समाजकार्य करणाऱ्या व्यक्तीची जरूर आहे. माझ्या दृष्टीने कामगारांच्या कल्याणासाठी जे करणं आवश्यक आहे ते करण्याची मी धडपड करतो; पण ह्यासाठी चांगले कार्यकर्ते मला मिळाले तर हे कार्य जास्त चांगल्या पद्धतीने करता येणे शक्य आहे,

आमच्या मिलमध्ये सहा हजार कामगार आहेत. त्यांपैकी दहा टक्के म्हणजे सहाशे ते सातशे नियोजनपात्र आहेत, हे नुकत्याच घेतलेल्या सर्वेक्षणातून माझ्या निदर्शनास आले आहे. काही डॉक्टरांमार्फत ह्या नियोजनपात्र कामगारांना कुटुंब नियोजनविषयक सल्ला देण्याचे काम मी सुरू देखील केलं आहे. ह्या कार्याला चालना देण्यासाठी मला आज एका चांगल्या 'मोटिव्हेटर'ची कार्यकर्त्याची गरज आहे. तुमच्या माहितीत कुणी असला तर सांगा.

कामगारांच्या भल्यासाठी कुटुंब कल्याण कार्यक्रमाची माहिती त्यांना देणे आवश्यक, हे मला फार पूर्वीपासूनच पटलंय; हे केले पाहिजे असे 'बाळकडू' मला योग्य वयातच मिळालेले आहे.

पण आज, मनापासून काम करणारे कार्यकर्ते – 'मोटिव्हेटर्स' हे मात्र दुर्मिळ झालेत. तुमच्या माहितीत कुणी असतील तर सांगा, माझ्यासारख्या इतरांना, कामगारांना-कामगार नेत्यांना अशा माणसांची फार गरज आहे.' □

---

श्री. माधवराव आपटे म्हणतात त्याप्रमाणं कार्य करू शकणाऱ्या 'प्रेरकांची' गरज आज सर्व क्षेत्रात जाणवत आहे.

माधवराव आपटे हे उद्योगपती ह्याडाचे 'खिलाडू' आहेत, त्यांची मनोभूमिका एखाद्या समाजसेवकासारखी आहे. खिलाडू वृत्ती ते क्रिकेटमुळे शिकले असणार; पण समाजकार्याचे 'बाळकडू' त्यांना त्यांच्या आईकडून मिळाले आहे.

माधवरावांच्या आई श्रीमती मनोरमाबाई आपटे यांनी पंचवीस वर्षांपूर्वी त्या वेळी आपटेसमूहाची असलेल्या कोहिनूर मिलमध्ये सर्वप्रथम कुटुंब नियोजन आणि नसबंदी ह्या कार्यक्रमांची सुरुवात केली. नंतर मफतलाल वगैरे इतर चालकांनी त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन हा कार्यक्रम आपापल्या मिलमध्ये सुरू केला.

आजदेखील फलटणजवळच्या साखरवाडी येथे मनोरमाबाईंचा हा कार्यक्रम उत्कृष्टपणे चालू आहे. □

---

# लाल दिव्याची पर्वा नसणारे आपण सारे !

—ना. विनायकराव पाटील



आमदार निवासाच्या बाबतीही आपल्याकडे 'खुर्द' आणि 'बुद्रुक' ही प्रथा असल्याचे पाहून परम संतोष झाला.

मी श्रीभाऊ माजगावकरांबरोबर ज्या आमदार निवासात गेलो ते मॅजिस्टिक हॉटेलमध्ये होते. माजगावकर बरोबर होते हे सुदैव, एरवी एकट्याने तिथे जाण्याचे धाडस मी केले नसते आणि चुकून गेलो जरी असतो तरी एक मिनिटातच तिथून पळ काढला असता !

जेथे राजकारण चालते त्या जागेपासून कमीत कमी कोस–दीड कोस अंतरावर राहाण्याचे तत्त्व 'अन्य वार्तेपरी निद्रा चांग' ह्या सूत्रामधून मी शिकलो आहे.

म्हणूनच ह्यापूर्वी आमदार निवासात जाण्याची माझ्यावर पाळी आली नव्हती. ही पहिलीच खेप आणि माझी अवस्था देखील एखाद्या पहिलटकरणीसारखी झाली होती !

आमदार निवास, निवडून आलेल्या मंडळींचा अंतःस्थ राजकारण खेळण्याचा हा आखाडा ! येथे नेहमी हुतूतू, आट्यापाट्या, खो–खो, कुस्ती किंवा नवीनच प्रचारात येत असलेला कुंपणावर चढणे, बसणे, उतरणे किंवा उडी मारणे हे सर्व राष्ट्रीय खेळ मोठ्या अटीतटीने खेळले जातात. नवीन आणि पहिल्यांदाच निवडून आलेली, पुरोगामी का काय म्हणतात ती मंडळी, लंपडाव आणि आंधळी कोशिंबीर खेळत भोज्याला शिवण्याचा प्रयत्न करतात.

तर असे हे आमदार निवास नानाविध माणसांनी गजबजून गेले होते. शरदराव पवारांनी राज्याची सूत्रे हाती घेतली होती; पण अजून मंत्रिमंडळ जाहीर केले नव्हते. त्यामुळे सर्वांची पळापळ चालू होती. लिफ्ट भरभरून माणसे वर–खाली करीत होती. लॉबीतून इतस्ततः गटागटाने उभी होती. काहीजण 'टॅक्सी' 'टॅक्सी' करीत दुसऱ्या आमदार निवासाच्या दिशेने धावत होती. प्रत्येक आमदाराचा चेहरा विचारमग्न दिसायचा, 'स्वतःच्याच' विचारात गढल्यासारखा, त्यामुळेच राष्ट्राचे भान नसल्यासारखा.

खोल्या–खोल्यांतून 'व्हिस्परिंग कॅंपेन' चालू असल्यासारखे वातावरण होते. जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींभोवती टोळकीच्या टोळकी घोळका करून बसली होती. काही तरी कट शिजत असल्याप्रमाणे सर्वांच्यात हलकी कुजबूज चालू होती. 'मोनॉपली पॉवर', 'रिप्रेशन' वगैरे शब्द अधूनमधून कानांवर पडत होते. विधानसभागृहामध्ये कुणी तरी कुठले तरी एक पुस्तक कुणाच्या तरी अंगावर फेकले होते; त्याबद्दल काहींच्यात 'बोलाचाली' होत होती. मधूनच कुणीतरी मराठवाडा–बाबासाहेब आंबेडकर वगैरे प्रश्न एकमेकांना 'नजरेच्या खुणेने' टाकीत होती.

काही खोल्यांतून 'तुम्ही आतून सुरू करा, आम्ही आहोतच बाहेरून सुरुंग लावायला !' 'सध्या हे एक पिल्लू तर सोडून पाहू या !' 'हे चार निश्चित फुटतील, तुम्ही त्या दोघांना मात्र फोडा!' अशा प्रकारची सध्याची मोहीम वगैरे विधायक कार्यक्रमांची आखणी करण्यात मंडळी रंगली होती. खोली सिगरेटच्या धुराने भरलेली, त्यामुळे माजगावकरांना वारंवार ठसका. माजगावकर मधून मधून चष्मा जेव्हा वारंवार पुसू लागले तेव्हा मला जरा संशय आला. खोलीत धूर होता; पण धूसर दिसण्याइतका निश्चितच नव्हता !

अशा खोल्यांतून डोकावत, लॉबीमधील गर्दीत चेंगरत, चुरगळलेल्या मनाने मी एका खोलीत शिरलो. आत पाऊल ठेवताच चमकलो ! आपण भलतीकडे तर आलो नाही ना? डोळ्यांवर, कानांवर आणि नाकावर देखील विश्वास बसेना.

सर्वत्र उदबत्तीचा मंद सुगंध पसरला होता. खोलीच्या मध्यावर एक अतिशय उमद्या व्यक्तिमत्त्वाचा, तरतरीत चेहऱ्याचा तरुण मंगेश पाडगावकरांची 'साहेब' ही कविता, खोलीतील मोजक्याच मंडळींना रसिकतेने वाचून दाखवीत होता. इथे राजकारण नव्हते. त्या खोलीत पाऊल ठेवताच माझे मन सुखावले.

आमदार निवासातील इतर मंडळी धावपळ करून धामधूम होत असता, शांत चित्ताने आपल्या खोलीत बसून, अतिशय रसिकतेने पाडगावकरांची कविता वाचून दाखविणारा हा बुलंद माणूस म्हणजे विनायक पाटील !

'माणूस'च्या वाचकांना विनायक पाटलांची ओळख करून देणारा मी कोण ? ह्या बुलढमधील माणसाचा 'म्हाराजो बाग: कोठी नंबर दो' हा माणूसमधील लेख दीर्घस्मरणात रहाणारा आहे !

कविता संपली. विनायक पाटलांनी पुस्तक खाली ठेवले आणि मी 'वाह ! बहोत खूब !' म्हणायच्या आत ते म्हणाले—

'काल माजगावकरांचा फोन आला. कुटुंब नियोजनावर तुम्ही अंक काढणार, हे ऐकताच अतिशय बरे वाटले. सर्वांनी सोयिस्करपणे बाजूला टाकलेला हा विषय तुम्ही अतिशय योग्य वेळी पुन्हा लोकांसमोर ठेवताय, ही फार चांगली गोष्ट आहे. संपूर्ण अंक ह्या

विषयावर, निघणार हे ऐकून प्रथम थोडसे आश्चर्य वाटले-पण लगेच अभिमान वाटला! 'माणूस'च हे काम करणार हे मला पूर्वानुभावावरून माहीत आहे !

'तुम्हाला कदाचित माहीत नसेल, मी श्रीभाऊंबरोबर खूप फिरलो आहे. 'कैलास ते सिंधुसागर' ह्या पदयात्रेत माजगावकरांबरोबर फिरताना अनेक अनुभव घेतले आहेत !'

विनायक पाटील बोलत असताना वाटले, त्यांना मध्येच थांबबावे . आणि म्हणावे, 'पाटील, क्षणापूर्वी तुम्ही एक कविता अप्रतिम शैलीत वाचून दाखवीत होता. माझ्या मनावर त्याचा अजून असर आहे. त्या कवितेबद्दल तुम्ही काही बोलावे, तुमच्याशी चर्चा करावी, आणखी एखादी कविता तुम्ही वाचून दाखवावी, मग बोलू या कुटुंब नियोजनावर !'

पण मी तसे म्हणालो नाही. काही माणसे अशी असतात की, रिकाम्या वेळी चकाटया पिटण्याची त्यांची सवय कामाच्या वेळी देखील कायम रहाते; तर काही थोडी माणसे अशी असतात की,चुकूनमाकून मिळालेल्या रिकाम्या वेळी जीवनातील एखाद्या कलागुणाचा मनःपूर्वक आस्वाद घेत असताना काम जर समोर आले तर ते देखील तितक्याच मनःपूर्वकतेने आणि चोखपणे करण्यात आनंदाने रममाण होऊ शकतात. विनायक पाटील हे दुसऱ्या गटापैकी. म्हणूनच 'कविता' संपताच त्यांनी कामाचे बोलणे सुरू करणे ही स्वाभाविक क्रिया त्यांच्याकडून घडली.

दोन मुली झाल्यावर मुलगा होण्याची वाट न बघता त्यांनी स्वतःवर नसबंदी-शस्त्रक्रिया करून घेतली.देशाला कुटुंब नियोजनाची अत्यंत गरज आहे हे त्यांना पटले नसते तर त्यांनी हे केले असते का? म्हणूनच अशा व्यक्तीचे विचार 'लोका सांगे ब्रह्मज्ञान' ह्या स्वरूपाचे नसल्यामुळे, महत्त्वपूर्ण आणि मार्गदर्शक ठरतात.

विनायक पाटील म्हणाले, 'परुळकर, तुम्हाला एक विचारू का? तुम्ही अनेक देश पाहिले आहेत. आपल्याकडचा माणूस, मग तो अशिक्षित, सुशिक्षित अगर उच्च शिक्षित असो, चौकामध्ये पोलीस नसला तर पटकन रहदारीचा नियम मोडण्यास प्रवृत्त होतो. 'प्रवेश बंद' अशी पाटी डोळ्यांसमोर स्पष्ट दिसत असूनदेखील त्या रस्त्याच्या तोंडाशी पोलीस नसला तर 'आजूबाजूला तो नाही ना?' ह्याची चटकन खात्री करून घेत सायकल, स्कूटर किंवा फियाटदेखील चपळाईने घुसवितोच की नाही? तीच गोष्ट कुटुंबनियोजनाची. नुसत्या पाट्या लावून, प्रतिप्रोत्साहने, बंधने वगैरे ठेवल्यामुळे आपला माणूस काही एक ऐकणार नाही. आपला तो स्वभावच नाही. हृदयपरिवर्तनाने वगैरे दारूबंदी होणे कदापि शक्य नाही. त्यासाठी दारूबंदीचा कायदाच हवा! चौकात पोलिस असला तरच शिस्तशीरपणे, रहदारीच्या नियमानुसार चालण्याची आपल्याला रीत आहे. एरवी आपण तसे चालणारच नाही. कायदा–त्याशिवाय शिस्तीने काही करणे ही आपली पद्धतच नाही. खरे की नाही सांगा !'

मी पाटलांना म्हणालो, 'खरं आहे तुमचे म्हणणे. ज्या देशात ट्रॅफिक सिग्नल आणि त्या सिग्नलजवळच पोलिस असणे जरुरीचे आहे, त्याचाच अर्थ त्या देशांतील लोकांना सामाजिक जबाबदारीची जाणीव अजून झालेली नाही. अनेक देशातील रहदारीच्या अनुभवावरून माझे हे मत बनले आहे.'

त्यानंतर विनायक पाटलांना मी सिंगापूरच्या स्वच्छता मोहिमेची माहिती सांगितली. तेव्हा ते म्हणाले, 'मुंबईत आलाच आहात तर वेळ मिळाल्यास जरा आपल्या हायकोर्टाच्या इमारतीत एक चक्कर मारून या! तिथल्या भिंती पाहून या! मोठी-मोठी शिकलेली वकील आणि ॲडव्होकेटमंडळी इतस्ततः पान खाऊन पिचकाऱ्या टाकताना दिसतील अहो, आपल्याकडच्या सुशिक्षित माणसाला जिथे सामाजिक जबाबदारीची जाणीव नाही, तिथे उरलेल्या ऐंशी टक्के लोकांच्यात ती कुठून येणार? आपली ही वकीलमंडळी इंग्लंडमध्ये वगैरे शिक्षणासाठी जातात तेव्हा मात्र गोऱ्या साहेबाच्या शिस्तीने वागतात; पण इथे परतल्यावर लागलीच ते सर्व विसरून, स्वैरपणे पानाच्या पिचकाऱ्या टाकीत, कागदाचे बोळे फेकीत सर्वत्र घाण करताना दिसतात !'

विनायक पाटील हे सांगत असताना, मी हातातील सिगारेटचे थोटूक 'अनवधानाने' पायाखाली टाकून, बुटाच्या टाचेखाली विझवीत होतो, ते चटकन् उचलले आणि कोपऱ्यातील केराच्या टोपलीत टाकण्यासाठी खुर्चीतून उठलो.

हाताला धरून खाली बसवत, मिष्किल हसत विनायक पाटील म्हणाले, 'तुम्हाला उद्देशून म्हटले नाही हो मी. माझ्या खोलीत ॲशट्रे नाही. तो असायला हवा. तुम्ही बसा आरामशीर. थोड्या वेळाने केर काढायचाच आहे, सगळीकडचाच, त्यात जाईल तुमचे हे थोटूक !'

मी थोडासा खजील झालो हे पाहून पाटील म्हणाले... 'सध्या थोडा वेळ त्या थोटकाचे विसरा, मी तुम्हाला दुसरे एक सांगतो. तुम्ही मघा सिंगापूरचे उदाहरण दिलेत ना, त्या संदर्भात आता सहाशे कोटी रुपयांचा एक महागडा आणि निरुपयोगी ठरणारा 'प्रौढ शिक्षणाचा' कार्यक्रम हाती घेण्याचा सर्वजण विचार करीत आहेत. ज्या पद्धतीने हे सगळे चाललेय ना, त्याचा काहीएक उपयोग होणार नाही. वय उलटून गेलेल्यांना आता अ आ इ ई शिकवण्यात काय अर्थ आहे मला समजत नाही.

'आज परिस्थिती अशी आहे की, प्राथमिक शाळांच्या मुलांना पुस्तके कमी पडत आहेत. पाट्या-पेन्सिली कमी पडत आहेत. हे दिसत असूनदेखील आपण प्रौढ शिक्षणाच्या नावाखाली काही तरी 'प्रायोगिक' वगैरे करत पैसा वाया घालवणं आपल्या देशाला परवडणार नाही.

'त्याऐवजी हा पैसा, आहे त्या शाळांची सुधारणा, मुलांना पुस्तके पुरविणे ह्यासाठी खर्च करणे जास्त योग्य ठरेल.

'प्रौढ माणसांना शिक्षण द्यायचेच असेल तर ते कुटुंब कल्याणाचे द्या, आरोग्य शिक्षणाचे द्या, व्यावसायिक द्या.'

बोलता बोलता पाटील उठून उभे राहिले, मी पण उभा राहिलो. दारापाशी येताना ते म्हणाले,

'तुम्ही एकदा नाशकाला या. माझ्या गावाला, निफाडला या आणि तिकडचा कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम बघा. तुम्हाला दोन मुले झाल्यावर नसबंदी करून घेतलेले अनेक शेतकरी आढळतील. माझ्या वडिलांच्या पिढीतील लोकांना चार–पाच मुले आहेत; पण माझ्याच वयाच्या कित्येक जणांनी दोन मुली असूनही शस्त्रक्रिया करवून घेतल्या आहेत. नियोजनाचे फायदे लोकांना सहज समजतात. अतिरेकाचा प्रश्नच येत नाही. ज्यांची दोनदा शस्त्रक्रिया झालीय ती स्वखुषीने झालीय. अहो, पैसे मिळतात नं? शंभर रुपये परुळकरांना जास्त नाहीत; पण स्वतःच्या मुलीला देवी आल्यात म्हणून हजार रुपये मिळविण्याकरता गेलेला बाप, कांजिण्या निघाल्या म्हणून ढसढसा रडल्याचे मला माहीत आहे.

तेव्हा कायद्याचे जू मानेवर बसल्याशिवाय पुढे जाणे माहीतच नाही आपल्याला. एकदा सवय झाली की, मग मात्र आपोआपच गती मिळते चाकाला अन् त्याचे काही वाटत नाही.' □



# झाले ते होउनी गेले!

डॉ. बानू कोयाजी

जून महिन्यात 'माणूस'चा वर्षारंभाचा एक-लेखकी विशेषांक प्रसिद्ध झाला. त्या अंकामुळे माझी आणि पुण्याच्या के. ई. एम्. हॉस्पिटलच्या डॉक्टर बानू कोयाजी यांची भेट झाली. प्रथम भेटीत पहिलाच विषय निघाला, कुटुंब नियोजनाचा आणि आणीबाणीत बदनाम झालेल्या ह्या विषयाबद्दल जनजागृती निर्माण करण्याच्या आवश्यकतेचा. त्या प्रेरणेतून ह्या विशेषांकाच्या कल्पनेचा 'जन्म' झाला.

डॉ. बानू कोयाजी यांच्या खास मुलाखतीने ह्या अंकाची समाप्ती होत आहे, हे विशेष आहे. त्यांचे समर्पक विचार—विशेषत: Beyond Family Planning 'कुटुंब नियोजनाच्या पलीकडे' हा महत्त्वाचा आणि नवा दृष्टिकोन आपल्यासमोर मांडताना मनाला समाधान होत आहे.

अंकाची समाप्ती ह्या मुलाखतीने होत असली तरी खऱ्या अर्थाने आणि डॉ. कोयाजींच्याच शब्दांत सांगायचं झाल्यास 'खरी सुरुवात तर ह्यापुढूनच आहे.'

मुलाखतीसाठी डॉ. कोयाजींची भेट घेतली तेव्हा त्यांनीच पहिला प्रश्न केला— 'काय झाला की नाही तुझा सगळा अंक लिहून?' मी म्हणालो, 'हो—आज तुम्ही मुलाखत द्या, ती लिहून झाली की सगळं संपेल.'

बानूजी चटकन म्हणाल्या, 'अरे संपेल कसं बाबा? इथून नंतरच तर सगळं सुरू करायला पाहिजे. तू काम करणार की नाही सांग...पहिली एक—दोन वर्षं तरी अगदी कसून काम करायला पाहिजे. लोकांना ह्याचं महत्त्व पटवून देण्यासाठी वेगवेगळ्या क्लासमधून, समाजाच्या सर्व थरांतील वेगवेगळ्या क्षेत्रांमधून कुटुंब कल्याणाविषयीचे गैरसमज दूर करून लोकांना प्रवृत्त करण्यासाठी स्वयंसेवकांची फार मोठी गरज आहे. ज्यांचा नियोजनावर विश्वास आहे, अशी माणसं शोधून त्यांच्या हातून लोकांचं मन:परिवर्तन घडविण्याचं काम हाती घेणं जरुरीचं आहे. ह्या कार्यक्रमाचं यशापयश आता सर्वस्वी प्रेरकांच्या — मोटिव्हेटर्सच्या हाती आहे. तू काम करणार की नाही सांग...'

'अवश्य करतो—निश्चयानं आणि मनापासून करतो' मी त्यांना उत्तर दिलं आणि म्हणालो, 'तुम्हीच एरिया सांगा. त्या एरियातील नियोजनपात्र अशा किती जोडप्यांनी स्वयंस्फूर्तीने आणि स्वेच्छेने नियोजनाचा अवलंब करावा ह्या 'अपेक्षित' आकड्याचा अंदाज सांगा. त्यासाठी अतिशय प्रयत्नपूर्वक काम करण्याची माझी संपूर्ण तयारी आहे.'

आता अशा प्रकारचे आश्वासन देताना 'मी हे करतो; पण तुम्ही मात्र मध्येच पाठिंबा काढून घेऊ नका,' असं प्रतिआश्वासन मागण्याची सर्वसाधारण रीत आहे; पण तसं प्रतिआश्वासन मागणं ह्याचा अर्थ 'मला बानू कोयाजी अजिबात कळल्या नाहीत' असा होईल.

कुटुंब नियोजनाविषयी सातत्यानं काम करणारी भारतामधील डॉक्टरी व्यवसायाजी काही थोडी-फार माणसं आहेत त्यांच्यामध्ये बानू कोयाजींचं स्थान श्रेष्ठ दर्जाचं आहे. कुटुंब नियोजनाविषयी त्यांनी आजपर्यंत ज्या प्रकारे कार्य केलं आहे त्याचा सर्वत्र गौरव तर झाला आहेच; पण त्यांचं कार्य सतत मार्गदर्शक ठरलं आहे.

माझी त्यांची ओळख झाली तेव्हा त्यांनी मला एक अहवाल वाचायला दिला. जनता सरकारच्या पहिल्या वर्षाच्या कारकीर्दीतील कुटुंब कल्याणाचा सडेतोड आढावा त्यामध्ये घेतला होता. तो अहवाल त्यांनी शासनाला, शासनाच्या विनंतीवरून तयार करून दिला होता.

डॉ. बानू कोयाजींनी त्या अहवालात सक्तीचे कुटुंब नियोजन आणि त्याचे फायदे-तोटे ह्याबद्दल उत्कृष्ट विवरण केलं होतं. डॉ. चरणसिंग यांनी आखलेल्या 'कुटुंब नियोजन' कार्यक्रमातला चांगला भाग शासनाच्या निदर्शनास आणून दिला होता. त्याचप्रमाणे 'कुटुंब कल्याण' ह्या श्री. राज-

नारायण ह्यांनी आखलेल्या कार्यक्रमाचं विवेचन करताना, पहिल्या आणि ह्या कार्यक्रमामध्ये विशेष असा फरक नसूनदेखील कुटुंब कल्याण ह्या विस्तृत कार्यक्रमातील अधिक चांगला भाग स्पष्ट मान्य केला होता.

कुटुंब कल्याण योजनेचा परामर्श घेताना, जे व्हायला पाहिजे ते घडत नाही आणि हे असंच चालू राहिलं तर त्यातून काय प्रसंग ओढवेल, ह्याचंदेखील त्यांनी स्पष्ट विवेचन केलं होतं.

चुकीचं काय? अनावश्यक कुठलं? चांगलं काय आहे? हे सर्व कुठल्याही दबावाचा किंवा पूर्वग्रहदूषित विचारांचा प्रभाव किंवा स्पर्शदेखील होऊ न देता लिहिणं ह्यासाठी नुसता निर्भीडपणा किंवा स्पष्टवक्तेपणा अंगी असून भागत नाही. त्यासाठी कुटुंब नियोजन, कुटुंब कल्याण हा कार्यक्रम अंतिमत: जनतेच्या हिताचा आहे, ह्यावर स्वतःची संपूर्ण निष्ठा असावी लागते आणि तशी ती डॉ. बानू कोयाजींची आहे म्हणूनच त्या स्वच्छपणे आपले विचार शासनासमोर ठेवू शकतात.

जनता सरकारच्या पहिल्या वर्षातील कुटुंब कल्याण योजनेबद्दल 'काही तरी केले पाहिजे' अशा स्वरूपाचे अनेक रिपोर्ट मी वाचले होते. बहुतेक सर्व रिपोर्ट, असे रिपोर्ट नेहमीच्या 'यत्रापि–तत्रापि' पद्धतीने लिहिले जातात तशाच प्रकारचे होते.

मी वाचलेले सर्व रिपोर्ट इंग्रजीमध्ये होते आणि तिथंच तर हे 'यत्रापि–तत्रापि' फारच असतं. वाचणाऱ्याला खूप काही तरी वाचल्याचा आनंद मिळतो. असतं सगळं शब्दजंजाळच; पण शब्दरचनेच्या कौशल्यानं वाचणारा भारावून जातो आणि ओथंबलेल्या आवाजात म्हणतो, 'काय अप्रतिम आहे हो रिपोर्ट, भाषा काय सुंदर वापरली! असं इंग्रजी बरेच दिवस वाचलं नव्हतं.'

आता तुम्हीच सांगा, इथं सुंदर भाषेचा काय संबंध? त्या ओथंबलेल्या वाचकाला तुम्ही जर विचारलंत, 'म्हणणं काय होतं हो त्या रिपोर्ट लिहिणाऱ्याचं?' तर तो वाचक गंभीर मुद्रेनं म्हणतो, 'ते जरा नीटसे कळलं नाही बुवा. त्याच्यामधला थॉट कंटेन्ट...विचारधारा मूलभत स्वरूपाची असल्यामुळे चटकन समजण्यास जरा जड जाते. पुन्हा एकदा वाचावा लागेल.'

तर अशा प्रकारचे 'मूलभूत सांगणारे' रिपोर्ट युनोच्या नोकरीमध्ये असताना वाचण्याची मला सवय होतीच. ते मी नेहमी आरामखुर्चीत पडून वाचायचो. त्याच जुन्या सवयीने, वर उल्लेखलेला डॉ. बानू कोयाजींचा अहवाल मी वाचायला सुरुवात केली; पण पहिले पान वाचून दुसरे उलटण्याआधी आरामखुर्चीतून सरपटून उठलो आणि सरळ पाठीच्या खुर्चीत ताठ बसून पुढचे वाचन केले.

अहवाल वाचताना एक गोष्ट लक्षात आली. कुठलेही भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तीला स्वच्छ विचार करण्याची देणगी नैसर्गिकच असते आणि हे विचार प्रगट करताना त्यांना भारंभार शब्दांची आवश्यकता भासत नाही.

बानूजींनी अतिशय सुटसुटीत वाक्यरचनेत हा अहवाल लिहिला होता. प्रत्येक वाक्य महत्त्वाचे कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे यथार्थ विवरण करणारा दुसरा अशा प्रकारचा रिपोर्ट माझ्या वाचनात आला नव्हता.

'माणूस'च्या ह्या विशेषांकाच्या निर्मितीमागच्या प्रेरणेनेच, ज्याला उत्पत्ती किंवा Genesis म्हणता येईल, तेच मी आपणासमोर जसे घडले त्या स्वरूपात मांडले आहे. अंकामध्ये एक लेख आणि पाच मुलाखतीद्वारा हा विषय मी आपल्यासमोर मांडू शकलो ह्याचे बरेचसे प्रत्यक्षाप्रत्यक्ष श्रेय मी डॉ. बानू कोयाजींना, त्यांनी माझ्या विचाराला चालना दिली ह्याबद्दल देतो.

२२ ऑगस्ट रोजी मी त्यांची मुलाखत घेतली. त्या नुकत्याच दिल्लीहून परतल्या होत्या. त्यांच्या दिल्ली भेटीचे कारण कुटुंब कल्याण कार्यक्रमाविषयी मध्यवर्ती शासन आणि इतर तज्ज्ञ अधिकारी मंडळींशी चर्चा आणि विचारविनिमय करणे व त्यातून निश्चित स्वरूपाची रूपरेखा ठरविणे, मार्ग शोधणे, हे होतं.

मुलाखतीसाठी मी प्रश्न विचारण्याआधी बानूजी स्वतःच म्हणाल्या, 'ह्या बाबतीत अगोदर काय घडलं वगैरे सर्व आतापर्यंत तू लिहिलेच असणार, इतरांनी लिहिलं असणार, तुला सांगितलं असणार, तेव्हा त्याबद्दल मी पुन्हा काही सांगण्याची गरज नाही. आता ही मुलाखत तुला कशी पाहिजे? ...प्रश्न, उत्तर...तुझे काही विशिष्ट प्रश्न वगैरे...'

मी म्हणालो, 'तसे नको...जे झाले ते होऊनी गेले...तुम्ही आता नुकत्याच दिल्लीहून परत आलेल्या आहात. तुम्हाला आज ह्या कार्यक्रमाच्या भवितव्याबद्दल काय वाटतंय, दिल्लीमध्ये नवीन काही जाणवलं का? – त्यातून काही नवीन दिशा, मार्ग तुमच्या नजरेला पडतोय का, हे सांगा, त्याबद्दल बोला! ...जरूर पडेल तिथे मी प्रश्न विचारीन–'

'हे सक्तीनं केलं पाहिजे. त्याशिवाय होणार नाही, ह्याचा कायदा केला पाहिजे. त्याशिवाय काही घडणार नाही, हे सगळं खरं असलं तरी तसं जर ते होणार नसेल, तर दुसरा कुठलाच मार्ग शोधण्याचा प्रयत्न न करता हताश व्हायचं, निराशावादी बनायचं अशी वृत्ती जर तुमच्या-आमच्यासारख्या लोकांच्यात निर्माण होऊ लागली आणि आपण सगळे निष्क्रिय, नुसतेच बसून राहिलो तर ते सर्वथा अयोग्य आहे. ह्या कार्यक्रमातील तज्ज्ञ आणि कार्यकर्तेच जर निराशावादी झाले तर कशालाच काही अर्थ उरणार नाही.

'ठीक आहे, झालं ते होऊन गेलं. हा मार्ग नाही, तर तो; पण हळू का होईना किनारा आम्ही गाठणार! एक एक पाऊल पुढं टाकीत रहाणार. शासन काय करतंय? ह्याची वाट बघत रिकामे बसून रहाणार नाही. निदान माझी स्वतःची तरी अशी भूमिका आहे. Alternative Strategies, हा किंवा तो मार्ग, ही किंवा ती पद्धत; पण पैलतीर गाठायचं आणि तसा तो गाठत असताना beyond family planning म्हणजे 'कुटुंब नियोजनापल्याडचा' विचार करून त्याला मूर्त स्वरूप देण्यासाठी एकदिलानं झटायचं, हे मला महत्त्वाचं वाटतं.

'मी डॉक्टर आहे, कुटुंब नियोजन-कुटुंब कल्याण ह्या कार्यक्रमासाठी मी स्वतःला वाहून घेतलं आहे. त्या भूमिकेतून मी काम करते आणि माझे विचार मांडते. गेल्या पंधरा महिन्यांत आपण पंधरा वर्षे मागे गेलो हे विदारक सत्य आहे; पण म्हणून हार खाणं, हात–पाय गाळून 'आता ह्या देशाचं कसं होणार?' अशा चिंतेनं निष्क्रिय होणं हा माझा स्वभाव नाही! सरकारने हे काम सुरू करीपर्यंत आपण स्वयंसेवकवृत्तीने

पुढाकार घेऊन काहीच करायचं नाही हे मला पटत नाही !

'जनता सरकार, 'सक्तीचे कुटुंब नियोजन' ह्या मुद्द्यावरून निवडणुका जिंकूनच स्थापन झालं. नसबंदी-शस्त्रक्रियेचा कार्यक्रम सर्वत्र थंडावला; पण आमच्या सेंटरचा मी चालू ठेवला. सक्ती वगैरे प्रकार आमच्या इथं पूर्वीदेखील नव्हते आणि पुढंदेखील होणार नाहीत आणि परुळकर, तुला सांगायला हरकत नाही. 'अपेक्षित' संख्येपेक्षाही जास्त स्टरीलिझेशनस् आम्ही मागील वर्षीं केली, ह्याबद्दल जनता सरकारनेच आमच्या कामाची प्रशंसा केली, ह्याचे श्रेय मी माझ्या स्टाफला देते. माझे ह्यावर उलट असे म्हणणे आहे की, सरकारला 'अपेक्षित' असलेली संख्या मुळातच इतकी मामुली होती की, त्याबद्दल विशेष कौतुकास्पद आम्ही काही केले असे मला वाटत नाही. सांगण्याचा उद्देश एवढाच की, आणीबाणीनंतर, नवीन सरकारची राजवट सुरू झाल्यावरदेखील आम्ही आमचा कार्यक्रम चालू ठेवला होता.

'श्री. राजनारायण ह्यांनी राजीनामा दिला. त्यांच्यावर आता सर्व बाजूंनी टीकेची झोड उठेल. त्यांच्या कारकीर्दीत हा कार्यक्रम संपूर्ण थंडावला होता, ठार मेला होता हे निर्विवाद सत्य आहे. त्याबद्दल टीका ही होणारच; पण त्यांच्या कारकीर्दीत एक चांगली गोष्ट घडली आहे, हे विसरून चालणार नाही. ती गोष्ट म्हणजे जनस्वास्थ्य-जनआरोग्य-रक्षणाच्या कार्यक्रमाला (कम्युनिटी हेल्थ प्रोग्रॅम) मिळालेली चालना.

'मी आणि माझ्यासारख्या वैद्यकशास्त्रातील इतर काही मंडळींचे, त्या विषयातील तज्ज्ञांचे फार दिवसापासूनचे हे स्वप्न आहे. लोकांचे आरोग्य लोकांच्या हातात असावे. ते डॉक्टरांच्या आणि त्यांच्या उपचारपद्धतीशी निगडित असलेल्या व्यावसायिकांच्या हातात नसावे.

'दुर्दैवाने आपल्या इथे ज्या पद्धतीने आरोग्यविषयक शिक्षण दिले जाते, त्यामधून डॉक्टर निर्माण होतात, ते पाश्चिमात्य पद्धतीने प्रभावित झालेले Western influenced असतात. औद्योगिकदृष्टया प्रगत झालेल्या देशांमधून वापरात असलेली, तेथील रहिवाशांच्या आचार-विचाराला पटणारी, मानवणारी क्युरेटिव्ह- म्हणजे झालेला रोग फक्त बरा करणारी-उपचारपद्धती आपल्या इथे निरुपयोगी आहे. आपण रोगप्रतिबंधक वैद्यकशास्त्रावर भर दिला पाहिजे. त्यासाठी सर्वसामान्याला शारीरिक स्वच्छता, परिसरस्वच्छता, रोगप्रतिबंधक लस टोचून घेण्याचे महत्त्व, साधा पण समतोल आहार आणि त्याचे महत्त्व हे सर्व आरोग्यशिक्षणाद्वारे दिले पाहिजे. स्वतःचे आरोग्य स्वतः कसे रक्षण करायचे, हे प्रत्येकाला समजले पाहिजे. खेड्याखेड्यांतून निर्जंतुक आणि शुद्ध पिण्याच्या पाण्याचा कार्यक्रम तातडीने हाती घेतला पाहिजे. जनआरोग्यरक्षणाचा, कम्युनिटी हेल्थचा हा कार्यक्रम यशस्वी झालाच पाहिजे. आज तो कार्यक्रम ढासळण्याच्या बेतात आहे. लोकांना आरोग्यविषयक प्रेरणा देण्यासाठी अव्वल दर्जाचे हजारो, लाखो जनआरोग्यरक्षक-कम्युनिटी हेल्थ वर्कर्स-घडवता आले पाहिजेत ह्या आरोग्यरक्षकांची निवड, त्यांचे प्रशिक्षण आणि त्यांच्या कामावरची देखरेख हे सर्व अनन्यसाधारण महत्त्वाचे आहे. ह्या आरोग्यरक्षकांच्या कार्याला सहाय्यक आणि पूरक अशी माहिती वेगवेगळ्या माध्यमाद्वारे खेडोपाडी पसरवली पाहिजे. हा एक स्वतंत्र विषय आहे. परुळकर, मी तुला त्याबद्दलचे माझे विचार नंतर कधी तरी विस्ताराने सांगेन...

'सांगण्याचा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कुटुंब कल्याण आणि जनआरोग्यरक्षण हे दोन्ही कार्यक्रम एकत्रितपणे राबवले गेले पाहिजेत. जन्मलेले मूल जगण्याची शाश्वती नसेल तर स्वयंस्फूर्तीने, स्वेच्छेने कोण नियोजन करणार ?

'निरोगी मातेच्या पोटी जन्मतःच सुदृढ बाळ उपजले, त्याला वेळेवर आवश्यक त्या रोगप्रतिबंधक लसी टोचल्या गेल्या, साधा, स्वस्त आणि समतोल आहार मिळाला, ते मूल ज्या परिसरात रांगते, पडते, खेळते, तो जर स्वच्छ आणि निर्मळ असला, त्याचे पिण्याचे पाणी निर्जंतुक असले, तर असे मूल आपोआपच रोगमुक्त नाही का होणार ?

'बारीक-सारीक रोगाने, साथीच्या रोगाने मुले दगावत नाहीत ह्याची खात्री पटली तर कुठली जोडपी स्वखुषीने आठ आठ, दहा दहा मुले जन्माला घालतील. कशासाठी स्वतःवरचा बोजा वाढवतील ?

'लोकसंख्या नियंत्रित हवी असेल, भावी पिढी सशक्त आणि निरोगी असावी अशी इच्छा असेल, तर त्यासाठी जनआरोग्यरक्षणाचा कार्यक्रम यशस्वी केला पाहिजे; पण आज दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, समाजातील एका विशिष्ट गटाकडून याला फार मोठा विरोध होत आहे. हा कार्यक्रम पाडण्याचा हरप्रकारे प्रयत्न ह्या गटाकडून चालू आहे. हा गट कुठल्या विशिष्ट जाति-धर्माचा किंवा राजकीय पक्षाचा नाही. विरोध करणारा हा गट आमच्यातला आहे. तुला आश्चर्य वाटेल परुळकर, पण डॉक्टरलोक आणि त्यांच्या व्यवसायाशी निगडित असलेले यांच्याकडूनच ह्या कार्यक्रमाला सुरुंग लावण्याचा निकराचा प्रयत्न चालू आहे.

'रोगप्रतिबंधक वैद्यकशास्त्र, जनतेला आरोग्यदक्ष बनविण्याचा कार्यक्रम ह्याला डॉक्टर आणि त्यांच्या व्यवसायाशी निगडित असलेल्या लोकांचा विरोध असावा ह्यापेक्षा खेदजनक दुसरी कुठली गोष्ट असेल तूच सांग. त्यांचा हा विरोध हाणून पाडला पाहिजे.

'शेवटी 'सुदृढ बाळांचे छोटेसे निरोगी कुटुंब' हेच आपल्याला हवे आहे ना ?' □

---

## आरोग्यरक्षक

'एक गोष्ट आपण सर्वांनीच लक्षात घेतली पाहिजे. आपला आरोग्यरक्षक चीनमधील 'बेअर फूट डॉक्टर'च्या धर्तीवर व्हावा अशी कल्पना नाही आहे. त्याला त्या प्रकारे घडविण्याचा आमचा विचारही नाही.

आपला आरोग्यरक्षक 'अनवाणी वैद्य' बनून त्याने लोकांवर 'डॉक्टरी उपचार' करावेत असा हेतू अजिबात नाही. त्याला त्या पद्धतीने प्रशिक्षण देखील दिले जाणार नाही.

आज ऐंशी टक्के लोकांना आपण अगदी प्राथमिक स्वरूपाचे डॉक्टरी उपचार पुरवू शकत नाही. त्यामुळे ह्या लोकसंख्येला होणाऱ्या सर्वसाधारण रोगांचे प्रमाणच मुळात कमी करण्याचा हा प्रयत्न आहे.

हे लक्षात घेऊन डॉक्टरी व्यवसायातील मंडळींनी आमच्या आरोग्य रक्षकांची चीनच्या barefoot doctor बरोबर तुलना करण्याचे सोडून जनआरोग्यरक्षणाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वेच्छेने पुढे आले पाहिजे. □

MANOOS ( Marathi Weekly ) 1·50 Paise Regd No. PNC-68


# उत्कृष्ठ लोखंडासाठी

# तिगरानीया

**कारखाना**

**नवीन आग्रा रोड**

**नासिक**

फोन : ५१७६

ऑफिस फोन

३१२१६५